


CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

लातूर | रविवार, २५ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com








CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मंगळवार २७ जानेवारी उमेदवारी अर्ज माघार घेण्याची शेवटची संधी

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

२५ जानेवारी रोजी रविवार व सोमवारी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन असल्याने शासकीय कामकाजाला सुट्टी आहे. त्यामुळे या दोन दिवशी जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवारी अर्ज माघार घेता येणार नाही. त्यामुळे मंगळवार २७ जानेवारी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज माघार घेण्याची शेवटची संधी आहे. त्यामुळे दोन दिवस अर्ज माघार घेता येणार नसल्याची माहीती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किरण जमदाडे यांनी दिली. १६ जानेवारीपासून जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी अर्ज भरण्यास सुरूवात झाली आहे. २१ जानेवारीपर्यंत अर्ज भरण्याचा कालावधी होता. तर २२ जानेवारीला अर्जांची छाननी होऊन २३ व २४ जानेवारीला अर्ज माघार घेण्याचा दिवस होता. मात्र २५ जानेवारी रोजी रविवार व २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन असल्याने निवडणूक कामकाज बंद राहणार आहे. त्यामुळे अर्ज माघार घेण्याची प्रक्रीया बंद असणार आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी म्हणजे २७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेता येणार आहे. त्यानंतर निवडणूकीत रंगत येणार आहे.

### बार्शीत गटातून चौघांची तर गणातून एकाची माघार

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत शनिवारी बार्शीतून उपळाई ठोंगे जिल्हा परिषद गटातून चंद्रशेखर महादेव ढाकणे, पानगाव गटातून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार विकास कालिदास जाधव आणि ओमप्रकाश खासेराव पाटील यांनी तर शेळगाव आर गटातून प्रियंका अजय पंखे या उमेदवारांनी शनिवारी आपले अर्ज मागे घेतले. तर पानगाव पंचायत समिती गणातून ओम प्रकाश खाशेराव पाटील यांनी दोन्ही ठिकाणचे अर्ज माघारी घेतले आहेत. पानगाव गणातील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार समजले जाणारे ऍड. विकास जाधव यांनी माघार घेतल्याने बदली उमेदवार सुधीर काळे यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. या मतदारसंघात पानगाव हे मोठे गाव असून त्याच गावातील उमेदवार असावा अशी गावकऱ्यांचे आणि मतदारसंघातील सोपल सम र्थकांची इच्छा होती. त्यामुळे मतदारसंघाचा कानोसा घेतल्यानंतर या जागेसाठीचे प्रबळ दावेदार राज्य ग्रामपंचायत संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ऍड. विकास जाधव यांनी शनिवारी अखेर आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने सुधीर काळे यांचा मार्ग सुकर झाला आहे.



### संत तुकाराम व ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची चंदनशिवे यांनी केली महाआरती

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

अखिल भाविक वारकरी सांप्रदायिक मंडळाच्या वतीने आयोजित म घवारी पायी दिंडी व पालखी प्रस्थान सोहळा साठे चाळ येथे भक्तिभावात पार पडला. यावेळी संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीची महाआरती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते करण्यात आली. शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी साठे चाळ, बुधवार पेठ येथे हा सोहळा पार पडला. अखिल भाविक वारकरी सांप्रदायिक मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. सुधाकर (महाराज) इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांतील दिंड्या एकत्र येत पारंपरिक पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. श्री मार्कंडेय मंदिर येथे पूजनानंतर नॉर्थ कोट प्रशालेच्या मैदानात माघवारी पायी दिंडी व रिंगण सोहळा झाला. ज्ञानबा-तुकाराम जयघोषात पालखी साठे चाळ येथे दाखल झाल्यानंतर महाआरती करण्यात आली.यानंतर राष्ट्रीय काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प सुधाकर महाराज इंगळे, राष्ट्रीय सचिव ह.भ.प. बळीराम जांभळे, प्रदेशाध्यक्ष ह.भ.प. ज्योतीराम चांगभले यांचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळ प्रदेश अध्यक्ष ज्योतीराम चांगभले, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे, प्रदेश उपाध्यक्ष किसन कापसे, प्रदेश सचिव मोहन शेळके, जिल्हाध्यक्ष बंडोपंत कुलकर्णी, शहराध्यक्ष संजय पवार उपाध्यक्ष ,सचिन गायकवाड, दिनकर जगदाळे, गुरुसिद्ध गायकवाड, कीर्तनकार कृष्णा (महाराज) चौरे, शिवानंद जाधव, गुरुसिद्ध गायकवाड, महेश चौरे, ऋषिकेश झांबरे, अनिकेत जांभळे, सचिन भोसले, अविराज जांभळे,, गोविंद ताटे, अजिंक्य मोरे, प्रभाकर झांबरे, सचिन मस्के, अनिकेत भोसले, ऋषिकेश झांबरे, अभिषेक जाधव, दशरथ जाधव, कैलास मोरे,नामदेव पाटील, किरण पाटील आदी उपस्थित होते.

### मंगळवेढ्यात जुगार अड्ड्यावर छापा; साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

**मंगळवेढा, दि. २४ जानेवारी-**

मंगळवेढा शहर हद्दीत मरवडे रोडकडे जाणार्या नकाते कॉम्पलेक्स समोर चालणार्या जुगार अड्ड्यावर पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या पथकाने छापा टाकून जवळपास ४ लाख ५७ हजार ६८० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार जागेच्या मालकासह अजय नाईकवाडी,सचिन वाकडे,अजय जाधव, रामचंद्र आवताडे,अरुण डोके, अशरफ मुजावर, विनोद लोकरे,बाबा अवघडे,गणेश कोळी व जागा मालक महादेव सावंजी या सह दहा जणाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाल्याने जुगार खेळणार्यामध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,मंगळवेढा शहर परिसरात मरवडे रोडवर तिरट नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलीस अधिक्षक कार्यालयास प्राप्त होतास यातील फिर्यादी सहाय्यक पोलीस निरीक्षक बसवेश्वर जकीकोरे नेमणूक नियंत्रण कक्ष यांच्या पथकाने दि.२३ जानेवारी रोजी सायंकाळी ४.१० वाजता सदर ठिकाणी छापा टाकला असता वरील दहा आरोपी जुगाराच्या अड्ड्यात समोरसमोर गोलाकार बसून बावन्न पानाच्या पत्याच्या तिरट नावाचा जुगात खेळत असताना मिळून आले. यामध्ये पोलीसांनी ९ मोबाईल, ६ मोटर सायकली व रोख रक्कम असा एकूण ४ लाख ५७ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत नागरिकामधून उलटसुलट चर्चा सुरु आहे. ही घटना शहर हद्दीमध्ये घडली असल्याने त्या पोलीस कर्मचार्याच्या कर्तव्यावर संशय व्यक्त नागरिकामधून केला जात आहे. पोलीस अधिक्षकांनी याची गंभीर दखल घेवून अवैध धंद्याला पाठीशी घालणार्या पोलीस कर्मचार्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी शहरवासीयामधून जोमाने पुढे येत आहे. तत्कालीन पोलीस अधिक्षक विरेश प्रभू कार्यरत असताना ज्यांच्या हद्दीत अवैध धंदे आढळतील त्यांना जबाबदार धरुन संबंधीत बीट अंमलदारावरती कारवाई करत असे त्यामुळे अवैध धंदे समुळ हद्दपार झाले होते,हाच पॅटर्न विद्यमान पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी अंमलात आणल्यास अवैध धंदे हद्दपार होण्यास निश्चित मदत होवून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ही अबाधीत राहिल अशा प्रतिक्रीया जेष्ठ नागरिकामधून व्यक्त होत आहेत.

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य'

## महसूलमंत्र्यांचा मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ जानेवारी :**



महानगरपालिका आणि नगरपालिकांप्रम णेच आता जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य' नियुक्त करण्यात यावेत, असा प्रस्ताव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावावर सकारात्मकता दर्शविली असल्याची माहिती यांनी दिली.

ते म्हणाले, ग्रामीण भागात अनेक लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञ व्यक्ती विविध सामाजिक क्षेत्रांत उत्तम काम करतात. मात्र, जिल्हा परिषद निवडणुकीत महिला आरक्षण किंवा एससी, एसटी आरक्षणा मुळे अनेक अनुभवी आणि अभ्यासू व्यक्तींना निवडणूक लढवता येत नाही. अशा परिस्थितीत, या तज्ज्ञ लोकांच्या अनुभवाचा फायदा ग्रामीण विकासासाठी व्हावा, या हेतूने त्यांना 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी दिली जावी, अशी आग्रही मागणी आहे. महसूलमंत्र्यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि ग्रामविकास मंत्र्यांचीही याबाबत चर्चा करण्यात आली असून हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणि त्यानंतर विधिमंडळात मंजुरीसाठी येईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान,राज्यातील महापौर आरक्षणाच्या सोडती अत्यंत पारदर्शकपणे आणि कॅमेऱ्यांच्या निगराणीत पार पडल्या आहेत. अशा परिस्थितीत विजय वडेट्टीवार यांनी या प्रक्रियेवर आक्षेप घेणे किंवा कलंक लावणे हे त्यांना शोभणारे नाही, असे सांगून ते म्हणाले,'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धाराशिव, लातूर, परभणी आणि संभाजीनगरमधील काही भागांत भाजप-शिवसेना युती झाली असून, काही ठिकाणी जागावाटपाची चर्चा सुरू आहे. गेल्या १० वर्षांत निवडणुका न झाल्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक कार्यकर्ते निवडणूक लढवण्यासाठी आग्रही आहेत.

ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे युती करण्याचा भाजपचा प्रामाणिक प्रयत्न असून, काही ठिकाणी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेतले जातील. अचलपूर नगरपालिकेच्या सत्तास्थापनेवरून सुरू असलेल्या चर्चांवर महसूलमंत्र्यांनी कडक भूमिका मांडली. अचलपूरमध्ये भाजपचे ९ नगरसेवक असून आम्ही तिथे अल्पमतात आहोत. तिथे एमआयएम, काँग्रेस आणि उबाठा गटाने आपले स्वतंत्र गट तयार केले आहेत. भाजप एमआयएम ला कधीही सोबत घेणार नाही आणि आम चा त्यांना कोणताही पाठिंबा नाही, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.बदलापुरातील अत्याचाराच्या घटनेवर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले , बदलापूरात घडलेली घटना अतिशय गंभीर आणि दुर्दैवी आहे. गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही.प्रकाश आंबेडकर यांच्या विधानाचा समाचार घेताना बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्र्यांबद्दल अशा खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य करणे खेदजनक आहे. देवेंद्र फडणवीस यांचे कर्तृत्व मोठे असून त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान अतुलनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

# तक्रारींचा वेळेत निपटारा न करणाऱ्या मनपाच्या २४ अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

## उपायुक्त आशिष यांनी केली कारवाई; ४१ हजार ८०० होणार दंड होणार वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**



महापालिकेच्या पोर्टल / माय सोलापूर पवरील नागरी तक्रारींचे वेळेत निपटारा न करणाऱ्या अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्यासह महापालिकेच्या २४ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या सर्वांना मिळून एकूण ४१ हजार ८०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे.महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत.

शहरातील नागरीकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीकोनातून ऑनलाईन तक्रार करण्याची सोय महापालिकेने पोर्टल / माय सोलापूर पवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.या तकारीचे निराकरण संबंधित विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या कडून मुदतीत पूर्ण करून, केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित पोर्टल व पवर अद्ययावत करण्याचे निर्देश सर्व अधिकारी कर्मचारी यांना वेळोवेळी देण्यात आले आहेत. तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी याआधीच परिपत्रकाद्वारे दिले होते. या अनुषंगाने तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या २४ अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकूण ४१ हजार ८०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे.दंडाची रक्कम जानेवारी २०२६ पेड इन फेब्रुवारी - २०२६ च्या मासिक वेतनातून एकरकमी वसूल करण्यात यावी, असे आदेश महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले आहेत.

| कर्मचारी नाव कंसात कार्यालय आणि दंड रक्कम याप्रमाणे | |
|---|---|
| अजिंक्य साळुंके | (विभागीय कार्यालय क्र. ०१ - ५०० रुपये) |
| प्रशिक बडोळे | (विभागीय कार्यालय क्र. ०५ - २५०० रुपये) |
| श्रीमाला गायकवाड | (विभागीय कार्यालय क्र. ०८ - १००), |
| दिपाली मेटकरी | (नगर रचना कार्यालय - ४०००) |
| ॲड. अजिंक्य विपत | (विभागीय कार्यालय क्र. ०६ - १००), |
| राहुल कांबळे | (विभागीय कार्यालय क्र. ०७ - ३९००), |
| श्रीनिवास लिंगराज | (कर आकारणी विभाग - ३००), |
| शिवाजी नलवडे | (विभागीय कार्यालय क्र. ०७ - ९००), |
| महेश कासराळे | (गव.सु. तांत्रिक विभाग - १५००), |
| सोमाजी साबळे | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - ३३००) |
| बसवराज जामदार | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - २००) |
| पंकज क्षीरसागर | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - १००) |

| कर्मचारी नाव कंसात कार्यालय आणि दंड रक्कम याप्रमाणे | |
|---|---|
| प्रकाश नरळे | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - १५००) |
| विजय साळुंखे | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - ६०००) |
| विठोबा शिंदिबंदी | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - १००), |
| अक्षय हूलसुरे | (धनकचरा व्यवस्थापन विभाग - ३६००), |
| अनिकेत कांबळे | (विभागीय कार्यालय क्र. ०३ - ३००), |
| संजय कोळी | (विभागीय कार्यालय क्र. ०४ - १००), |
| आकाश पाटील | (विभागीय कार्यालय क्र. ०१ - १९००), |
| अनिकेत कावळे | (विभागीय कार्यालय क्र. ०२ - १००), |
| हर्षाली जाधव | (विभागीय कार्यालय क्र. ०३ - १००), |
| कुलदीप जगदाळे | (विभागीय कार्यालय क्र. ०६ - ६००), |
| सुकुर अत्तार | (कर आकारणी विभाग - ६००), |
| जगन्नाथ बनसोडे | (अतिक्रमण विभाग - ६३०० रुपये). |

# हिंद-दी-चादर समागमात श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी भाविकांची महासागरासारखी गर्दी

- **मान्यवरांसह हजारो भाविकांची हजेरी**
- **श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनाने भक्तीचा महासंगम**



**नांदेड, दि. २४ जानेवारी-**

हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात आज राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण, पोहरादेवीचे, महंत, सुनील महाराज,बाबुसिंग महाराज, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोड यांच्यासह हजारो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. सर्व जिल्ह्यातून व नांदेड शहरातून आलेल्या हजारो भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत. कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत.

# समर्पित ज्येष्ठ विशेष सन्मान पुरस्कार सोलापूरचे दत्ता भोसले यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**



सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार अंतर्गत सामाजिक परिवर्तन अध्ययन केंद्र (सीएसएससी ) व प्रादेशिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र (आरआरटीसी) यांच्यावतीने आणि सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघांच्या शिखर समितीच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या यंदाचा समर्पित ज्येष्ठ विशेष सन्मान पुरस्कार छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे निवृत्त कर्मचारी दत्ता भोसले यांना प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक परिवर्तन अध्ययन केंद्राचे अध्यक्ष डॉ. रमेश डी. पोतदार हे होते. याप्रसंगी मुंबईच्या माजी महापौर ॲड. निर्मला सामंत- प्रभावळकर यांच्या हस्ते भोसले यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी महापौर मनोहर सपाटे, प्रा शंकरराव साळुंखे, प्रा. विलास मोरे, माजी प्राचार्य डॉ. अनिल बारबोले, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार आदींनी भोसले यांचे अभिनंदन केले आहे.

# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे ९२ व्या वर्षात पदार्पण

१९३५ च्या काळात कै. महादेवराव तथा अण्णा गोडबोले आणि त्यांच्या सहका-यांनी एकत्र येवून अवघ्या अकराशे रुपयांच्या (रु.११००/-) भाग भांडवलावर आणि फक्त रु.२००/- रुपयाच्या ठेवीच्या रकमेवर आजची सांगली अर्बन को-ऑप.बँक सुरु केली आणि आज तिचा वटवृक्ष झाला. आजमितीला या बँकेचे भांडवल रु. ३८ कोटी ७८ लाख आहे. हा भांडवलरुपी वृक्ष वाढणेसाठी अनेकांनी बँक स्थापनेपासून प्रयत्न केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने बँकेचे संस्थापक कै. म.ह. गोडबोले, कै.ग.को. गोडबोले, कै. स.ग. फडके, कै.वा.वि. वाटवे, कै. ग.का. दांडेकर, कै.वि.ह. माईणकर, कै.मा.न. कार्लेकर, कै.सु.शां. शहा, कै. जो. गो. पाटील, कै.अ.वि. देशपांडे, कै.गुं.शां. कांते, श्री. बा.भा. पुजारी या ज्येष्ठ माजी सन्मा. कार्याध्यक्षांचा व त्या त्या वर्षामध्ये कार्यरत असलेल्या संचालक मंडळाचा सहभाग आहे. गत दहावर्षापासून अध्यक्षपदाची धुरा श्री. गणेशराव गाडगीळ समर्थपणे सांभाळत होते, आता डिसेंबर २०२५ पासून हि धुरा नूतन अध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे यांच्याकडे आहे. यापुढेही आमच्या सर्वांचे मार्गदर्शक मा.गणेश गाडगीळ साहेब यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत राहणार आहे.

बँकेचे पहिले व्यवस्थापक कै. वा. म. लागू, कै. आ. बा. पाटणकर, कै. पं. भा. टाकवेकर, कै. श्री. अ.बेडेकर, श्री. ना. रा.बोर्गीकर, श्री. सु. न. कुलकर्णी व श्री. श. वि. बोर्गीकर यांचा या सर्वांच्या प्रयत्नांमुळे या वटवृक्षाची एवढी वाढ झालेली आहे. याची आणखी वाढ होणेसाठी माजी अध्यक्ष व विद्यमान व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष श्री.गणेशराव गाडगीळ, नूतन अध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे व संचालक मंडळ, तसेच तज्ञ संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी वृंद या सर्वांनी कष्ट घेतलेले आहेत व घेत आहेत.

बँकेच्या सभासदांनी २०२२ साली दुसऱ्यांदा या संचालक मंडळावर विश्वास दाखवून बहुमोल व भरघोस मतांनी विजयी केले. यासाठी आम्ही सर्व सभासदांचे अत्यंत ऋणी आहोत. आपण दिलेल्या बहुमोल मतांचा आदर करून आम्ही बँकेचा कारभार उत्तम व व्यवस्थित चालवणेचा प्रयत्न करीत आहोत. बँकेने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून ठिकठिकाणी वृक्ष लागवडीचा योजनाबध्द कार्यक्रम सुरु केला. आज सांगली नगरी आणि तिची उपनगरे मोठया वेगाने वाढत आहेत. विकसीत होत आहे. याचे भान ठेवून बँकेने आता शाखाविस्तार करणेचे ठरवले आहे.

मराठवाडयासारख्या भागातही बँकेने आपला लक्षणीय शाखा विस्तार करुन तिथल्या विकास कार्यात आपली मोलाची भूमिका पार पाडलेली आहे. बँकेच्या सर्व शाखा संगणकीकृत आहेत. आमचे सर्व कर्मचारी आता त्याद्वारे आपल्या सेवेकरिता सदैव कार्यतत्पर आहेत.

बँकेने ८ एटीएम मार्फत सेवा देणेचे काम चालू केले आहे. तसेच ठट उेवश सेवाही चालू केली आहे. तसेच कर्ज वाढणेच्या दृष्टीकोनातून कर्जवाढीसाठी निरनिराळया क्षेत्रात कर्जाचे वाटप होईल, असेही बँक व्यवस्थापनाने पाहिलेले आहे.

यामुळे बँकेच्या व्यवसायामध्ये वाढ होत आहे. बँकेने चॅट बॉट (उव्ह- इजढ) संकल्पना चालू केली आहे. याचा ग्राहकांना खूपच फायदा होत आहे व ग्राहकांना खात्याबद्दल त्यांच्या मोबाईलवर एस.एम. एस. द्वारे त्वरित माहिती मिळत आहे. ग्राहकांना घरबसल्या त्यांच्या खात्यावरील बॅलन्स, मिनी स्टेटमेंट,चेक बुक मागणी या सेवा उपलब्ध झाल्या आहेत. गृहकर्ज, कमर्शिअल रिअल इस्टेट, चड्चए उद्योग, शैक्षणिक, वैद्यकीय,व्यवसाय,घरगुती सोलर कर्ज, कृषी व कृषीपूरक कर्ज, जिनिंग व्यवसाय, साखर उद्योग, सोलर फार्मिंग ,व्यापारी व औद्योगिक व्यवसायासाठी मालतारण कर्ज इत्यादी क्षेत्रात कर्ज वाटप केलेले आहे. तसेच नवनवीन योजना आणून यावरील व्याजदरही राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. गृहकर्ज, वाहन कर्ज, व्यापारी कर्ज, यांचा समावेश आहे.

बँकेकडे केंद्र व राज्य शासनाच्या विविध सबसिडी अंतर्गत कर्जपुरवठा केला आहे. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना(शहरी २.०), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री किसान उर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान,प्रधानमंत्री सुर्यघर योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ,क्रेडीट लिंक्ड कॅपिटल साबिसिडी योजना,राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा सुविधा (नाबार्ड),राष्ट्रीय पशुधन अभियान,अमृत योजना ई यांचा समावेश आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे बँकेने गेली ३ वर्षे व्यवस्थापन मंडळाची (बोर्ड ऑफ मॅनेजमेंट) ची संकल्पना यशस्वीपणे राबविली आहे. यामध्ये त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंचा त्यांच्या क्षेत्रातील अनुभवामुळे बँकेला कामकाजात व्यावसायिकता आणण्यासाठी उपयोग झाला आहे व होत आहे. बँकेचा सेवक हा प्रशिक्षीत पाहिजे यासाठी बँकेने अद्ययावत प्रशिक्षण केंद्र सुरु केले असून, विविध विषयांवर व तंत्रज्ञानावर आधारित असे प्रशिक्षण कर्मचा-यांना दिले जाते. निवडणूकीपूर्वी दिलेली बहुतेक सर्व आश्वासने संचालक मंडळाने पूर्ण केलेली आहेत.

२०२४ -२५ या आर्थिक वर्षामध्ये बँकेस २१ कोटी ३९ लाख इतका ढोबळ नफा झाला. मार्च २०२६ अखेर बँकेच्या नफ्यामध्ये निश्चितपणे आणखी वाढ होईल असा विश्वास सन्मा. अध्यक्षांनी व्यक्त केला आहे. तसेच सभासदांना यावर्षी ७ टक्के डिव्हीडंड देऊन दिलेल्या आश्वासनाची पूर्ती श्री. गणेशराव गाडगीळ व संचालक मंडळ यांनी केली आहे.

बँकेच्या सभासदांची व ग्राहकांची थेट संपर्क साधण्यासाठी म्हणून शाखांचे वर्धापन दिन साजरे करण्याचे सुरु केले आहे. दैनंदिन कामकाजाबरोबरच सामाजिक बांधिलकीचे व्रत बँकेने विविध सामाजिक उपक्रम राबवून सुरु ठेवले आहेत. सध्या रक्ताचा खूपच तुटवडा सर्वत्र जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर बँकेने सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेने वेळोवेळी बँकेमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करणेत येते. या वर्षीही सर्व शाखांमध्ये रक्तदान शिबीर आयोजित करणेत आले आहे. दि.२४/१/२०२६ रोजी झालेल्या रक्तदान शिबिरांमध्ये ५८५ बाटल्या रक्तदान झाले. बँकेचे संस्थापक कै. म.ह तथा अण्णा गोडबोले यांचे स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्याने, जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणा-या व विशेष प्राविण्य मिळविणा-या महिलांचे सत्कार केलेले आहेत. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात विमा असणे गरजेचे आहे. यासाठी बँकेने रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार चार जीवन विमा कंपन्या व तीन जनरल विमा कंपन्या व दोन आरोग्य विमा कंपनी यांच्याशी करार केला आहे.

यामार्फत सभासद, कर्जदार, ग्राहक यांचा विमा घेऊन त्यांच्या कुटुंबाला विमा संरक्षित करुन त्यांचा ताण कमी करणेचा प्रयत्न बँकेने केला आहे. आम्हाला आपल्या सर्वांची साथ हवी आहे. यातूनच आपण अवघे धरू सुपंथ हे साकारण्याकरिता सिध्द होऊ या !! बँकेपुढे आव्हानेही खूप आहेत व येतीलही या सर्वांवर मात करण्यासाठी बँकेचे सर्व संचालक मंडळ सदैव तत्पर आहे व बँकेची प्रगती अधिकाधिक उत्तम होईल यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.

**- प्रकाश बिरजे**
माजी संचालक, सांगली अर्बन बँक

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



शरीर दुर्बल झाले असता जसे ते नाना तऱ्हेच्या कीटाणूंना बळी पडते, तीच कथा समाजाचीही होते. समाजातील ऐक्यभाव, समाज-मूल्यनिष्ठा जसजशा क्षीण होत जातात, तसतशा सर्व अनिष्ट शक्ती समाजात प्रभावी होतात. समाजात एकजीव भावनेचे उद्दीपन करून, त्यास प्रबल करणे हाच यावरील एक उपाय होय.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# व्यापार करारांमुळे तरुणांसाठी नव्या संधी



## १८ व्या रोजगार मेळ्यात ६१ हजार जणांना नियुक्तिपत्रे

◆ **नवी दिल्ली, २४ जानेवारी**

देशातील आणि विदेशातील तरुणांसाठी नवीन संधी निर्माण करण्यासाठी भारत विविध देशांसोबत व्यापार आणि गतिशीलता करार करीत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी येथे आयोजित १८ व्या रोजगार मेळ्यात सांगितले. या कार्यक्रमात शासकीय सेवेत निवड झालेल्या ६१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरीत करण्यात आली.

भारत अनेक देशांसोबत व्यापार आणि गतिशीलता करार करीत आहे. हे व्यापार करार देशातील तरुणांसाठी नवीन संधी घेऊन येत आहेत, असे नरेंद्र मोदी यांनी देशभरातील ४५ ठिकाणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आयोजित रोजगार मेळ्याला संबोधित करताना सांगितले.

जगात सर्वाधिक तरुण भारतात आहेत आणि रालोआ सरकार देशात तसेच विदेशातही



रोजगार मेळ्यात नियुक्तिपत्र प्राप्त झालेले उमेदवार

तरुणांसाठी नवीन संधी निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. नियुक्तीपत्रांना राष्ट्रनिर्माणात सामील होण्याचे आमंत्रण आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी काम करण्याची प्रतिज्ञा मानावे, असे आवाहन नरेंद्र मोदी यांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांना केले.

त्यांनी तरुणांना मागील वर्षात सरकारी कार्यालयांमध्ये आलेल्या अनुभवांची आठवण करून दिली आणि त्यांच्या कार्यकाळात नागरिकांना अशा अडचणींचा सामना करावा लागणार नाही, असा संकल्प करण्याचे आवाहन केले. मोदी यांनी तरुणांना आपली कर्तव्ये पार पाडताना 'नागरिक देवो भव' या ब्रीदवाक्यासह काम करण्याचे आवाहनही केले.

अलिकडच्या काळात सरकारने आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व गुंतवणूक केली आहे, यामुळे बांधकाम-संबंधित क्षेत्रांमध्ये रोजगारात वाढ झाली आहे. भारताची स्टार्टअप परिसंस्था वेगाने विस्तारत आहे. यात जवळपास दोन लाख नोंदणीकृत स्टार्टअप्स २१ लाखांपेक्षा जास्त तरुणांना रोजगार मिळाला आहे, असे ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

### 'डिजिटल इंडिया'मुळे अर्थव्यवस्थेचा विस्तार

'डिजिटल इंडिया'ने एका नवीन अर्थव्यवस्थेचा विस्तार केला आहे. यामुळे भारत ॲनिमेशन, डिजिटल मीडिया आणि इतर क्षेत्रांमद्ये जागतिक केंद्र म्हणून उदयास आला आहे. आज देशाने जीवन आणि व्यवसाय दोन्ही सुलभ करण्याच्या उद्देशाने सुधारणांच्या मार्गावर वाटचाल सुरू केली आहे. आज देशाने जीवन आणि व्यवसाय दोन्ही सुलभ करण्याच्या उद्देशाने सुधारणांच्या एक्सप्रेस गाडीत प्रवास सुरू केला आहे, असे मोदी म्हणाले.

# ५० हिंदू महिलांचे धर्मांतरण

## मिर्झापूरमध्ये जिमच्या नावाखाली सुरू होता प्रकार
## पोलिस अधिकाऱ्यांसह सात आरोपींना अटक

◆ **मिर्झापूर, २४ जानेवारी**

उत्तर प्रदेशातील मिर्झापूर जिल्ह्यात जिमच्या नावाखाली हिंदू महिलांचे धर्मांतरण करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. जिममध्ये कपडे बदलताना महिलांच्या चित्रफीत बनविण्यात आल्या. समाज माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देत महिलांना मुस्लिम धर्म स्वीकारण्यासाठी भाग पाडण्यात आले. एका महिलेने पोलिसात तक्रार केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी याप्रकरणात एका पोलिस अधिकाऱ्यासह सात आरोपींना अटक केली. तपासात ५० पेक्षा अधिक महिलांचे धर्मांतरण केल्याचे उघडकीस आहे.

पोलिस अधीक्षक सोमेन वर्मा यांनी सांगितले की, एका महिलेने महिला हेल्पलाइन क्रमांक १०९० वर फोन करून यासंदर्भात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर धर्मांतरणाच्या टोळीचा भंडाफोड करण्यात आला. विशेष असे की, एक पोलिस अधिकारी याप्रकरणातील सूत्रधार आहे. पीडित महिलांचे लैंगिक शोषण झाल्याची माहिती चौकशीत उघड झाली. महिलेची तक्रार आल्यानंतर आरोपी मोहम्मद शेख अली याला चौकशीसाठी बोलावले. सुरुवातीला त्याने आरोप फेटाळले. पोलिसांनी त्याचा मोबाईल तपासला असता, त्यात पीडित महिलांचे अश्लील छायाचित्र आणि चित्रफीत आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण नेटवर्कची चौकशी सुरू केली. मिर्झापूरमधील अनेक जिमवर छापे टाकण्यात आले आणि धर्मांतरणाच्या टोळीचा भंडाफोड झाला. कारवाईनंतर इतर अनेक महिलाही पुढे आल्या आणि त्यांनी त्यांची ओळख उघड न करण्याच्या अटींवर पोलिसांकडे जबाब नोंदवले.

### धमक्या, पैसे आणि धर्मांतरणासाठी दबाव

वर्मा यांनी सांगितले की, कथित लैंगिक शोषणानंतर, महिलांचे फोटो आणि व्हिडिओ जतन केले गेले. नंतर पैशाची मागणी करण्यासाठी त्यांचा वापर केला गेला. जर त्यांनी पैसे दिले नाहीत तर त्यांच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव आणला जात असे. भीतीपोटी काही महिला पैसे देत असत, तर काहींना धर्मांतर करण्यास भाग पाडले गेले. आरोपींच्या मोबाईलमध्ये पुरावे सापडले. महिलांना नेण्यासाठी वापरलेली वाहने देखील जप्त करण्यात आली. (वृत्तसंस्था)

### मोफत जिम प्रशिक्षण देण्याचे आमिष

पोलिसांचे म्हणणे आहे की आरोपींनी महिलांना मोफत जिम प्रशिक्षण देण्याचे आमिष दिले. प्रशिक्षणादरम्यान, त्यांचे अनेक फोटो काढले गेले आणि फोन नंबरची देवाणघेवाण झाली. सुरुवातीला, संभाषणे जिम आणि फिटनेसपुरती मर्यादित होती. परंतु हळूहळू वैयक्तिक संभाषणे सुरू झाली. महिलांना बुरखा घालून बाजारपेठ, मंदिरे, तीर्थक्षेत्रे आणि इतर ठिकाणी नेले जात होते. चित्रफित प्रसारित करण्याची धमकी देऊन त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी बाध्य केले जायचे.


मिर्झापूर पोलिसांनी अटक केलेले आरोपी

## महत्त्वाचे

### महायुतीचा 'बिनविरोध पॅटर्न' कायम

**मुंबई:** महानगरपालिका निवडणुकीप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्येही महायुतीचा 'बिनविरोध पॅटर्न' कायम असून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये ११ उमेदवार बिनविरोध झाले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत भाजपचे चार तर शिवसेनेचा एक, असे पाच उमेदवार बिनविरोध झाले आहेत. तर पंचायत समिती गणातून भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध ठरले आहेत. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख २७ जानेवारी आहे. केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि मंत्री नितेश राणे यांच्या व्यूहरचनेमुळे अपक्ष आणि प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.

# उच्च न्यायालये प्राथमिक रक्षक

### सरन्यायाधीश सूर्य कांत यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, २४ जानेवारी**

उच्च न्यायालयांनी कायद्याच्या राज्यांतील चुकांबाबत अधिक सक्रिय आणि सतर्क राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी शनिवारी केले. उच्च न्यायालये प्राथमिक संरक्षक आहेत. न्याय मिळण्यास विलंब होणे म्हणजे केवळ न्याय नाकारणे नव्हे, तर तो न्याय नष्ट करण्यासारखे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



मध्यस्थी आणि सलोख्याच्या यंत्रणांना प्रोत्साहन देण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला. येथे त्यांनी दोन कार्यक्रमांना संबोधित केले. त्यापैकी एक हा फली नरिमन स्मृती व्याख्यान होते, तर दुसरा म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला त्यांनी उत्तर दिले.

उच्च न्यायालयांना अधिक सक्रिय राहण्याचे आणि कायद्याच्या राज्यांमधील पद्धतशीर चुकांबाबत सतर्क राहण्याचे आवाहन सूर्य कांत यांनी फली नरिमन स्मृती व्याख्यानात केले. (वृत्तसंस्था)

### ४२ देशांत राबणार एसआयआर सदृश प्रक्रिया

**नवी दिल्ली :** मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी भारताने अवलंबलेली विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) पद्धत आता केवळ भारतापुरती मर्यादित राहणार नाही. ती इतर लोकशाही देशांमध्येही राबवली जाणार आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापनावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेल्या देशांनी आपल्या देशांमध्ये मतदार यादी शुद्धीकरणासाठी अशाच प्रकारची प्रक्रिया राबवण्याचा ठाम निर्धार केला. नवी दिल्लीत पार पडलेल्या 'भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन परिषद २०२६'च्या अंतिम दिवशी ४२ देशांमधील निवडणूक व्यवस्थापन संस्था आणि २७ देशांमधील मिशन प्रमुखांनी स्वच्छ आणि त्रुटीरहित मतदार यादी तयार करणे, तसेच प्रत्येक मतदाराला फोटो ओळखपत्र उपलब्ध करून देणे, या मुद्द्यांवर एकमत दर्शवले. भारत मंडपम् येथे झालेल्या विविध सत्रांमध्ये भारतीय निवडणूक आयोगाने राबवलेल्या एसआयआर प्रक्रियेवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि ही पद्धत लोकशाही अधिक बळकट करणारी असल्याचे मत अनेक प्रतिनिधींनी व्यक्त केले.

### मुलीला ब्लॅकमेल करणारा शे. शाहरुख जाळ्यात

**वाशीम :** येथील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस ब्लॅकमेल करून तिच्याशी लग्न करण्याचा तगादा लावणाऱ्या आरोपीस वाशीम पोलिसांनी अटक केली असून, तिच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शे. शहारुखविरुद्ध बीएनएस व पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. आरोपी शे. शहारुख २४ जानेवारी रोजी मध्यरात्रीनंतर मुलीच्या घरी गेला व लग्नासाठी तकादा लावला. तू माझ्याशी लग्न केले नाही तर मी तुमच्या घराच्या गेटवरच फाशी घेईल, अशी धमकी देऊन पळून गेला. शे. शहारुख त्या मुलीला मागील ११ महिन्यांपासून त्रास देत आहे. किराणा दुकानात ती एकटी बसली असताना आरोपी तिच्याशी सलगी करण्याचा प्रयत्न करून लग्नाचा तगादा लावायचा. एमएससीआयटीच्या क्लासला जातानाही आरोपी तिचा पाठलाग करून धमक्या देत असे. आरोपीने काही महिन्यांपूर्वी मुलीला आपला मोबाईलही दिला होता. आरोपी मोबाईलवर फोन व मेसेज करून लग्न करण्यासाठी जबरदस्ती करायचा. आपल्या आई- वडिलाच्या जीवाचे काही बरेवाईट होऊ नये, या भीतीने मुलगी आरोपीशी बोलायची, असे तक्रारीत नमूद केले आहे. २४ जानेवारी रोजी रात्री अशाच दहशतीत आरोपी शे. शहारुखकडून धोका असल्याचे मुलीच्या आईने तक्रारीत नमूद केले.

# टी-२० विश्वचषकातून बांगलादेश संघ बाहेर

◆ **नवी दिल्ली, २४ जानेवारी**

आयपीएलमधून मुस्तफिझूर रहमानला वगळल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव भारतात प्रवास करण्यास नकार दिल्यामुळे आगामी टी-२० विश्वचषकात बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड करण्यात आली आहे, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बांगलादेश क्रिकेट मंडळाला (बीसीबी) अधिकृतपणे कळवले आहे.

अध्यक्ष जय शाह यांच्यासह आयसीसीचे वरिष्ठ पदाधिकारी शुक्रवारी दुबईत बैठक झाली. या बैठकीत बांगलादेशला टी-२० विश्वचषकातून बाहेर करण्याचा निर्णय घेण्यात आला. जागतिक क्रिकेट संस्थेचा निर्णय कळवण्यासाठी सायंकाळी उशिरा बीसीबीचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल यांना एक ई-मेल पाठवण्यात आला आहे.

(वृत्तसंस्था)

### पाकिस्तान संघाचा निर्णय सरकारच्या हाती

**लाहोर :** बांगलादेशला स्पर्धेतून वगळल्यानंतर, आगामी टी-२० विश्वचषकात आपला राष्ट्रीय संघ सहभागी होणार की नाही, याबाबत अंतिम निर्णय पाकिस्तान सरकार घेईल, असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी शनिवारी सांगितले. हा विषय पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासमोर मांडला जाईल. शरीफ हे सध्या देशाबाहेर आहेत आणि ते परत आल्यानंतर यावर चर्चा होईल, असे ते म्हणाले.

# अमेरिका हटवणार भारतावरील २५ टक्के शुल्क

## अमेरिकी अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांचे संकेत

◆ **दावोस, २४ जानेवारी**

रशियाकडून होणाऱ्या तेल खरेदीच्या मुद्यावर भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत लादलेल्या ५० टक्के शुल्कापैकी २५ टक्के शुल्क कमी करण्याचे संकेत अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी दिले आहेत. या माध्यमातून अमेरिकेने नरमाईची भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले.



भारताने रशियन तेल खरेदी कमी केली आहे. त्यामुळे २५ टक्के शुल्क कमी करण्याचा मार्ग खुला असल्याचे स्कॉट बेसेंट यांनी एका मुलाखतीत सांगितले. भारतीय तेलशुद्धीकरण कंपन्यांनी रशियाकडून होणाऱ्या तेलखरेदीत कपात केल्याने शुल्कातील कपातीचा मार्ग मोकळा झाल्याचे बेसेंट यांनी सांगितले. शुल्क आकारणीचा उद्देश यशस्वी ठरला, असा दावा बेसेंट यांनी केला. ते मागे घेण्याचा मार्ग आता मोकळा होत आहे, असे त्यांनी सांगितले.

अमेरिकेने भारतावर ५०टक्के शुल्क लादले आहे. यातील २५ टक्के भारत अमेरिकी साहित्यावर लादत असलेल्या शुल्काचे उत्तर आहे तर, अतिरिक्त २५ टक्के शुल्क भारत रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याने लादण्यात आले. अमेरिकेसोबत मुक्त व्यापार करार करावा यासाठी भारतावर शुल्क लादण्यात आल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. रशियन तेलाची आयात या मुद्यावर भारताच्या विरोधात युरोपियन युनियनने टॅरिफ लादण्यास नकार दिला होता, असा दावा अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी केला आहे. युरोपियन युनियनला भारतासोबतच्या मुक्त व्यापार कराराला अंतिम रूप द्यायचे असल्याने त्यांनी हा नकार दिल्याचे स्कॉट बेसेंटयांनी सांगितले.

युरोपियन युनियनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांचा भारत दौरा शनिवारपासून सुरू होत असताना स्कॉट बेसेंट यांनी उपरोक्त टीका केली आहे. या दौऱ्यात त्या भारतासोबत मोठा व्यापार करार करणार असल्याचे सांगितले जात आहे.

(वृत्तसंस्था)

### युरोपने उपलब्ध करून दिला निधी

भारतीय तेल शुद्धीकरण प्रकल्पांमधून आलेले रशियन तेल खरेदी करून युरोपने स्वतःच्या विरोधातील युद्धाला निधी उपलब्ध करून दिला, असा आरोप स्कॉट बेसेंट यांनी केला. एकीकडे युरोप युक्रेनच्या बाजूने उभी राहते आणि दुसरीकडे रशियन तेलावर शुल्क लादण्यास नकार देऊन रशियाला निधी उपलब्ध करून देत आहे. बिडंबन आणि युरोपियन देशांकडून शुद्धीकरण उत्पादने खरेदी करणे म्हणजे मुर्खपणाची सीमा असल्याची टीका त्यांनी केली.



रांची येथे आयोजित 'जनजातीय संवाद' कार्यक्रमात दीपप्रज्वलन करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत. कार्यक्रमाला झारखंडमधील विविध जिल्ह्यांमधील आदिवासी समुदायांचे प्रतिनिधी, बुद्धिजीवी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते

# काहीही झाले तरी जि.प.चा अध्यक्ष 'भाजपा'चाच होईल

### ● पालकमंत्री गोरे यांचा विश्वास

**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

भारतीय जनता पार्टी सोलापूर जिल्ह्यासह राज्यभरात अग्रक्रमावर आहे. नगरपालिका व महानगर पालिकांच्या निवडणुकांवरुन हे सिध्द झाले आहे. त्यामुळे सर्व विरोधी पक्ष आमच्या विरोधात एकवटत आहेत. परंतु काहीही झाले तरी सोलापूर जिल्हा परिषदेचा अध्यक्ष 'भाजपा'चाच होईल, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.



सोलापूर महानगर पालिकेचे महापौर, उपम हापौर पदाच्या निवडीसंदर्भात भारतीय जनता पार्टीच्या नूतन नगरसेवकांच्या बैठकीच्या निमित्ताने शनिवारी ते सोलापुरात आले होते. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांनी महायुतीतील कोणत्याही पक्षावर अथवा नेत्यांवर जास्त टीका करता कामा नये. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने दोन्ही शिवसेना तसेच राष्ट्रवादी एकत्र आले याकडे लक्ष वेधले असता तें म्हणाले, महायुती मधील पक्षांनी आचारसंहिता पाळणे गरजेचे आहे. अनैसर्गिक युती वा आघाडी केल्यास जनता स्वीकारणार नाही. 'भाजपा'चा पराभव करणे एक, दोन पक्षांना करणे शक्य नसल्याने पाच-पाच पक्ष एकत्रित येऊन अस्तित्वासाठी लढत आहेत.

सोलापूर जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने 'भाजपा'मध्ये घराणेशाही सुरु आहे या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, एखाद्या नेत्याची पत्नी, भाऊ जर उमेदवार असेल तर अशा व्यक्ती प्रथम भाजपचे कार्यकर्ते आहेत, हे लक्षात घेण्याची गरज आहे. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेत 'भाजपा'चे ८७ नगरसेवक निवडून आले आहेत. यामध्ये अनेक नगरसेवकांकडे महापौर होण्याची क्षमता आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# सात खंडांवर फडकणार अयोध्येचा 'धर्मध्वज'

## भक्तिमय वातावरणात यात्रेचा शुभारंभ ● व्यापक सांस्कृतिक चळवळीने घेतला आकार

◆ **अयोध्या, २४ जानेवारी**

अयोध्येतून एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक धार्मिक उपक्रम सुरू झाला आहे. राम मंदिराच्या शिखरावर फडकवला जाणारा पवित्र धर्मध्वज आता जागतिक स्तरावर पोहोचणार आहे. सनातन संस्कृतीचा संदेश संपूर्ण विश्वात पोहोचावा या संकल्पनेतून रामध्वज यात्रा सुरू करण्यात आली आहे. हा ध्वज सातही खंडांवर फडकवण्याची प्रतिज्ञा यावेळी करण्यात आली आहे.

अयोध्येतील रामजन्मभूमी परिसरात वैदिक मंत्रोच्चार, पूजा-अर्चा आणि भक्तीमय वातावरणात या यात्रेचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमात संत, साधू आणि असंख्य रामभक्त उपस्थित होते.



राम मंदिराच्या शिखरावर प्रतिष्ठापित झालेला पवित्र ध्वज आता केवळ अयोध्येचे प्रतीक न राहता, सनातन धर्माची जागतिक ओळख होणार आहे. या मोहिमेमुळे ही यात्रा केवळ धार्मिक उपक्रम न राहता एक व्यापक सांस्कृतिक चळवळ ठरत आहे. या जागतिक रामध्वज यात्रेचे नेतृत्व हरियाणातील हिसार येथील सुप्रसिद्ध गिर्यारोहक नरेंद्र कुमार करत आहेत. त्यांच्या मते, हा धर्मध्वज म्हणजे भारतीय संस्कृती, सनातन धर्म आणि भगवान श्रीराम यांच्या मूल्यांचे प्रतिक आहे.

२०२६ च्या अखेरीस सात खंडांवर हा ध्वज फडकवण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या यात्रेचा पहिला टप्पा नेपाळमध्ये पार पडला. २१ डिसेंबर रोजी यात्रेची सुरुवात झाली आणि २९ डिसेंबर रोजी नेपाळमध्ये धर्मध्वज फडकवण्यात आला. पुढील टप्प्यांत ही यात्रा विविध देशांमधून प्रवास करत जगाच्या इतर खंडांपर्यंत पोहोचणार आहे.

'अयोध्येतून शिखरापर्यंत' अशी संकल्पना असलेली ही यात्रा आपल्या प्रकारची एक आगळीवेगळी धार्मिक मोहीम ठरत आहे.

या उपक्रमामागे केवळ धार्मिक भावनाच नाहीत, तर सामाजिक उद्देशही आहे. आजची तरुण पिढी भौतिक जगात गुंतून आपल्या संस्कृतीपासून दूर जात असल्याची चिंता नरेंद्र कुमार यांनी व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

### जीवनमूल्यांचा जागतिक स्तरावर प्रचार

रामध्वज यात्रेच्या माध्यमातून तरुणांना त्यांच्या सांस्कृतिक मुळांशी, धर्माशी आणि भारतीय मूल्यांशी पुन्हा जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या यात्रेचा मुख्य हेतू भगवान श्रीराम यांच्या जीवनमूल्यांचा जागतिक स्तरावर प्रचार करणे हा आहे. त्यांचे त्याग, कर्तव्यनिष्ठा, सत्य आणि आदर्श आजही समाजाला दिशा देऊ शकतात, असा विश्वास कुमार यांनी व्यक्त केला.

रोखठोक

# भविष्याची घडी बसविण्यासाठी

**दिनेश गुणे**

स्वित्झर्लंडमधील लॅण्ड वासर नदीच्या काठावर वसलेल्या, स्विस आल्प्स पर्वताच्या प्लेसूर आणि अल्बूला या पर्वतरागांनी वेढलेल्या आणि जेमतेम अकरा-बारा हजार लोकवस्ती असलेल्या, युरोपातील सर्वांत उंचीवर वसलेल्या दावोस या शहरात दरवर्षी भरविल्या जाणाऱ्या जागतिक आर्थिक फोरम परिषदेच्या बैठकीत जगभरातील मोठे नेते आणि उद्योगपतींना निमंत्रित केले जाते. जगभरातील जवळपास अडीच हजारांहून अधिक नेते, उद्योगपतींचा सहभाग असलेल्या या बैठकीकडे 'एलिट क्लास परिषद' म्हणून पाहिले जाते. दावोसमधील या परिषदेत सरकारी आणि खाजगी व्यक्ती, संघटना एकत्र येऊन जागतिक विकासासाठी निर्णय घेतात. जागतिक आर्थिक परिषद या १९७१ मध्ये स्थापन झालेल्या खाजगी संस्थेचे मुख्यालय जिनिव्हा या स्वित्झर्लंडच्या राजधानीमध्ये आहे. या संस्थेला आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून मान्यता मिळालेली आहे. जागतिक व्यवसाय, राजकारण, शिक्षण आणि इतर क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून जागतिक क्षेत्रीय आणि औद्योगिक विकासाला चालना देणे हे या संस्थेचे उद्दिष्ट असल्याने या बैठकीत व्यापार, राजकारण, कला, शिक्षण आणि इतर क्षेत्रांतील मोठ्या व्यक्ती सहभाग घेतात. १९९७ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान एच. डी देवेगौडा हे पहिल्यांदा या परिषदेत सहभागी झाले आणि पुढे तब्बल २१ वर्षांनंतर, २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत हजेरी लावली. 'मोडकळीस आलेल्या जगाच्या भविष्यनिर्मितीसाठी भागीदारी', अशी त्या वर्षीच्या परिषदेची संकल्पना होती. भारतातील सुमारे २० उद्योगांसह, काही नामवंत कलावंतदेखील त्या परिषदेत उपस्थित राहिले आणि विशेष म्हणजे, भारतीय खाद्यसंस्कृतीचे आणि योगविद्येचे प्रात्यक्षिक हे त्या वर्षी प्रथमच त्या परिषदेचे आकर्षण ठरले.

सरत्या आठवड्यात ही वार्षिक परिषद पार पडली आणि त्यावर राजकीय चर्चादेखील सुरू झाली. दावोस परिषदेत महाराष्ट्राचा बोलबाला सुरू झाला, त्याला दोन वर्षांचा काळ उलटला आहे. यंदाच्या परिषदेत, तर महाराष्ट्राचा अक्षरशः गजर होत असल्याचेच चित्र दिसले. दावोस म्हणजे केवळ सामंजस्य करारांचे ठिकाण नाही, तर जगभरातील नव्या तंत्रज्ञानाच्या, माहितीच्या अद्ययावत प्रवाहांची दिशा महाराष्ट्राकडे वळविण्याच्या प्रामाणिक प्रयत्नांची ती एक कसोटीदेखील आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परिषदेच्या प्रारंभीच्या काही तासांतच या महाकसोटीचे आव्हान पेलून महाराष्ट्राच्या औद्योगिक, वैज्ञानिक, तांत्रिक प्रगतीचे मार्ग विस्तृत केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायलाच हवे! महाराष्ट्र उद्योगस्नेही होत आहे, जागतिक प्रगतीच्या पावलांनी आपला मोहरा महाराष्ट्राकडे वळविण्यास सुरुवात केली आहे आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र ही उद्योगविश्वाच्या विश्वासाची भूमी ठरली आहे, असा या वाटचालीचा स्पष्ट संकेत महाराष्ट्रास निश्चितच सुखावणारा आहे. यंदाच्या परिषदेत पहिल्याच दिवशी हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, विजेवरील स्वयंचलित वाहन उद्योग, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा आदी क्षेत्रांतील सुमारे १४ लाख ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा ओघ महाराष्ट्रात येणार हे स्पष्ट झाले आहे. त्याबाबत झालेले सामंजस्य करार ही या प्रक्रियेची पहिली पायरी आहे आणि महाराष्ट्रातील उद्योगस्नेही सामाजिक संस्कृतीवर उद्योगक्षेत्राने दाखविलेल्या विश्वासाचा ठळक पुरावादेखील आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही', अशी ग्वाही मुख्यमंत्रिपदी विराजमान होताच देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेस दिली होती. तो महाराष्ट्राच्या सामाजिक संस्कृतीवरील विश्वास होता आणि आता जगातून महाराष्ट्राकडे वळत असलेला गुंतवणुकीचा ओघ पाहता, जागतिक उद्योगविश्वासही तसाच विश्वास वाटत असल्याचे सिद्ध झाले आहे. कोणत्याही राज्यात, देशात गुंतवणूक करण्यास जगभरातील नामांकित उद्योग पुढे येतात, तेव्हा त्या राज्यात किंवा देशात केवळ औद्योगिक प्रगती होते, या प्रगतीतून रोजगाराच्या संधी निर्माण होतात, त्यामुळे जनतेचे जीवनमान सुधारते हा फायदा तर होतोच, पण जीवनमान सुधारलेली जनता समाधानी होत असल्याने, अस्थिर मानसिकता दूर होऊन सामाजिक सामंजस्याचे वातावरण निर्माण होते, हा याचा सर्वांत मोठा फायदा असतो.

महाराष्ट्रात अगदी कालपरवापर्यंत उद्योगविश्वाला सामाजिक मानसिकतेची धास्ती वाटत होती. खंडणीखोरी, सुविधांचा अभाव, रोजगारक्षम वर्गाची विश्वासार्हता अशा अनेक मुद्द्यांमुळे उद्योग सुरू करणे तर दूरच, पण अस्तित्वात असलेले उद्योगही आश्वस्तपणे चालविण्याबाबत उद्योगविश्व साशंक असल्याचे चित्र होते. महाविकास आघाडी सरकार सत्तेवर असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तर महाराष्ट्राच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे राज्यातील वाढत्या खंडणीखोरी व राजकीय दबावामुळे निर्माण झालेल्या अविश्वासाच्या वातावरणाविषयी लेखी नाराजीदेखील व्यक्त केली होती. अशाच स्थानिक कारणांमुळे काही उद्योग बंद पडत असल्याच्या तर काहींनी गाशा गुंडाळण्याची तयारी सुरू केल्याच्या बातम्याही पसरल्याने, उद्योगविश्वात महाराष्ट्राविषयी अविश्वासाचे वातावरण पसरले होते. आता ते चित्र बदलले असून महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी उद्योगक्षेत्र उत्सुक असल्याची ग्वाही देणारे नवे, आश्वस्त करणारे चित्र दिसू लागले आहे, ही राज्याच्या दृष्टीने समाधानाचीच बाब आहे. महाराष्ट्रावरील हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस परिषदेतील सहभागी उद्योगांना दिली आहे. आवश्यक व दर्जेदार सुविधा, रोजगारक्षम मनुष्यबळ आणि सुरक्षित वातावरण या उद्योगांच्या पहिल्या गरजा असतात. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याचीही हमी दिली आहे. यंदाच्या परिषदेतील गुंतवणुकीचा आकडा विक्रमी ठरेल आणि 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' या ग्वाहीवरील राज्याचा विश्वास दृढ होईल असेच हे चित्र आहे.

केवळ उद्योगांमधील गुंतवणुकीबरोबरच, विकासाचा विश्वासही अशा परिषदांमधून निर्माण होत असतो. तिसरी मुंबई ही एक संकल्पना गेल्या अनेक दशकांपासून मांडली जात होती. आता ही संकल्पना प्रत्यक्षात येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याच तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीची मुहूर्तमेढ नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या निर्मितीतून रोवली गेली आहेच, त्यात भर म्हणून आता तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून मिरविण्याचा मान रायगड-पेण ग्रोथ सेंटरला मिळाला आहे. अशा ग्रोथ सेंटरची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केल्यानंतर लगेचच



नवी मुंबई विमानतळापासून दहा किलोमीटरच्या परिघात गुंतवणूक करण्यासाठी उद्योगांनी तयारी दाखविली आणि सुमारे एक लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे सामंजस्य करारही पार पडले, हा प्रगतीच्या पावलांसोबत आलेला शुभशकुन आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील अखेरच्या माणसापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे अपरिहार्य आहे. त्यामुळे, या तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय सेवा क्षेत्रातील स्टार्टअपकरिता अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा सरकारचा संकल्पदेखील उल्लेखनीय आहे.

भांडवलापेक्षादेखील विश्वासार्हता महत्त्वाची असते, या मताचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेकदा पुनरुच्चार केला आहे. दावोस परिषदेतील गुंतवणुकीतून विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाल्यामुळेच महाराष्ट्राकरिता ही परिषद वर्षागणिक नव्या संधी, नवे विचार आणि नव्या कल्पनांची जन्मदात्री ठरली आहे. गेल्या वर्षीच्या परिषदेत महाराष्ट्रात १६ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले होते. गेल्या दशकभरात महाराष्ट्राने गुंतवणुकीबाबत केलेल्या प्रगतीतून आता विकासाचा विश्वास वास्तवात येण्यास सुरुवात झाली आहे. याआधीच्या करारांपैकी अनेक प्रकल्प अंमलबजावणीच्या दिशेने झपाट्याने वाटचालही करू लागले आहेत आणि विशेष म्हणजे, या करारांमुळे, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विकासाची संधी आणि त्याची फळे पोहोचतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. मुंबई-पुणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणाच्या कक्षा आता विस्तारत असून त्यांनी मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रालाही कवेत घेतले आहे. महानगरांभोवती घुटमळणारा विकास आता ग्रामीण आणि विकासापासून वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्या प्रदेशांकडे वाटचाल करत आहे.

जगभरातील उद्योगविश्वात आणि प्रमुख नेत्यांच्या वर्तुळात महाराष्ट्राचा असा बोलबाला सुरू असताना, प्रत्यक्ष महाराष्ट्रात मात्र या परिषदेतील कामगिरीच्या नावाने बोटे मोडण्यासाठी काही असंतुष्टांची स्पर्धा सुरू होती. जागतिक मंच म्हटल्या जाणाऱ्या परिषदेत जायचे आणि भारतातील उद्योगांसोबत करार करून त्याचा गवगवा करायचा, असा प्रचार करत या मंडळींनी राज्यातील नव्या गुंतवणूक संधींची खिल्ली उडविण्याची संधीदेखील साधली. गेल्या सुमारे तीन दशकांपासून ही परिषद दावोसमध्ये भरविली जात आहे आणि १९९७ नंतरच्या दोन दशकांपासून भारतातील अनेक नामांकित कंपन्या, उद्योगपती सहभागी होऊन जगाच्या उद्योगक्षेत्रात भरीव कामगिरी बजावण्यात आपली क्षमता सिद्ध करत आहेत. या परिषदेत सहभागी झालेल्या भारतीय कंपन्या केवळ दावोसमध्ये जाऊन भारतात गुंतवणूक करण्याच्या हेतूने उपस्थित राहिल्या नव्हत्या. जगातील अनेक देशांत गुंतवणुकीसाठीच्या संधी शोधण्याची त्यांची क्षमता या मंचावरून दाखवत होत्या. जगभरातील गुंतवणूक संधींचा शोध घेत असताना, भारतातच आणि विशेषतः महाराष्ट्रातच गुंतवणूक करून आपल्या क्षमतांची क्षितिजे विस्तारण्याची या उद्योगांची मानसिकता म्हणजे, महाराष्ट्राच्या गुंतवणूकस्नेही वातावरणावरील विश्वासाचा पुरावा आहे. जगाच्या पाठीवर गुंतवणूक करून जे काही लाभ मिळू शकतात, तेच लाभ आणि त्याच संधी महाराष्ट्राच्या मातीतही आपल्याला मिळू शकतात, हा त्यांचा विश्वास या करारांमधून अधोरेखित झाला आहे. महाराष्ट्र ही खऱ्या अर्थाने उद्योगांच्या उभारणीसाठी योग्य ठरणारी, उद्योगस्नेही भूमी आहे, याची ही पावती मानावी लागेल. दुसरे म्हणजे, दावोसच्या या परिषदेत महाराष्ट्राने केवळ भारतातील उद्योगांसोबत करार केलेले नाहीत. जागतिक पातळीवरील अन्य अनेक उद्योगांनीही याच परिषदेत महाराष्ट्रातील गुंतवणुकीबाबत दाखविलेली उत्सुकता, महाराष्ट्राच्या दालनास भेटी देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केलेली चर्चा पाहता, महाराष्ट्राच्या सकारात्मक वातावरणाचा विश्वास जागतिक उद्योगविश्वाला पटल्याचेही स्पष्ट झाले आहे. पायाभूत सुविधा आणि कोणत्याही उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ यांच्या उपलब्धतेची खात्री नसेल, तर कोणताही उद्योग गुंतवणूक करत नाही. महाराष्ट्राने या दोनही क्षेत्रांत भरीव कमाई केली आहे, असा याचा अर्थ आहे. जगभरातील उद्योगक्षेत्रांतील कोणत्याही उद्योगाने महाराष्ट्रात गुंतवणूक केली, तर त्यासाठी आवश्यक असलेले रोजगारक्षम मनुष्यबळ महाराष्ट्राकडे आहे, याची खात्री जगाला पटली आहे. त्यामुळे, या गुंतवणुकीतून केवळ रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेतच, पण या संधींचा लाभ घेण्याचे कौशल्य आणि क्षमता असलेली रोजगारक्षम तरुणाईदेखील महाराष्ट्रातच आहे, हेदेखील यातून अधोरेखित झाले आहे. कौशल्य विकासाच्या क्षेत्रात महाराष्ट्राने केलेल्या प्रगतीचा हा एक स्पष्ट पुरावा प्रत्यक्षपणे पाहावयास मिळतो, हे दावोस परिषदेतील जागतिक उद्योगांच्या महाराष्ट्राबाबतच्या दृष्टिकोनातून उघड झाले आहे.

थोडक्यात, जागतिक आर्थिक परिषद म्हणजे भारतीय राज्यांसाठी केवळ आंतरराष्ट्रीय व्यासपीठ नसून, 'गुंतवणूक आकर्षणाची स्पर्धा' ठरलेली आहे. गेल्या दशकात, विशेषतः २०१५ नंतर आणि ठळकपणे २०२२ नंतर, महाराष्ट्राने दावोस परिषदेत जागतिक गुंतवणूक करारांच्या बाबतीत आघाडी घेतल्याचे चित्र दिसते. २०२२ ते २०२६ या कालखंडात दावोस परिषदेत महाराष्ट्रासाठी झालेल्या सामंजस्य करारांची रक्कम अभूतपूर्व अशीच आहे. २०२२ मध्ये सुमारे ३० हजार कोटी, २०२३ मध्ये जवळपास ८८ हजार कोटी, २०२५ मध्ये थेट १५.७ लाख कोटी आणि २०२६ मध्ये पहिल्याच दिवसात १४.५ लाख कोटींच्या करारांची घोषणा झाली. एकूण आकडे पाहता, महाराष्ट्राने 'गुंतवणुकीचे इंजिन' म्हणून स्वतःची प्रतिमा अधिक मजबूत केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मात्र, विकासाच्या वाटचालीचा कस आकड्यांच्या पलीकडे जाऊन अंमलबजावणीच्या उंबरठ्यावर लागतो. दावोस येथे झालेले सामंजस्य करार म्हणजे कायदेशीर बंधनकारक गुंतवणूक नव्हे, तर उद्देशाची घोषणा असते. त्यातील किती करार प्रत्यक्ष प्रकल्पात अवतरतात, हा कळीचा मुद्दा वारंवार उपस्थित केला जात असतो. त्यामुळेच, राज्य सरकारचा अंमलबजावणीबाबतचा दावादेखील लक्षात घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांत दावोस करारांपैकी ६० ते ७० टक्के प्रकल्प प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत. काही अहवालांनुसार २०२५ मधील करारांपैकी सुमारे ८५ टक्के प्रकल्प प्रारंभिक टप्प्यात असल्याचे सांगितले जाते. तरीही, 'जमीन वाटप, पर्यावरण मंजुरी, पायाभूत सुविधा, स्थानिक विरोध' अशा अडथळ्यांमुळे अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे कागदावरच राहिल्याचा अनुभव महाराष्ट्राला नवा नाही. गुंतवणूक घोषणांबरोबरच लाखो रोजगारनिर्मितीचे दावेदेखील केले जातात. २०२५ च्या दावोस परिषदेनंतर सुमारे १६ लाख रोजगार निर्माण होतील, असा दावा करण्यात आला. मात्र, डेटा सेंटर्स, एआय हब्स, फायनान्शियल इन्फ्रास्ट्रक्चर यासारख्या क्षेत्रांत गुंतवणूक मोठी असली तरी थेट रोजगार अत्यंत मर्यादित असतो. उदाहरणार्थ, दहा हजार कोटींचा डेटा सेंटर प्रकल्प प्रत्यक्षात काहीशेच थेट नोकऱ्या निर्माण करतो. उलट मॅन्युफॅक्चरिंग, विजेवरील वाहने, बॅटरी उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स असेम्ब्ली यासारख्या क्षेत्रांत रोजगारनिर्मिती तुलनेने जास्त असते. त्यामुळे, दावोस परिषदेनंतर जाहीर होणारे रोजगाराच्या संधींचे आकडे हे बहुतांश अनुमानाधारित असून, प्रत्यक्षात किती युवकांना कायमस्वरूपी नोकरी मिळते याचा स्वतंत्र आणि पारदर्शक हिशेबदेखील उघड होणे गरजेचे आहे. असे असले तरी, दावोसच्या निमित्ताने एक सकारात्मक बदल दिसतो. तो म्हणजे, गुंतवणुकीचा भौगोलिक विस्तार! मुंबई महानगर प्रदेश अजूनही सुमारे ४० टक्के गुंतवणूक खेचतो, हे वास्तव असले तरी त्यापलीकडच्या महाराष्ट्रातही गुंतवणूकस्नेही वातावरण निर्माण करण्यात राज्य सरकार यशस्वी ठरले आहे. विदर्भात हरित ऊर्जा, लॉजिस्टिक्स, विजेवरील वाहन निर्मिती आदी प्रकल्प मोठ्या प्रमाणात येत आहेत. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रालाही काही प्रमाणात औद्योगिक संधी मिळत आहेत. तथापि, मराठवाड्याच्या औद्योगिक अनुशेषाची खंत अजूनही संपूर्णपणे संपलेली नाही. मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाचा वाटा अजूनही अपेक्षेपेक्षा कमी असून पाण्याची टंचाई, कौशल्याचा अभाव आणि पायाभूत सुविधांची मर्यादा हे प्रश्न कायम आहेत. त्यामुळे 'गुंतवणूक आली' इतक्यावर समाधान न मानता 'गुंतवणूक कुठे आणि कशी आली' याचा विचार करणे गरजेचे ठरते. या परिषदेतील विकासाचे एक सकारात्मक चित्र ज्याप्रमाणे उभे राहते, तसेच काही राजकीय संकेतदेखील मिळत असतात. दावोस परिषद सत्ताधाऱ्यांसाठी जागतिक व्यासपीठावर राज्याची प्रतिमा उंचावण्याचे साधन ठरते. कोटींच्या घोषणांमुळे राजकीय श्रेयवाद होतो. यंदाच्या दावोस परिषदेमुळे महाराष्ट्राला जागतिक गुंतवणूक नकाशावर निश्चितच अग्रस्थान मिळाले आहे. हरित ऊर्जा, मॅन्युफॅक्चरिंग आणि नव्या तंत्रज्ञानामुळे राज्याच्या औद्योगिक रचनेत दीर्घकालीन बदल घडण्याची शक्यता आहे. मात्र गुंतवणूक करारांचे आकडे, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि रोजगारनिर्मिती यामधील दरी कमी करणे हेच पुढील काळातील खरे आव्हान आहे.

dineshgune@gmail.com

---

रविवारची पत्रे

## रथसप्तमी आणि दान



रथसप्तमी हा सूर्याच्या उपासनेचा दिवस आहे. अदिती आणि कश्यप यांचा पुत्र सूर्य याचा हा जन्मदिवस आहे असे मानले जाते. या दिवशी भक्त सकाळी सूर्योदयापूर्वी स्नान करतात. लाल फुले, चंदन, कापूर अर्पण करून छोट्या कलशातून सूर्याला अर्घ्य देतात. अशा पूजेने समृद्धी प्राप्त होते. सात घोडे (उच्चैःश्रवा) आणि सारथी अरुण (गरुडाचा मोठा भाऊ) यासह सूर्याची पूजा करताना सूर्याची सोन्याची प्रतिमा रथात ठेवतात. तुळशी वृंदावनाच्या समोर रथ आणि सूर्य यांची रांगोळी काढतात. या दिवशी अंगणात मातीच्या एका छोट्या बोळक्यात दूध ठेवून ते उकळवून आटवतात व सूर्याला खिरीचा नैवेद्य दाखवतात. या दिवसाचे व्रत म्हणून महत्त्व असल्याने या दिवशी उपवासही केला जातो. महाराष्ट्रात मकरसंक्रातीला सुरू झालेले स्त्रियांचे तिळगुळाचे व हळदीकुंकवाचे दैनंदिन समारंभ रथसप्तमीच्या दिवशी संपन्न होतात. रथसप्तमी ही वसंत पंचमीनंतर दोन/तीन दिवसांनी येते. या दिवशी दिलेले दान विशेष लाभदायी मानले जाते. दान म्हणजे कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता गरजू व्यक्तीला मदत करणे, ज्यात अन्नदान, वस्त्रदान, विद्यादान, नेत्रदान, रक्तदान, अवयवदान, अभयदान असे अनेक प्रकार आहे.

**दानेन प्राप्यते स्वर्गो !**

दान दिल्याने स्वर्गप्राप्ती होते. जे दान न मागता दिले जाते ते सर्वांत उत्तम दान मानले जाते. माता, पिता, गुरू, मित्र, विनम्र आणि उपकारी व्यक्ती, दीन दुबळे व श्रेष्ठ व्यक्तींना दिलेले दान नेहमीच फलदायी ठरते. जे धन चांगल्या मार्गाने म्हणजे धर्माच्या मार्गाने कमावले असेल तेच दानात द्यावे. दान हे पुण्यकारक मानले जाते. दान म्हणजे फक्त वस्तू देणे नव्हे, तर हृदयातून केलेली सेवा आहे. दान देताना महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे ते नेहमी योग्य व्यक्तीला म्हणजे सत्पात्री असावे, दान नेहमी निःस्वार्थ भावनेने करावे. एका हाताने केलेले दान दुसऱ्या हाताला कळू नये. असे जरी असले तरी कधी कधी एखाद्याच्या दानाने इतरांना दान देण्याची प्रेरणा मिळते.

**ध्यानं परं कृतयुगे, त्रैतायाम ज्ञानमुच्यते**
**द्वापारे यज्ञ मेवाहुः दानमेव कलौ युगे**

म्हणजे कृतयुगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलियुगात दान ही सर्वश्रेष्ठ साधने आहेत. पुरातन काळात दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्रदेवाला दान दिले, राजा रघु यांनी सर्व संपत्ती ब्राह्मणांना दान केली.

राजा हरिश्चंद्राने स्वप्नात दिसलेले प्रत्यक्षात उतरवून आपले संपूर्ण राज्य ऋषी विश्वामित्रांना दान केले. शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचवण्याकरता आपल्या अंगावरचे मांस काढून दिले. कर्णाने जन्मतः प्राप्त कवच कुंडलांचे दान दिले. कुठलेही शुभ कार्य करण्याअगोदर काही ना काही दान करण्याची प्रथा आहे. अन्न शिजवण्याआधी घरातील गृहिणी अग्नीला दान देत असते. दानाचे सात्त्विक, राजस आणि तामस असे गुणांनुसार ३ मुख्य प्रकार आहेत जे दान देण्याच्या पद्धती आणि हेतूवर अवलंबून असतात. कोणत्याही प्रकारे केलेल्या दानाने कल्याणच होते. दानाशिवाय जीवन व्यर्थ आहे. देण्याचा आनंद हा घेण्याच्या आनंदापेक्षा जास्त असतो.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४४९७७

●● ●●

## रेल्वे गाड्यांमध्ये पाणी का नसतं?

डिसेंबर व जानेवारीत दोनदा रेल्वेने प्रवास करण्याचा योग आला. १७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास नाशिकला येणाऱ्या सेवाग्रामने नागपूरला येत असताना गाडीच्या स्वच्छतागृहात पाणी नव्हते. त्यामुळे अतोनात त्रास झाला. पाणी नसल्याने घाणीचे साम्राज्य होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

दुसरा अनुभव २३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सव्वातीनला सुटणाऱ्या पुणे-अजनी या गाडीत आला. पुण्याहून सुटलेल्या या गाडीत नागपूर आले तरी स्वच्छतागृहात पाणी नव्हते. दोन्ही गाड्या सुपरफास्ट असून त्यांचे भाडेही काही कमी नाही. रेल्वे गाड्यांमध्ये हिवाळ्यात पाणी नसेल, तर उन्हाळ्यात काय स्थिती राहील, याचा विचारच करवत नाही. सर्वच गाड्या अखेरच्या स्थानकावर पोहोचल्यावर साफसफाईसाठी पुरेसा वेळ मिळत असूनही कामचुकार रेल्वे कर्मचारी आपली जबाबदारी पार पाडत नसावे, असे दोन गाड्यांतील अनुभवावरून वाटते.

**विनय म. करंदीकर**/९४०३२०८७५९

●● ●●

## राजकीय सूडबुद्धी आणि नियतीचा न्याय

महाराष्ट्राच्या राजकारणात 'जसे कराल तसे भराल' या म्हणीचा प्रत्यय देणाऱ्या अनेक घटना गेल्या काही वर्षांत घडल्या. विशेषतः प्रसिद्ध अभिनेत्री कंगना राणावत आणि उबाठा नेते उद्धव ठाकरे यांच्यातील संघर्ष हे याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात कंगना राणावत यांनी पालघरमधील साधू हत्याकांड, रिपब्लिक टीव्हीचे संपादक अर्णव गोस्वामी यांची अटक, निवृत्त नौदल अधिकाऱ्याला झालेली मारहाण याविषयी सोशल मीडियावरून टीका केली होती. या काळात त्यांनी सातत्याने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले होते. यामुळे उद्धव ठाकरे सरकार आणि कंगना राणावत यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली होती. या टीकेचा सूड म्हणा की अजून काही मुंबई महानगरपालिकेने अभिनेत्री कंगना राणावत यांच्या पाली हिल येथील त्यांच्या कार्यालयातील कथित अनधिकृत बांधकामावर कारवाई करत ते पाडले. त्यावेळी आपली प्रतिक्रिया देताना कंगना यांनी एक विधान केले होते ''आज माझं घर तुटलं आहे, उद्या तुझा अहंकार तुटेल. हे काळाचं चक्र आहे, लक्षात ठेवा!''

असे म्हणतात शब्द लागतात. या घटनेनंतर काही काळातच महाविकास आघाडी सरकार कोसळले. शिवसेनेत मोठे बंड झाले आणि उद्धव ठाकरे यांना सत्तेच्या मुख्य पदावरून पायउतार व्हावे लागले. केवळ सत्ताच गेली नाही, तर पक्षाचे नाव, धनुष्यबाण हे चिन्ह आणि बहुसंख्य आमदार-खासदार देखील त्यांच्यापासून दुरावले. त्यानंतर पार पडलेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत उबाठाचा मोठा फज्जा उडाला. विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणारे संख्याबळही त्यांना मिळवता आले नाही. परत सत्ता गेली. आता नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीतही हा पक्ष चौथ्या-पाचव्या क्रमांकावर फेकला गेला. यापेक्षा सर्वांत मोठा धक्का बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत बसला. ही महापालिका ठाकरे कुटुंबासाठी प्रतिष्ठेची होती, कारण याच पालिकेच्या जोरावर शिवसेना राज्यभर पसरली होती. तब्बल ३० वर्षे एकहाती सत्ता असलेल्या या देशातील सर्वांत श्रीमंत महापालिकेतून उबाठा हद्दपार झाली तीही हिंदुहृदयसम्राट, मराठी माणसाच्या अभिमानाचे प्रतीक, बाळासाहेब ठाकरे यांच्या शंभराव्या जयंती वर्षात, यापेक्षा दुर्दैव कोणते असावे. त्यावेळी अभिनेत्री कंगना राणावत यांनी वर्तवलेली अहंकार तुटण्याची भविष्यवाणी आजच्या राजकीय स्थितीवरून खरी ठरताना दिसत आहे. आज कंगना खासदार म्हणून लोकसभेत आहेत, तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. जसे कराल तसे भराल या उक्तीप्रमाणेच या राजकीय नाट्याचा शेवट झाला आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

●● ●●

## प्रजासत्ताक दिन : अधिकारापासून कर्तव्यापर्यंत...

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवशाली दिवस आहे. हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. मात्र या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजवंदन, संचलन किंवा औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःचे संविधान लागू झाले आणि भारत एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर उभा राहिला. त्यामुळे हा दिवस भारतीय लोकशाहीचा, स्वातंत्र्याचा आणि जबाबदारीचा उत्सव आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी आणि समाजव्यवस्था योग्य दिशेने नेण्यासाठी संविधानाची आवश्यकता होती. विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असलेल्या भारतासारख्या विशाल देशासाठी एक सुसंगत, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण राज्यघटना तयार करणे हे अत्यंत आव्हानात्मक कार्य होते. हे ऐतिहासिक कार्य भारतीय संविधान सभेने केले. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला आणि भारतीय समाजाच्या वास्तव परिस्थितीचा विचार करून संविधानाची रचना केली. त्यांच्या दृष्टीने संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संग्रह नव्हता, तर तो समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीचा मार्ग होता. शोषित, वंचित, दलित, स्त्रिया आणि अल्पसंख्यक यांना सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्यांनी संविधानात सामाजिक न्यायाची ठोस मांडणी केली. भारतीय संविधानामुळे नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. समानतेचा अधिकाराने जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नाकारला. स्वातंत्र्याच्या अधिकाराने अभिव्यक्ती, विचार, संघटन आणि व्यवसाय स्वातंत्र्य दिले. धार्मिक स्वातंत्र्याने प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार दिला. शोषणाविरुद्धच्या अधिकाराने मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण केले. हे अधिकार भारतीय नागरिकाला केवळ स्वतंत्र नाही तर सशक्त बनवतात. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये दृढपणे रुजणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. भारतीय संविधानाने जात, पंथ, धर्म, लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव मान्य केलेला नाही. समानतेचा अधिकार कागदावर मर्यादित न राहता तो आपल्या वागण्यात उतरला पाहिजे.

संविधानाने अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. देशाची एकता व अखंडता जपणे, संविधानाचा सन्मान करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, सामाजिक सलोखा राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. मनाला येईल तसे वागणे, नियम मोडणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे हे स्वातंत्र्याचे लक्षण नाही. आज अनेकदा स्वातंत्र्याचा गैरअर्थ लावला जातो. शासकीय मालमत्तेची तोडफोड, रस्ते, बस, शाळा, रुग्णालये यांचे नुकसान केले जाते. ही संपत्ती कोणाची आहे याचा विचार न करता बेपर्वाईने वागले जाते. प्रत्यक्षात ही संपत्ती शासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची आहे. माझी गोष्ट आहे म्हणून तिची काळजी घेणे आवश्यक असते, तसेच सार्वजनिक साधनसंपत्तीची काळजी घेणे हेही आपले कर्तव्य आहे.

जागतिक पातळीवर भारताची ओळख वाढत असताना प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारत महासत्ता बनणार असेल तर ते केवळ भाषणातून किंवा आकड्यांतून नाही तर प्रत्यक्ष कृतीतून होईल. शिक्षण घेऊन दुसऱ्या देशात सेवा करण्यापेक्षा आपल्या देशातच प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रउभारणीत योगदान देणे हे खरे देशप्रेम आहे. ''भारत माझा देश आहे'' असे म्हणताना हे शब्द केवळ उच्चारापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वृत्तीत उतरला पाहिजे. प्रजासत्ताक दिन आपल्याला संविधानाची अस्मिता जपण्याची आठवण करून देतो. संविधान हा केवळ ग्रंथ नसून तो आपल्या आचरणातून जिवंत राहणारा दस्तावेज आहे.

**डॉ. राजेंद्र टेकाडे**/९१४५७७९०५०

●● ●●

## 'हिंद दी चादर' मानवी कल्याणाचा राष्ट्राभिमानी वारसा

श्री गुरू तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दीनिमित्त नांदेड येथे राज्य सरकार द्वारा 'हिंद दी चादर' हा ऐतिहासिक शहिदी समागम होत आहे. 'हिंद दी चादर' अर्थात अखंड भारताची ढाल, भारताचे संरक्षक ही उपाधी केवळ धार्मिक नसून ती एक प्रखर राष्ट्राभिमानी परंपरा आहे. शीख धर्माचे नववे गुरू, श्री गुरू तेगबहादूर साहिब यांच्या सर्वोच्च बलिदानाचे प्रतीक आहे. गुरू तेगबहादूर यांचे बलिदान हे प्रत्येक भारतीयांसाठी होते. सतराशे शतकातील मुघल राजवटीत जेव्हा सक्तीने धर्मांतरे होत होती, तेव्हा त्यांनी संपूर्ण राष्ट्राच्या धार्मिक आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या सार्वभौमत्वासाठी आवाज उचलला. केवळ धर्माचा प्रश्न नव्हता, तर भारतीयांच्या मूलभूत मानवी हक्कांचा प्रश्न होता. सार्वभौमत्वाचे आणि मानवी हक्कांच्या रक्षणार्थ हे बलिदान होते. त्यांनी मुघल सत्तेसमोर देशाची अभेद्य ढाल म्हणून उभे राहून, अन्यायाला विरोध करण्याची शिकवण दिली. श्री गुरू तेगबहादूर काश्मिरी पंडितांच्या बाजूने उभे राहून, राष्ट्र प्रथम ही भावना त्यांनी अधोरेखित केली. त्यांनी सिद्ध केले की, राष्ट्राचे खरे सामर्थ्य विविधतेत आहे. त्यांच्या बलिदानाने राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजली. १६७५ रोजी दिल्लीतील चांदनी चौकात त्यांनी दिलेले बलिदान हे राष्ट्राप्रति असलेल्या त्यांच्या असीम राष्ट्रभक्तीचे आणि बलिदानाचे सर्वोच्च उदाहरण आहे. श्री गुरू तेगबहादूर यांनी आपले शीर दिले, पण राष्ट्राची मान झुकू दिली नाही हे विशेष. श्री गुरू तेगबहादूर साहिब यांचा हा राष्ट्राभिमानी वारसा आजही प्रत्येक भारतीयाला मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, साहस आणि राष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी कोणत्याही प्रकारच्या त्यागाची तयारी ठेवण्याची प्रेरणा देतो.

हिंद दी चादर हा शहिदी समागमाच्या निमित्ताने शीख, बंजारा, मोहियाल, लबाना, सिकलीगर, सिंधी या गुरुबंधूचा अनुपमेय ऋणानुबंध दर्शवतो. शीख



इतिहासातील हे गुरुबंधू भारतीय विविधतेला समृद्ध करणारे आहेत. 'गुरू लाधो रे'चा जयघोष करणारे बाबा मखनशाह लबाना होत. मातृभूमीच्या रक्षणासाठी, मातृभूमीच्या सन्मानासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे शिवाय मुघल सत्तेविरुद्ध बंड पुकारून अत्यंत साहसाने गुरूचा अंत्यसंस्कार करणारे युगपुरुष बाबा लखीशाह बंजारा होत. बाबा मखनशाह यांनी नवव्या गुरूचा शोध लावला तर बाबा लखीशाह बंजारा यांनी नवव्या गुरूचा सन्मानपूर्वक आपल्या महालास पेटवून अंत्यसंस्कार केला. ही ऐतिहासिक घटना युगानुयुगे मानवी कल्याणासाठी प्रचीती देत राहील.

शीख धर्माच्या आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक अत्यंत तेजस्वी आणि प्रेरणादायी अध्याय म्हणजे राष्ट्रवीर बाबा लखीशाह बंजारा आणि बाबा मखनशाह लबाना यांचा उल्लेख केला जातो. या दोन्ही महापुरुषांनी आपल्या राष्ट्राप्रति आणि गुरूप्रति असलेली निष्ठा, त्याग आणि शौर्य यांच्या बळावर अविस्मरणीय कार्याची स्वर्णिम प्रेरणा जगापुढे उभारली. देश, धर्मासाठी सर्वस्व अर्पण करणारे त्यागाचे जाज्वल्य मूर्ती म्हणजे बाबा लखीशाह बंजारा होय. ऐतिहासिक घटना म्हणजे आठवे गुरू, श्री गुरू हरिकृष्ण साहिब यांच्या निधनानंतर पुढचे गुरू कोण, हे स्पष्ट होत नव्हते. त्या दरम्यान बाबा मखनशाह लबाना यांनी नववे गुरू तेगबहादूर यांना बकाला गावात शोधून काढताच अतिशय हर्षोल्हासाने जयघोष केला ; ''गुरू लाधो रे, गुरू लाधो रे'' (गुरू सापडले). त्यांनी केवळ गुरूंचा शोधच लावला नाही, तर नंतरच्या काळात गुरू तेगबहादूर साहिब यांच्या समर्थनार्थ अनेक लढायांमध्ये आणि कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी आपली संपत्ती आणि सैन्य गुरूंच्या सेवेसाठी समर्पित केले. हिंद दी चादर या शहिदी समागममुळे भारतीय विविधतेला समृद्ध करणारी गुरू परंपरा राष्ट्र निर्माणाच्या दृष्टीने अधिक दृढ होईल असा विश्वास वाटतो. मानवतेसाठी श्री गुरू तेगबहादूर साहिब यांचे सर्वोच्च बलिदान आणि गुरुनिष्ठा व मातृभूमीच्या रक्षणार्थ बंजाराने दिलेले योगदान सदैव प्रेरणा देत राहील.

**एकनाथ पवार**/९८५०१३१३६८

●● ●●

## राष्ट्रध्वजाचा मान राखूया!

२६ जानेवारी- प्रजासत्ताक दिन हा आपला राष्ट्रीय सण आहे. यानिमित्ताने राष्ट्रध्वजाचा मान राखण्याचा संस्कार आपल्यावर करूया. राष्ट्रध्वज देशाच्या सन्मानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला जिथे शक्य असेल तिथे तिरंगा फडकवत आपण आपले राष्ट्राप्रतिचे प्रेम आणि आदर व्यक्त करत असतो. परंतु दुर्दैवाने हे प्रेम आणि आदर अल्पकाळासाठीच टिकून राहते. १५ ऑगस्टला किंवा २६ जानेवारीला संध्याकाळी आपले राष्ट्रध्वज केराच्या टोपलीत, रस्त्यांवर, गटारात, सांडपाण्याच्या पाईपमध्ये पडलेले दिसतात. काही वेळा ध्वज तुडवलेसुद्धा जातात. अनेक वेळा कचऱ्यासोबत राष्ट्रध्वज जाळलेही जातात. हा तिरंग्याचा अपमान आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.

यावर्षी आपण निश्चय करूया की, मुलांना राष्ट्रध्वज खेळायला देणार नाही, प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज खरेदी करणार नाही, स्वतःच्या कपड्यांवर पिना लावून राष्ट्रध्वज वापरणार नाही, राष्ट्रध्वजाचा वापर बॅनर किंवा सजावट म्हणून करणार नाही, राष्ट्रध्वज जमिनीवर पडू देणार नाही. राष्ट्रध्वजाची विटंबना करणे हा गुन्हा आहे. तेव्हा आपण सर्वांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान करूया.

**छाया मिराशी**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## महत्वाचे...




### ए. जी. पाटील महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या पंधरवड्यांतर्गत महाविद्यालयात 'मराठी भाषा संवर्धन आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हस्ताक्षर स्पर्धा, कविता वाचन आणि कथाकथन स्पर्धा अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून सोलापूरच्या ज्येष्ठ साहित्यिक व महाराष्ट्र साहित्य परिषद (मसाप), सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील आणि प्रा. आर. एम. पंतोजी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष श्री. एस. ए. पाटील, सचिव श्री शिवानंद पाटील व कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. पाटील यांनी केले, तर आभार प्रा. पंतोजी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. बिराजदार, प्रा. घालीमठ, प्रा. देशपांडे आणि प्रा. देशमुख यांनी परिश्रम घेतले.



### परीक्षा पे चर्चा २०२६ अंतर्गत ऑपरेशन सिंदूर विषयावर प्रश्नोत्तरी स्पर्धा

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

परीक्षा पे चर्चा २०२६ या उपक्रमांतर्गत पीएम श्री केंद्रीय विद्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर येथे ऑपरेशन सिंदूर या विषयावर प्रश्नोत्तरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सोलापूर शहरातील एकूण ९ नामांकित विद्यालयांमधील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये ५० माध्यमिक व ५० उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा समावेश होता. स्पर्धा माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा दोन स्तरांवर घेण्यात आली. दोन्ही स्तरांवरून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएम श्री केंद्रीय विद्यालय मध्य रेल्वे सोलापूरचे प्राचार्य श्री उमाकांत जोशी यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यालयांमध्ये स्टेट बोर्ड व सीबीएसई बोर्ड मधील प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री दिलीप कुमार यादव (स्नातकोत्तर शिक्षक-हिंदी), श्रीमती अनुपमा गौड़ (चित्रकला शिक्षिका) तसेच श्री तुषार भागवत सरवदे (प्रशिक्षित स्नातक शिक्षक-इंग्रजी) यांनी आयोजक सदस्य म्हणून केले.

### पद्मशाली पुरोहित संघाचा वर्धापनदिन साजरा

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

पूर्व भागातील पद्मशाली पुरोहित संघ वेदपाठशाळेचा ९१ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या वर्धापनदिना निमित्त संघाच्यावतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापनदिनाच्या निमित्ताने समाजामध्ये ऐक्य, सलोखा आणि बंधुभाव टिकून राहावा, तसेच सर्वांनी आनंदाने जीवन व्यतीत करावे या उद्देशाने संकल्प करण्यात आला. त्यानंतर नवग्रह पूजा व होमहवन करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य प्रभाकर गाजर्ला, सतीश पोला आणि राजू कोडम यांनी केले. कार्यक्रमाचे यजमानपद संघाचे अध्यक्ष श्रीनिवास म्याडम यांनी भूषविले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संघाचे सचिव आत्माराम चिप्पा, विश्वस्त वेणुगोपाल म्याना, श्रीनिवास गाजूल, नरेंद्र श्रीमल आदी मान्यवरांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. वर्धापनदिनानिमित्त संघाच्यावतीने समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या हरी नल्ला, राघवेंद्र आरकाल, मनोहर जडल, नागदेव म्याना, नागशय्या वग्गू व भानुचंद्र चिप्पा यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हरी नल्ला यांनी केले तर सहसचिव व्यंकटेश जिल्ला यांनी आभार मानले.

## मश्रूम गणपती मंदिरात गणेश जन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

तळ हिप्परगा येथील मशरूम गणपती मंदिरात श्री गणेश जन्मोत्सवानिमित विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम गार पडले. कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक पोलिस आयुक्त राजन माले व स्नेहलता माने यांच्या हाते महाआरती व मुलाल वाटपाने झाली. त्यानंतर भक्त मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी दांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा लाभ सुमारे आठ ते नऊ हजार गणेश भक्तांनी घेतला.



पहाटे चार ते सहा पंचामृत महाभिषेक व षडशोपचार पूजा, सहा ते सात सुवर्णालंकार पूजा, सकाळी सात वाजता वजारोहण, सात वाजून पंधरा मिनिटांनी नित्य आरती, त्यानंतर श्री गणेशास पाळण्यात स्वाळापत्र करण्यात आले. सकाळी नऊ ते बारा या वेळेत अथर्वशीर्ष स्वाहाकार व गणेश भजन झाले. दुपारी बारा वाजता जन्मोत्सवानिमित्त महाआरती, गुलाल, पाळणा व अन्नकूटाचे आयोजन करणवात आले. दुपारी बारा वाजून तीस मिनिटांनी महानैव्य, त्यानंतर दुपारी साडे बारा वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी सहा ते आठ हरीपाठ, तर रात्री साडेआठ वाजता महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमास बलौराम साठे, तुळजापूरचे उपजजराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, निलेश रोचकरी, आनंद कंटले, नागरिक व असंख्य गणेश भक्तांची दर्शनाचा लाभ घेतला. वरील सर्व धार्मिक जन्मोत्सव कार्यक्रमाचे आयोजन पुजारी धनंजय पतंगे व संजय पतंगे यांनी केले. आकर्षक फुलांची सजावट व रोषणाई मंदिर समितीच्या वतीने करण्यात आली होती. व्यवस्थापन भक्त मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, अमोल ताब, अण्णा भोसले, विशाल सुरवसे, बाबूराव शितांले, निलेश स्वामी, विलास माळी, अर्जुन सुरवसे, सागर भंडारी, सतीत शेया, वीरेश स्वामी, कुमार सुरवसे, दीपक देशमुख, गणेश हौशेट्टी, जागराज हौभेट्टी आदीनी केले. आभार अभिषेक पतंगे, मैवा पतंगे, ईश्वा पतंगे यांनी मानले.

## सांगोल्यात निवडणूक अधिकाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी शनिवार दि.२४ जानेवारी रोजी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी एक व दोन यांचे पहिले प्रशिक्षण स.१० ते सायं.५ वा.पर्यंत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन व विद्यामंदिर प्रशाला सांगोला या ठिकाणी पूर्ण करण्यात आले, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली. या प्रशिक्षणासाठी १३८० प्रशिक्षणार्थी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व नियमानुसार पार पाडावी यासाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत, समाधान वाघमोडे यांनी मतदान प्रक्रिया ईव्हीएम, व्हीव्हीपॅट हाताळणी, मतदार ओळख पडताळणी, आदर्श आचारसंहिता, कायदा सुव्यवस्था राखणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी ३२ झोनल अधिकारी उपस्थित होते. तसेच विद्यामंदिर प्रशाला सांगोला या ठिकाणी १४ वर्ग वर्गखोल्यामध्ये १४ झोनल ऑफिसर व मंडल अधिकारी हरिश्चंद्र जाधव आणि त्यांचे सहकारी यांनी हॅन्डसॉन मशीनचे ट्रेनिंग दिले. यावेळी तलाठी, महसूल सेवक उपस्थित होते अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.



## १६ गुन्ह्यातील फरार आरोपीला ग्रामीण पोलिसांनी केले जेरबंद

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणच्यावतीने ३ घरफोडी व १३ कॉपर वायर चोरी अशा १६ गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी जेरबंद करण्यात आला आहे.

पोलीस उप निरीक्षक कुलदीप सोनटक्के यांचे पथकातील सफौ/प्रकाश कारटकर, यांना सोलापूर तालुका, करकंब, मोहोळ, वळसंग, माढा, अकलुज, माळशिरस, पंढरपूर ग्रामीण इत्यादी पोलीस ठाणेकडील गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी हा पंढरपूर शहरातील एस.टी. स्टॅन्ड कडे येणार असल्याबाबत खात्रीशीर गोपनीय बातमी मिळाली. पोलीस उप निरीक्षक कुलदीप सोनटक्के व त्यांचे पथक मिळालेल्या बातमी प्रमाणे पंढरपूर शहरातील एस.टी.स्टॅन्ड परिसरात सापळा लावून शोध घेत असताना, बातमीतील इसम हा पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला, तेंव्हा पथकातील पोलीस अंमलदार यांनी त्याचा पाठलाग करुन शिताफीने पकडले. तेव्हा त्यास ताब्यात घेवून त्यांचे नांव व पत्ता विचारले असता, त्यांने त्यांचे नांव राहूल रतिलाल काळे, वय ३० वर्षे, रा. करकंब, ता. पंढरपूर जि. सोलापूर असे असल्याचे सांगितले. सदर आरोपीकडे सोलापूर ग्रामीण जिल्हयातील मालाविषयी गुन्हयांच्या अनुषंगाने कौशल्यपूर्ण विचारपूस करता, त्याने त्याचे इतर साथीदारांसोबत कॉपर वायर चोरी चे गुन्हे केले असल्याबाबत सांगितले. सदर आरोपीस सोलापूर तालुका पोलीस ठाणे गुरनं ४४०/२०२४ बीएनएस ३०३(२), ३२४(४) प्रमाणे दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली झाली.

### कामटे विचारमंचतर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

शाहिद अशोक कामटे विचारमंचतर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती आणि बाळासाहेब ठाकरे जयंती निमित अभिवादन बलिदान चौक सोलापूर याठिकाणी प्रमुख अतिथी आस्था सामाजिक संस्थेचे आनंद तालिकोटी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शाहिद अशोक कामटे विचारमंच अध्यक्ष योगेश कुंदूर, सुरेश शहापूरकर, वैशाली गुंड, सुरेश जगताप, सुशिलकुमार व्यास, शिवकुमार कटके, मयुर गवते, धर्मेंद्र कर्पेकर, गिरिष विजापूरे, सावळगी, विकास कुंदूर, जगदीश कोरे, राजू पालकर, उपस्थित होते.

## नांदेडमध्ये शीख समाजाचा इतिहास उलगडणारे 'विरासत-ए-सीख' प्रदर्शन ठरतंय भाविकांचे आकर्षण!

### शीख योद्ध्यांनी वापरलेले शस्त्रात्रे पाहण्याची आज संधी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ जानेवारी -**

नांदेड शहरातील मोदी मैदानाच्या ५२ एकर परिसरात सुरू असलेल्या हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त शीख समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे 'विरासत-ए-सीख' हे प्रदर्शन उभारण्यात आले आहे. हे प्रदर्शन भाविकांसाठी आकर्षण ठरत असून या कार्यक्रमाला उपस्थिती लावलेले भाविक आवर्जून प्रदर्शनाला भेट देत आहेत.

शीख धर्माच्या स्थापनेपासून ते गुरू गोविंद सिंग यांच्यापर्यंतच्या सर्व गुरूंचा इतिहास, त्यांनी दिलेले योगदान सचित्र स्वरूपात मांडण्यात आला आहे. विशेषतः हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या इतिहासाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासोबत शीख योद्ध्यांनी वापरलेली विविध शस्त्रास्त्रे या प्रदर्शन दालनात ठेवण्यात आली आहेत. शीख धर्माचे पहिले गुरु श्री गुरु नानक जी ते शेवटचे गुरु गोविंद सिंगजी यांचा इतिहास व श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे कार्य तसेच शीख धर्मासोबतच सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव समाजातील महापुरुषांचाही इतिहास या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आला आहे.

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहीदी समागमनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले भाविक आवर्जून 'विरासत-ए-सीख' या प्रदर्शनाला भेट देत आहेत. त्यामुळे या प्रदर्शनाचे दालन भाविकांनी तुडुंब भरल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले. २५ जानेवारीला या प्रदर्शनाचा समारोप होणार आहे.

## ऑनलाईन फसवणूक प्रकरणी जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

चार्टर्ड अकाऊटंटच्या ऑनलाईन फसवणूक प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर झाला आहे. पुणे येथील रहिवासी अनिल बाबुराव इरवडे, वय-३९वर्षे, रा. मनोमन सोसायटी, नवी सांगवी, पुणे याची सोलापूर येथील ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१ एन.ए.मोर यांनी चार्टर्ड अकाऊटंट यांची शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करुन फसवणूक केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात जामीन मंजूर केला.

चार्टर्ड अकाऊटंट अनिल गोविंद श्रीगोंदेकर यांनी दि.२४ ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशन येथे त्यांची शेअर मार्केटमध्ये चांगला नफा मिळवून देतो असे सांगून त्यांचेकडून वेळोवेळी विविध खात्यांवर दोन कोटी अठ्ठावीस लाख अकरा हजार रुपये भरण्यास सांगितले. सदर गुंतवणूक रकमेवर एकूण सव्वीस कोटी सहा लाख नऊ हजार दोनशे ब्याण्णव नफा झाल्याचे भासवले, त्यावेळी फिर्यादीने सदर नफ्यातील दोन कोटी रुपये काढण्याची विनंती केली असता, त्यावर गुंतवणूकदार कंपनीकडून कमीशन म्हणून रक्कम रुपये ७१ लाखांची मागणी केली, त्यावेळी फिर्यादीस त्यांची सदर कंपनीकडून ऑनलाईन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यामुळे फिर्यादीने सोलापूर सायबर पोलीस स्टेशन येथे अनोळखी इसमांविरुद्ध फिर्याद दाखल केली होती.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
व्यावसायिक काम

निविदा सूचना क्रमांक SUR-CATG-25-27 सोलापूर विभागातील दुधणी स्टेशनवरील केटरिंग स्टॉल (टी स्टॉल) श्रेणीच्या वाटपासाठी ई-लिलाव सिंगल स्टेजबाबत 20.01.2028 च्या निविदा सूचना कृपया संलग्न करा. क्रमांक:- 1., लिलाव कॅटलॉग क्रमांक:- SUR-CATG-25-27, लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ:- सुरू - दुपारी 12.00 05.02.2026 बंद - दुपारी 12.30 05.02.2026, स्थानकांचे नाव:- दुधणी स्टेशनवरील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव., पद्धत:- ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल), निविदेचा कालावधी:- वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे / भारतीय रेल्वे पोर्टल :http://weww.ireps.gov.in/ वर उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी सहभागींनी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती आहे.
एसीएम/टीसी/सोलापूर

''तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा''

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**
**आरोग्य विभाग**
**वार्षिक निविदा सूचना**

जा.क्र.२०२५/न.प.अ.कोट/आरोग्य १०/संकलन-१/कावि १३१८ दिनांक: २३/०१/२०२६

अक्कलकोट नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील करावयाच्या एक वार्षिक कामासाठी योग्य त्या वर्गवारीत नोंदणीकृत ठेकेदार / पुरवठादार / संस्था यांचेकडून द्वि लिफाफा पद्धतीने ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहे. सदर निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत. बयाणा रक्कम व टेंडर फॉर्म फी नेट बँकिंग पद्धतीने स्वीकारली जाईल. मागविण्यात आलेल्या निविदेची कागदपत्रे अटी व शर्ती प्रमाणे अपलोड करणे बंधनकारक आहेत, निविदेबाबत वेळोवेळी करण्यात येणारे बदल (शुद्धीपत्रक) अथवा मुदतवाढ सूचना शासनाच्या www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहतील. निविदा सादर करण्याची मुदत दि.२४/०१/२०२६ सकाळी १०:०० ते दि.३१/०१/२०२६ सायंकाळी ४:०० पर्यंत राहील.

सही/-
(रमाकांत डाके)
मुख्याधिकारी
अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

**जाहीर प्रसिध्दीकरण**
**जागा/जमीनीचे खरेदीखत व वाटणीपत्र दस्त हरविल्याबाबतचे**

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब. डि व ता. करमाळा पैकी करमाळा शहर हद्दीतील मौजे करमाळा व करमाळा तालुक्याच्या आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. सोलापूर सब. डि व ता. करमाळा पैकी करमाळा शहर हद्दीतील मौजे करमाळा येथील निवासी उपयोगी खुली जागा याचा म्यु. घर नं. १४७ व याचा सी. स. नं. २१३ याचे क्षेत्रफळ ८८.०१ चौ.मी. आहे. याबाबत वातानिपत्राचा दस्त श्री. केशव विठ्ठल कांबळे व आमचे अशिल श्री. रामहरी केशवराव पाटील व इतर ३ यांच्यामद्धे दि. ०९/०७/१९८७ रोजी वाटणीपत्र दस्त क्र. ८८९/१९८७ हा रजिस्टर वाटणीपत्राचा दस्त लिहून, नोंदवून दिलेला होता. सदर जागेचा यापूर्वीचा दि. १३/०८/१९८१ रोजीचा खरेदीखत दस्त क्र. ९२६/१९८१ हा रजिस्टर खरेदीखताचा दस्त देखील आमचे अशिल यांच्याकडे होता. परंतु, सदरचे दोन्ही दस्त आमचे अशिलाकडुन अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहेत, ते अद्यापपर्यंत आढळून आलेले नाहीत.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचे दोन्ही दस्त मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये, सदरचे दस्त मिळाल्यास खालील पत्यावर आणुन द्यावेत. सदर दस्ताचे अनुषंगाने कुणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी. तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये. कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास खालील पत्यावर लेखी स्वरुपात १५ दिवसाच्या आत कळवावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. दि. २४/०१/२०२६.

सही/-
अशिल श्री. रामहरी केशवराव पाटील यांचे तर्फे
सुप्रिया शेखर गुंडपाटील,
साई अम्बृशी नगर, परंडा रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर मो. नं. ९५११८२१३१४.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी जिल्हा सोलापूर पोट तुकडी तालुका माढा, गाव मौजे लऊळ येथील गट नंबर ७४/३ यांसी एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ८५आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर २० आर, (येथून पुढे सदर मिळकत गट नंबर ७४/३/२ असे संबोधलेले आहे.) सदर मिळकत ही श्री. अरुण विठोबा गोरे यांचे मालकीची असून, त्यांनी ती श्री. वैभव मनोज कदम यांना दिनांक २५/०९/२०२३ रोजीच्या भाडेपट्ट्याने वीस वर्षे या कालावधीकरिता भाड्याने दिलेली आहे. सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमचे अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निःजोखमी व बोजारहित असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमचे अशिलांना म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत, आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

सोलापूर, दिनांक २४/०१/२०२६

शिक्का

सही/-
श्री. आनंद रामचंद्र देशपांडे,
बीए, एलएलबी, एमए. (इतिहास),
पत्ता: ९१अ मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१.
मोबाईल: ९८२३२९१६४३.

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुईवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**
विरुध्द
रोशन अशोक चव्हाण वगैरे ४ -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ६९/२०२५ | ३) सुनिता अभिनंदन गांधी, वय-५३, धंदा-झेरॉक्स दुकान, रा.विठ्ठल बझार जवळ, सोलापूर पुणे रोड, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | ६८,८८८ | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. **३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ ची नोटीस सदर व्यक्ती पत्त्यावर राहात नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार **शुक्रवार रोजी दिनांक २०/०२/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुईवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**
विरुध्द
अनिल यशवंत जगताप वगैरे ३ -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ९२/२०२५ | १) अनिल यशवंत जगताप, वय-५३, धंदा-रेशिक उद्योग, रा. अण्णाभाऊ साठे नगर, ग्रामपंचायत पाठीमागे, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | १,१८,६०९ | २०/०२/२०२६ |
| २ | ९२/२०२५ | २) हरिदास शिवाजी ढगे, वय-५६, धंदा-नोकरी, रा. भवानी नगर, टेंभूर्णी ता. माढा जि.सोलापूर | १,१८,६०९ | २०/०२/२०२६ |
| ३ | ९२/२०२५ | ३) हनुमंत त्रिंबक नाळे, वय ४९, धंदा-हॉटेल, रा. सावता माळी नगर, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | १,१८,६०९ | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. **१ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस प्रवादी नं. **१ व ३ ची नोटीस घेण्यास नकार व प्रतिवादी नं. २ ची नोटीस सदर व्यक्ती पत्त्यावर राहात नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २०/०२/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुईवाडी
ता. माढा जि. सोलापूर

**टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**
विरुध्द
अजिंक्य दत्तात्रय संगीतराव वगैरे ३ -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ५०/२०२५ | ३) शुभम सचिन सुरवसे, वय-२४, धंदा-हॉटेल, रा. पोलिस स्टेशन जवळ, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | ३,०४,११० | २०/०२/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. ३ ची नोटीस दिलेल्या पत्त्यावर नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २०/०२/२०२६** सकाळी ११.०० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक ०४/११/२०२५ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
लवाद अधिकारी
सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ४०

### रनिंग आणि शरीरातील १२ हार्मोन्स, एक शास्त्रीय दृष्टीकोन

रनिंग ही केवळ शारीरिक क्रिया नसून ती शरीरातील हार्मोनल प्रणालीला सक्रिय करणारी एक शक्तिशाली प्रक्रिया आहे. धावण्याच्या प्रत्येक टप्प्यावर शरीरातील विविध हार्मोन्स एकत्रितपणे कार्य करून ऊर्जा, सहनशक्ती, स्नायूंची ताकद, रिकव्हरी आणि मानसिक संतुलन नियंत्रित करतात. खाली रनिंगमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ प्रमुख हार्मोन्सची माहिती दिली आहे.

१) Adrenaline (एड्रेनालिन)

धावायला सुरुवात होताच हे हार्मोन हृदयाचे ठोके वाढवते, रक्तप्रवाह वेगवान करते आणि शरीराला त्वरित ऊर्जा देते. स्पर्धा आणि इंटरव्हल ट्रेनिंगमध्ये याची भूमिका महत्त्वाची असते.

२) Noradrenaline (नॉरॲड्रेनालिन)

हे हार्मोन लक्ष केंद्रित ठेवते आणि स्नायूंना जास्त प्रमाणात रक्तपुरवठा करून सहनशक्ती वाढवते.

३) Cortisol (कॉर्टिसोल)

याला ''स्ट्रेस हार्मोन'' म्हणतात. हे फॅट आणि प्रोटीन तोडून ऊर्जा तयार करते. मात्र जास्त प्रमाणात राहिल्यास ओव्हरट्रेनिंग आणि थकवा जाणवतो.

४) Insulin (इन्सुलिन)

रननंतर रक्तातील साखर स्नायूंमध्ये साठवून ग्लायकोजन तयार करण्याचे काम करते, ज्यामुळे रिकव्हरी जलद होते.

५) Glucagon (ग्लुकागॉन)

जेव्हा रक्तातील साखर कमी होते तेव्हा हे हार्मोन लिव्हरमधून साखर सोडून शरीराला ऊर्जा पुरवते.

६) Endorphins (एंडॉर्फिन्स)

"Runner's High" साठी जबाबदार असलेले हे हार्मोन वेदना कमी करते आणि मन आनंदी ठेवते.

७) Testosterone (टेस्टोस्टेरॉन)

स्नायूंची ताकद वाढवणे, रिकव्हरी सुधारणा आणि आत्मविश्वास वाढवण्यात याची भूमिका असते.

८) Growth Hormone (ग्रोथ हार्मोन)

स्नायू दुरुस्ती, फॅट बर्न आणि शरीराची पुनर्बांधणी करण्यात मदत करते.

९) Thyroxine (थायरॉक्सिन टी३/४)

मेटाबोलिझम नियंत्रित करून शरीर किती वेगाने ऊर्जा वापरेल हे ठरवते.

१०) Vasopressin (ADH)

शरीरात पाण्याचे संतुलन राखते आणि डिहायड्रेशनपासून संरक्षण करते.

११) Aldosterone (अल्डोस्टेरॉन)

सोडियम आणि पाण्याचे नियंत्रण ठेवून क्रॅम्प्स टाळण्यास मदत करते.

१२) Erythropoietin (EPO)

लाल रक्तपेशी वाढवून ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता सुधारते, ज्यामुळे स्टॅमिना वाढतो.

**निष्कर्ष:**

रनिंगमुळे हे सर्व हार्मोन्स एकत्रितपणे कार्य करून शरीराला एक संपूर्ण ''परफॉर्मन्स सिस्टिम'' बनवतात. योग्य आहार, पुरेशी झोप आणि संतुलित ट्रेनिंग यामुळे या हार्मोन्सचे नैसर्गिक संतुलन राखले जाते आणि धावपटू अधिक सक्षम, तंदुरुस्त आणि मानसिकदृष्ट्या मजबूत बनतो.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड

### आयसीसीची बीसीबीला माहिती

**नवी दिल्ली, २४ जानेवारी**

आयपीएलमधून मुस्तफिझूर रहमानला वगळल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव भारतात प्रवास करण्यास नकार दिल्यामुळे आगामी टी-२० विश्वचषकात बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडची निवड करण्यात आली आहे, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) बांगलादेश क्रिकेट मंडळाला (बीसीबी) अधिकृतपणे कळवले आहे.

प्राप्त माहितीनुसार अध्यक्ष जय शाह यांच्यासह आयसीसीचे वरिष्ठ पदाधिकारी शुक्रवारी दुबईत होते आणि जागतिक संस्थेचा निर्णय कळवण्यासाठी सायंकाळी उशिरा बीसीबीचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल यांना एक ई-मेल पाठवण्यात आला आहे.



बाहेर : बांगलादेश



आत : स्कॉटलंड

बांगलादेश क्रिकेट मंडळाच्या अध्यक्षांना काल सायंकाळी एक ई-मेल पाठवण्यात आला, यात त्यांना कळवण्यात आले की, भारतात यायचे की नाही हे ठरवण्यासाठी दिलेल्या २४ तासांच्या मुदतीनंतर त्यांच्या मंडळाने आयसीसीला अधिकृतपणे कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे, असे आयसीसीच्या एका सूत्राने नाव न छापण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले. बीसीबीने जागतिक संस्थेला अधिकृतपणे कळवण्यापूर्वी ढाका येथे पत्रकार परिषद घेतली. हे नियमांचे उल्लंघन आहे. बांगलादेशच्या जागी दुसऱ्या संघाची निवड केली जात आहे असे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात आले आहे, असेही त्या सूत्राने सांगितले. आयसीसीकडून वारंवार आश्वासने देऊनही, बांगलादेशच्या क्रीडा मंत्रालयाचे सल्लागार आसिफ नझरुल यांनी सुरक्षेच्या कारणास्तव भारतात प्रवास न करण्याचा सल्ला दिला होता.

क्रिकेट स्कॉटलंडकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळाली नाही असे म्हटले असले तरी, त्यांना लवकरच कळवले जाईल असे दिसते. त्यानुसार, स्कॉटलंड आपले चार गट साखळी सामने वेस्ट इंडीज (७ फेब्रुवारी), इटली (९ फेब्रुवारी) आणि इंग्लंड (१४ फेब्रुवारी) विरुद्ध कोलकाता येथे खेळेल, त्यानंतर १७ फेब्रुवारी रोजी मुंबईत नेपाळविरुद्ध एक सामना खेळेल. (वृत्तसंस्था)

# भारत सुपर सिक्स फेरीत

### १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट

### न्यूझीलंडवर ६ गड्यांनी विजय

**बुलावायो, २४ जानेवारी**

आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी गट ब मधील आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात मध्यम गती गोलंदाज आर. एस. अंबरीशच्या भेदक माऱ्याच्या बळावर भारताच्या युवा संघाने न्यूझीलंडच्या युवा संघावर १४१ चेंडू शिल्लक ठेवत ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने ब गटात तीन पैकी तीनही सामने जिंकत ९ गुणांसह अव्वल स्थान मिळविले व सुपर सिक्स फेरीत आपले स्थान निश्चित केले.

भारतीय संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित भारतीय युवा गोलंदाजांनी आपली जबाबदारी चोखपणे बजावली व न्यूझीलंडला ३६.२ षटकांत १३५ धावांत गुंडाळले., यात विशेषतः आर. एस. अंबरीशने प्रभावी मारा करत २९ धावांत ४ बळी टिपण्याची किमया केली, त्यालाच सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला. (वृत्तसंस्था)



सामनावीर : आर.एस. अंबरीश ४ बळी

# मुंबई हैदराबादविरुद्ध बोनस गुणांसह विजयाच्या समीप

**हैदराबाद, २४ जानेवारी**

रणजी करंडक एलिट गट ड च्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी बलाढ्य मुंबईने हैदराबादविरुद्ध बोनस गुणांसह सरळ विजयाच्या दिशेने वाटचाल केली. फॉलो-ऑन दिल्यानंतर मुंबईने यजमान संघाला १६६ धावांत सात गडी बाद केले.

फिरकी गोलंदाज हिमांशू सिंगने ३९ धावांत ३ बळी टिपण्याची उत्तम कामगिरी केली, तर वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे व मोहित अवस्थीने प्रत्येकी २ बळी घेत त्याला चांगली साथ दिली. मुंबईच्या ५६० धावांच्या प्रत्युत्तरात हैदराबादने तिसऱ्या दिवसाचा खेळ २ बाद १३८ धावांवरून सुरू केल्यानंतर त्यांचा पहिला डाव २६७ धावांत आटोपला. त्यामुळे मुंबईला २९३ धावांची मोठी आघाडी मिळाली.

अवस्थी (३-३१) आणि मुशीरने (३-३८) हैदराबादचे सर्वाधिक नुकसान केले, त्यामुळे दिवसाअखेर हैदराबादने दुसऱ्या डावात १६६ धावांत सात गडी गमावले होते. त्यांच्याकडे केवळ तीन गडी शिल्लक आहे व त्यांना अजून १२७ धावांची गरज आहे व संपूर्ण एक दिवसाचा खेळ शिल्लक आहे. (वृत्तसंस्था)

# अकल्पनीय चुकीमुळे गुकेशचा पराभव

**विक ऑन झी (नेदरलॅण्ड), २४ जानेवारी**

जागतिक विजेता डी. गुकेशने स्वतःच्याच चुकीमुळे एका अंध बिंदूत अडकून एक अकल्पनीय चूक केली आणि येथे शनिवारी झालेल्या टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीच्या सामन्यात उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवकडून त्याला पराभव पत्करावा लागला.

दरम्यान, अव्वल मानांकित भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीला जर्मनीच्या मॅथियास ब्लूबाउमच्या अशाच एका चुकीचा फायदा झाला व त्याने अर्धा गुण वाचवला. भारतीय ग्रॅण्डमास्टर गुकेशने जवळजवळ डोळे झाकून चूक केली आणि ज्या स्थितीत तो संभाव्य बरोबरी साधू शकला असता, त्याच स्थितीत त्याला तात्काळ हार मानावी लागली. दुसरीकडे, अर्जुन जर्मनीच्या ब्लूबाउमविरुद्ध पूर्णपणे हरण्याच्या स्थितीत होता. याच ब्लूबाउमने या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरून सर्वांना आश्चर्यचकित केले होते. (वृत्तसंस्था)

# भारताचे लक्ष्य टी-२० मालिका विजय

**गुवाहाटी, २४ जानेवारी**

रविवारी येथील एसीए स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतीय संघ विजय नोंदवून आणखी एक मालिका विजय नोंदविण्याचा प्रयत्न करणार आहे.

सूर्यकुमार यादवच्या संघाने नागपूर आणि रायपूरमध्ये शानदार विजय मिळवले आहेत आणि आता पाच सामन्यांची मालिका जिंकण्यावर त्यांचे लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय संघ योग्य वेळी आपला फॉर्म मिळवत आहे.

टी-२० विश्वचषकासारख्या महत्त्वाच्या आयसीसी स्पर्धेच्या आधी, द्विपक्षीय मालिका संघांना रणनीती निश्चित करण्यासाठी आणि संघ संयोजन ठरवण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ प्रदान करते. अनेकदा, स्पर्धेच्या निकालापेक्षा मोठ्या चित्रावर लक्ष केंद्रित केले जात असल्याने, निकालाचे महत्त्व कमी होते. तरीही, बहुराष्ट्रीय स्पर्धेत उतरण्यापूर्वी मनोबल वाढवणाऱ्या मालिका विजयापेक्षा दुसरी कोणतीही गोष्ट चांगली असू शकत नाही.

या दोन्ही विजयांतून विद्यमान विजेत्या भारतीय संघाने टी-२० विश्वचषकाची तयारी योग्य दिशेने सुरु असल्याचे दाखवून दिले आहे. भारताच्या फलंदाजी फळीतील खोली वेगवेगळ्या शैलींमध्ये स्पष्टपणे दिसून आली- एकदा लक्ष्य निश्चित करताना आणि दुसऱ्यांदा लक्ष्याचा पाठलाग करताना. अलीकडच्या काळात यजमान संघासाठी एक चिंतेची बाब म्हणजे सूर्यकुमारचा फॉर्म होता. त्याने २०२४ च्या उत्तरार्धापासून एकही अर्धशतक झळकावले नव्हते. या ३५ वर्षीय खेळाडूने नागपूरमध्ये (३२) आपल्या जुन्या लयीत परत येण्याची चिन्हे दाखवली आणि शुक्रवारी रायपूरमध्ये ३७ चेंडूंमध्ये ९ चौकार आणि ४ षट्कारांच्या मदतीने नाबाद ८२ धावांची शानदार खेळी करत, १६ षटकांच्या आत २०९ धावांचे लक्ष्य गाठण्यास मदत करून, हा सकारात्मक बदल निश्चित केला.

या मालिकेपूर्वी, निवडकर्त्यांनी काही कठोर निर्णय घेत महत्त्वाच्या भूमिकांमध्ये बदल केले. सलामीवीर शुभमन गिल आणि यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्माला संघातून वगळण्यात आले व त्यांच्या जागी रिंकू सिंग व ईशान किशनचा समावेश करण्यात आला.

दोन वर्षे संघाबाहेर राहिल्यानंतर ईशान किशनने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सर्व फॉरमॅटमध्ये भरपूर धावा करून राष्ट्रीय संघात पुनरागमन केले. जरी हा २७ वर्षीय खेळाडू राखीव यष्टिरक्षक म्हणून संघात असला तरी, तिलक वर्माच्या दुखापतीमुळे या झारखंडच्या खेळाडूने पहिल्या दोन सामन्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर त्याची जागा घेतली. रायपूरमधील त्याची सामना जिंकून देणारी खेळी (७६ धावा, ३२ चेंडू, ११ चौकार, ४ षटकार) व्यवस्थापनाला नक्कीच आनंदित करेल. (वृत्तसंस्था)



मालिका जिंकण्यास उत्सुक असलेले भारतीय क्रिकेटपटू

**भारत वि. न्यूझीलंड तिसरा टी-२० सामना**

**स्थळ** : एसीए स्टेडियम, गुवाहाटी
**वेळः** सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# भाम्बरीची आगेकूच, बालाजी बाहेर

**मेलबर्न, २४ जानेवारी**

भारताचा युकी भाम्बरीने शनिवारी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला, तर त्याचाच देशबांधव एन. श्रीराम बालाजी बाहेर झाला. त्यामुळे हंगामातील पहिल्या ग्रॅण्ड स्लॅममध्ये भारतीय संघासाठी संमिश्र दिवस ठरला.

भाम्बरी व त्याचा १०वा मानांकित स्वीडिश जोडीदार आंद्रे गोरान्सन यांनी दुसऱ्या फेरीच्या सामन्यात सँटियागो गोंझालेझ आणि डेव्हिड पेल या बिगरमानांकित जोडीवर ४-६, ७-६(५), ६-३ असा विजय मिळविला.

एकूण दोन तास आणि सहा मिनिटे चाललेला हा सामना गुरुवारी स्थगित करण्यात आला होता, कारण भाम्बरी व गोरान्सन ४-६, २-२ असा पिछाडीवर होते आणि नंतर ऑस्ट्रेलियन ओपनच्या नियमांनुसार पुन्हा सुरू झाला. पुन्हा खेळ सुरू झाल्यानंतर संयम दाखवत, इंडो-स्वीडिश जोडीने दुसऱ्या सेटच्या टायब्रेकमध्ये आपली पातळी उंचावली आणि नंतर निर्णायक गेममध्ये नियंत्रण मिळवत अंतिम १६ मध्ये आपले स्थान निश्चित केले. यापूर्वी, ऑस्ट्रियाच्या नील ओबरलीटनरसह बालाजीला चौथ्या मानांकित मार्सेलो अरेव्हालो आणि मेट पेव्हिक यांच्याकडून सरळ सेटमध्ये पराभव पत्करावा लागला. पर्यायी जोडी दुसऱ्या फेरीच्या सामन्यात ५-७, १-६ अशी पराभूत झाली. (वृत्तसंस्था)

## सोलापूर जिल्हा सब ज्युनिअर थलेटिक्स स्पर्धा उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने जिल्हा सब ज्युनिअर मुले व मुलींची निवड चाचणी स्पर्धा मंगळवार २७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता नेहरुनगर शासकीय मैदान येथे होणार आहे. स्पर्धा प्रवेशिका सर्धे अगोदर त्याच ठिकाणी स्विकारले जातील. या स्पर्धेसाठी जन्म दाखला ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांनी दिलेला असावा. यातून एम जी एम कॉलेज मैदान कोरेगाव (जिल्हा अहिल्यानगर) येथे ७ व ८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवडण्यात येणार आहे.

८ वर्षे वयोगटासाठी (९--२--२०१८ ते ०८--२--२०२०), १० वर्षे (९-२-२०१६ ते ८- २-२०१८), १२ वर्षे (९-२-२०१४ ते ८-२-२०१६), १४ वर्षे (९-२-२०१२ ते ८-२-२०१४) या दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. अधिक माहिती करिता थलेटिक्स संघटनेचे सचिव राजू प्याटी (मो. ९३२६०५५९४०) यांच्याशी संपर्क साधावा.

# सांगोल्यात उद्या होणार बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमीची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २४ जानेवारी-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व सांगोला विद्यामंदिर यांचे सन २०२६-२७ हे वर्ष अमृत महोत्सवी वर्ष आहे. या अमृत महोत्सवी वर्षाच्या सुरुवातीला भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार व प्रशिक्षक संभाजी कदम यांचे शुभहस्ते व कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे उपस्थितीत सोमवार दि.२६ जानेवारी रोजी स.९:३० वा. सांगोला विद्यामंदिर येथे बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमीचे उद्घाटन संपन्न होत आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृतिदिनानिमित्त गेली ४४ वर्षे राज्यस्तरीय व मागील वर्षापासून राष्ट्रीय पुरुषांच्या निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन सांगोला विद्यामंदिर येथे केले जात आहे. आपल्या परिसरातील खेळाडूंना कौशल्य प्राप्त होण्यासाठी व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी शिस्तबद्ध प्रशिक्षणाची गरज आहे. यासाठी बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमी अंतर्गत संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमीची सुरूवात दोन इनडोअर कोर्ट मध्ये करण्यात येत आहे. तरी परिसरातील सर्व क्रीडाप्रेमी, खेळाडू, नागरिक यांनी उपस्थित राहावे व जास्तीत जास्त खेळाडूंनी अकॅडमीमध्ये सहभागी व्हावे. तसेच अधिक माहितीसाठी प्रशांत मस्के- ९८२२०३१८८८, अजित मोरे- ९५०३८०७०८० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमी कडून करण्यात आले आहे.

**अकॅडमीची प्रमुख वैशिष्ट्ये-**

आंतरराष्ट्रीय मानकांनुसार तयार करण्यात आलेले दोन आधुनिक बास्केटबॉल कोर्ट, अनुभवी प्रशिक्षकांकडून वैयक्तिक मार्गदर्शन, खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेसाठी विशेष व्यायाम आणि डाएट प्लॅन, ५ वर्षांवरील मुला-मुलींसाठी वेगवेगळे बॅचेस

## दिल्लीचा दुसऱ्या डावात धडाकेबाज खेळ

**नवी दिल्ली -** पहिल्या दोन दिवसांत छत्तीसगडने वर्चस्व गाजवल्यानंतर दिल्लीने रणजी करंडक क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात धडाकेबाज खेळ दाखवला. दिल्लीने दुसऱ्या डावात ३ बाद १५८ धावा केल्या होत्या आणि त्यांना अजून १३१ धावांची गरज आहे. छत्तीसगडने त्यांच्या २१६ धावांच्या प्रत्युत्तरात पहिल्या डावात ५०५ धावांचा डोंगर उभारला होता. प्रियांश आर्यने ५७ चेंडूंत १५ चौकार आणि एका षट्कारासह ८२ धावांची खेळी करत दिल्लीच्या प्रतिहल्ल्याचे नेतृत्व केले. सलामीवीर सनत संगवानने ४० धावा केल्या आणि दोघांनी पहिल्या गड्यासाठी १२३ धावांची भागीदारी केली.

# अखेर राज्यातील क्रीडा संकुलावर आमदारांचेच वर्चस्व

## लोकप्रतिनिधींची मक्तेदारी मोडण्याचा निर्णय अंगलट आला सत्ताधारी पक्षाला

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

राज्यातील ४२७ क्रीडा संकुलांची कामे गतीने आणि वेळेत पूर्ण व्हावीत, कामाच्या दिरंगाईची जबाबदारी निश्चित व्हावी, यासाठी क्रीडा विभागाने क्रीडा संकुलावरील लोकप्रतिनिधींची मक्तेदारी मोडण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने २४ सप्टेंबर २०२५च्या शासन निर्णयानुसार घेतला होता. मात्र, हा निर्णय काही आमदारांना रुचला नव्हता. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे धाव घेतली होती. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेळातील राजकारणाला लगाम न घालता आमदारांच्या वर्चस्वाला हिरवा कंदील दाखविला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २१ जानेवारी २०२६च्या शासन निर्णयानुसार विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल व तालुका क्रीडा संकुल समित्यांची करण्यात आलेली पुनर्रचना रद्द करून गठीत समित्या पूर्ववत करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री व आमदारांना या क्रीडा संकुल समित्यांचे अध्यक्षपद परत बहाल करण्यात आले आहे.

राज्यात खेळांचा विकास व्हावा यासाठी २००३ मध्ये महाराष्ट्र क्रीडा पायाभूत सुविधा आराखडा तयार करण्यात आला. यात क्रीडा विकास होण्यासाठी तालुका हा घटक गृहीत धरून नियोजन करण्यात आले. त्यानुसार तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्य क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी तालुका, जिल्हा, विभाग स्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या. या समित्यांच्या अध्यक्षपदावर आमदार, पालकमंत्र्यांची वर्णी लावण्यात आली. मात्र राज्यातील बहुतांश क्रीडा संकुलाच्या बांधकामाची प्रगती कासव गतीने सुरू होती. या समितीच्या बैठकाच अनेक महिने होत नव्हत्या. बैठका झाल्या तर निर्णय होत नव्हते. त्यामुळे क्रीडा संकुलाची कामे काही प्रमाणात रखडली होती.

**आमदारांचा आढावा क्रीडामंत्री व मुख्यमंत्री यांना घ्यावा लागेल**

सर्वसाधारणपणे विकासकामांचा प्रशासकीय आढावा लोकप्रतिनिधी घेतात. मात्र पालकमंत्री, आमदारांचा आढावा घ्यायचा कोणी, असा प्रश्न निर्माण झाला होता. बऱ्याचवेळा हे लोकप्रतिनिधी बैठकीला हजर राहत नाहीत. खर्चाचा, निकृष्ट कामांचा आढावा घेता येत नाही. त्यामुळे जबाबदारीही निश्चित करता येत नाही. या कारणामुळेच क्रीडा संकुल समितीची फेररचना करण्यात आली होती. आता या नवीन शासन निर्णयामुळे याचा आढावा आता क्रीडामंत्री व मुख्यमंत्री यांनाच घ्यावा लागणार आहे.

**तीन हजार कोटींचा बोजा**

क्रीडा विभागाकडून राज्यात सर्व प्रकारची ४२७ क्रीडा संकुले मंजूर करण्यात आली आहेत. मात्र, आज अखेर केवळ बोटावर मोजण्या इतकीच संकुले पूर्ण आहेत. वर्षोनवर्षे निधी देऊनही अर्धवट कामे झाल्याने तसेच राज्यातील क्रीडा संकुलांना दिलेल्या निधीतील सुमारे ६०० कोटीपेक्षा अधिक रक्कम अखर्चित राहिली असल्याने या संकुलावर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील आठ-दहा वर्षाहून अधिक काळ ही कामे रखडल्याने मूळ अंदाजपत्रकात दुपटीने वाढ झाली आहे. पूर्वी चार हजार ४५ कोटी रुपयांच्या मूळ अंदाजपत्रकात आता आणखी तीन हजार ७३० कोटींची भर पडली आहे. त्यामुळे आता ही क्रीडा संकुले पूर्ण करण्यासाठी सात हजार ७०० कोटींचा खर्च करावा लागणार आहे.

**समित्यांच्या फेररचनेला आमदारांचा विरोध होता**

क्रीडा संकुलसाठी वाढीव तरतूद केली तरी लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली असणारी समिती ही कामे कितपत वेळेत पूर्ण करेल, याबाबत क्रीडा विभागाला शंका होती. त्यामुळेच त्यांनी क्रीडा संकुल समित्यांची फेररचना करण्याचा निर्णय घेतला. यात लोकप्रतिनिधी यांच्याऐवजी, क्रीडा संकुलाची जबाबदारी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर सोपवली आहे. मात्र या निर्णयाला काही आमदारांनी व पालकमंत्र्यांनी विरोध करत पूर्वीची समिती आणि त्यावरील अध्यक्षपद कायम ठेवण्याचा आग्रह धरला होता. त्यामुळे क्रीडा विभागाचा हा ऐतिहासिक निर्णय अडचणीत सापडला होता. अध्यक्षपद गमावल्यामुळे आमदारांचे अधिकार आणि निर्णय प्रक्रियेतील स्थान कमी झाले आहे. अनेक आमदारांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. केवळ 'आमंत्रित सदस्य' म्हणून राहणे आणि ते ही प्रांताधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमध्ये काम करण्यास त्यांनी विरोध दर्शवला होता.

**दिरंगाई टाळण्यासाठी अधिकाऱ्यांची समिती होती**

सुमारे ६६ क्रीडा संकुलांच्या कामातील दिरंगाई टाळण्यासाठी लोकप्रतिनिधींएवजी प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती नेमली होती. मात्र त्याला काही आमदारांनी विरोध केला होता. मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी आपली बाजू मांडली होती. आम्हीही आमची बाजू मुख्यमंत्र्यांना सांगितली आहे. याबाबत पुढील निर्णय तेच घेतील, असे तत्कालीन क्रीडामंत्री

**- माणिकराव कोकाटे यांनी आमदारांना सांगितले होते.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### द.ह. कवठेकर प्रशालेस सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक विद्यादेवी जाधव यांची भेट

**पंढरपूर, दि. २४ जानेवारी-**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह. कवठेकर प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विद्या देवी जाधव यांनी प्रशालेस नुकती सदिच्छा भेट दिली. सन २०१७ मध्ये त्या स. मो.वाहन निरीक्षक ही एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्या असून सध्या सोलापूर रिजन मध्ये कार्यरत आहेत. प्रशालेत रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी प्रशालेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. स. मो. वा. निरीक्षक विद्यादेवी जाधव यांनी प्रशालेला भेट दिल्यानंतर विद्यार्थी दशेतील आपल्या आठवणींना उजाळा दिला. याच वेळी त्यांनी मुलींनी एमपीएससी परीक्षा करून आरटीओ क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी असल्याचे सांगितले. यावेळी दहावीच्या विद्यार्थिनींना त्यांनी 'रस्ता सुरक्षा नियम व महत्त्व बद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षिका एस. एस. कुलकर्णी, समीर दिवाण, प्रशांत मोरे उपस्थित होते. ज्येष्ठ पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी आभार मानले.



### 'क्वॉलिटी ऑफ सर्व्हिसेस इन कॉम्प्युटर नेटवर्क' विषयावर तज्ञांचे गेस्ट लेक्चर

**पंढरपूर, दि.२४ जानेवारी-**

येथील एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागामध्ये द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी क्वॉलिटी ऑफ सर्व्हिसेस इन कॉम्प्युटर नेटवर्क या विषयावर नुकतेच गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानास द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. असल्याची माहिती संगणक विभाग प्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांनी दिली. कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून राजेंद्र नवले यांना निमंत्रित करण्यात आले होते. राजेंद्र नवले, कॅप्जेमीनी, गुजरात येथे सिनियर सॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून कार्यरत आहेत. या कार्यशाळे दरम्यान त्यांनी कॉम्प्युटर नेटवर्क मधील क्वालिटी ऑफ सर्व्हिसेस या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. व्याख्यानासाठी कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग विभागामधून द्वितीय वर्षातील ७० विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानाचे आयोजन प्रा. धनश्री भोसले यांनी केले. आभार डॉ.सुभाष पिंगळे यांनी मानले.



### महापालिकेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त सुभाष उद्यान पाच्छा पेठ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयातही त्यांच्या प्रतिमेस आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी गटनेते चेतन नरोटे, विभागीय अधिकारी गायधनकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसुळे, श्रीगणेश बिराजदार, विजय पुकळे, शंकर माने, सिद्धू तिमीगार, अशोक खडके उपस्थित होते.

### अभ्यासाच्या तणावातून विद्यार्थिनीची आत्महत्या

**मोहोळ, दि. २४ जानेवारी-**

कामती बु।। येथील श्री राधाकृष्ण वसतीगृहातील स्नेहल प्रदीप धरगुडे या बारावीतील विद्यार्थिनीने शुक्रवारी रात्री आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. कामती पोलिसांकडून व परिचितांकडून मिळालेल्या माहितीनुसार ती विद्यार्थिनी बारावीत शिकत होती. गेल्या दोन ते तीन दिवसांपूर्वी ती आपल्या गावी गोटेवाडी येथे गेली होती. ती शुक्रवारी आपल्या वसतीगृहात परत आली होती. याप्रकरणी कामती पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मयत असा गुन्हा नोंद झाला आहे. दरम्यान या संस्थेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, बारावी परीक्षेच्या तणावात ती विद्यार्थिनी होती. अभ्यासाच्या तणावामुळे तिने आत्महत्या केली असावी, असे सांगितले.

## निधन वृत्त...

### शांताबाई शटगार



**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील प्रगतशील शेतकरी शंकर हनुमंतराव शटगार यांच्या पत्नी शांताबाई शंकर शटगार (वय ७८) यांचे शुक्रवार दि. २३ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. सलगर येथील शेतात अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# ग्रामीण भागातून नव उद्योजक निर्माण व्हावेत : डॉ. शिवाजी चोबे

## शिवाजी महाविद्यालयात फ्यूचर फाउंडर्स कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ जानेवारी-**

शासनाने कौशल्यावर आधारित शिक्षण देण्यावर भर दिला असून, या कौशल्याधारित शिक्षणामुळे ग्रामीण भागातून यापुढील काळात नव उद्योजक निर्माण व्हावेत, अशी इच्छा डॉ. शिवाजी चोबे यांनी व्यक्त केली.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर इन्क्युबेशन अँड इनोव्हेशन सेंटरच्यावतीने आयोजित फ्यूचर फाउंडर्स-२०२६ कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रकाश पाटील हे होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, उद्योजक सुशांत घोणे, सेंटरचे समन्वयक डॉ. राहुल शेळके आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. चोबे म्हणाले की, जागतिक स्तर आणि ग्रामीण स्तरातील अंतर आज संपुष्टात आले आहे. नवीन कल्पना पुढे येऊन त्याला आकार देण्याची गरज निर्माण झाली आहे. युवकांनी नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा अनेकांना रोजगार उपलब्ध करुन देणारे स्टार्टअप सुरु केला पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

नंदन जगदाळे म्हणाले की, कोणताही स्टार्टअप सुरु करण्यापूर्वी आयडिया स्पष्ट असायला पाहिजे. काही स्टार्टअप सुरु करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज नसते तर आयडिया उत्तम असावी लागते. हे उबर कंपनीने दाखवून दिले आहे. बाजाराला जे हवे ते आपण आपल्या उद्योगातून दिले तर नवा उद्योग सुरु होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

पी.टी. पाटील यांनी नवीन आयडिया शोधण्यात आजची पिढी आघाडीवर आहे. विद्यार्थ्यांचे विचार आणि दृष्टी विधायक असायला हवी. तुम्हाला मदत देणारे हात येतील.

पण ती मदत घेऊन आपला नवा उद्योग सुरु केला पाहिजे, असे त्यांनी मत मांडले. डॉ. राहुल शेळके यांनी प्रास्ताविक केले. डॉ.आसावरी फरताडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. उमेश साठे यांनी आभार मानले.

## मालेगाव (आर)च्या 'आनंद बाजार'त ४० स्टॉल्स; ४५ हजारांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२४ जानेवारी-**

येथील कै. चांगदेव लक्ष्मण घोडके माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आनंद बाजार' उपक्रमात विद्यार्थ्यांनी मांडलेल्या ४० स्टाॅल्सद्वारे सुमारे ४५ हजार रूपयांची उलाढाल झाली.

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य आणि व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत व्हावे या उद्देशाने आयोजित या बाजारात ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या नूतन किचन शेडच्या उद्घाटनाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते 'आनंद बाजार'चे रीतसर उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी मालेगावचे सरपंच समाधान बनसोडे, उपसरपंच निवृत्ती (तात्या) घोडके, तुकाराम जाधव, माध्यमिक शाळेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजपाल भुसारे तसेच जिल्हा परिषद शाळेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या आनंद बाजारमध्ये विद्यार्थ्यांनी एकूण ४० स्टॉल्स लावले होते. यामध्ये विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, ताजी फळे, भाज्या आणि घरगुती वस्तूंचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी केवळ वस्तूंची विक्रीच केली नाही, तर नफा-तोटा आणि हिशोबाचे प्रत्यक्ष धडेही गिरवले. दिवसभरात या बाजारात एकूण ४५,४९५ रुपयांची मोठी उलाढाल झाली, ज्यातून विद्यार्थ्यांच्या कष्टाला मोठे यश मिळाले.



**ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

या उपक्रमाला मालेगाव येथील तरुण वर्ग, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. पालकांनी आपल्या पाल्यांच्या स्टॉलला भेट देऊन खरेदी करत त्यांचा उत्साह वाढवला. शालेय जीवनातच अशा प्रकारचे व्यासपीठ मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण पाहायला मिळाले. माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देवेंद्र घोडके आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच जि. प. प्राथमिक शाळेचे श्री ठोंगे, श्री मस्के आणि त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## नूतन पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ जानेवारी-**

व्यापारी महासंघ पंढरपूर व व्यापारी कमेटी पंढरपूर यांच्या वतीने माघी यात्रेत निमित्त शहर पोलीस स्टेशन येथे विविध प्रश्नांवर मिटींगचे आयोजन केले होते. यावेळी पंढरपूर शहराचे नुतन वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांचा शहरातील व्यापाऱ्यांकडून सत्कार करण्यात आला.

पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. महेश रोकडे यांना फोन करून अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्याचे मान्य करून संयुक्त कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीला व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सत्यविजय मोहोळकर, व्यापारी कमेटीचे अध्यक्ष महावीर फडे, चेअरमन राहूल म्हमाने, राजूशेठ भट्टड, प्रदिपभाई फडे, व्यापारी महासंघाचे सचिव शिरीष शेठ पारसवार, व्यापारी कमेटीचे सेक्रेटरी ईसाप्पा भिंगे उपस्थित होते.

## 'बोलींचा जागर' या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. माने यांचे निबंध वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२४ जानेवारी-**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील इंग्रजीचे प्राध्यापक व प्रभारी प्राचार्य डॉ.माने ए.पी यांना पु.अ.हो.सो.विद्यापीठ, सोलापूर येथे झालेल्या बोलींचा जागर या शासकीय पातळीवरच्या उपक्रमांमध्ये आपले संशोधन सादर करण्याची संधी मिळाली. यामध्ये प्राचार्य माने सर यांनी बोलीभाषा संदर्भात बोलताना 'कैकाडी भाषा स्वरूप इतिहास व सद्यस्थिती' या विषयावर आपले पीएच. डी. चे संशोधन व भाषेतील काही गोष्टी उलगडून दाखवल्या आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



सोलापूर जिल्ह्यातून बोलींचा जागर या कार्यक्रमांतर्गत दोन व्याख्यात्यांनी कैकाडी भाषा आणि सोलापूरी बोली यावर संशोधनपर सादरीकरण केले . कैकाडी भाषेच्या संदर्भात केलेले डॉ.ए.पी माने सर यांचे संशोधन मोलाचे ठरले व त्यांची मांडणी श्रोत्यांना भारावून गेली.

हा कार्यक्रम विद्यापीठाच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भाषा वांड:मय संकुले यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये भाषा व वांड:मय विभागाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी परिसर घेतले.या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, राज्य शासनाचे भाषा अधिकारी मा. संजय पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय टेंभुर्णी चे प्राचार्य व भाषाभ्यासक डॉ. महेंद्र कदम आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी, भाषाभ्यासक व बहुसंख्येने श्रोते वर्ग उपस्थित होता.

## ई-फंक्शन मॅनेजमेंट सिस्टीम प्रकल्प ठरला अव्वल

**धाराशीव आयटीआयचे यश; शिल्प निदेशक डॉ. झरकर यांचे मार्गदर्शन, तालुका व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक**



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२४ जानेवारी-**

भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथील कोपा व्यवसायातील प्रशिक्षणार्थींनी सादर केलेल्या इलेक्ट्रॉनिक अल्बम ई-फंक्शन मॅनेजमेंट सिस्टीम या नाविन्यपूर्ण प्रकल्पास तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनामध्ये बिगर अभियांत्रिकी प्रवर्गात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. टाटा स्ट्राईव्ह प्रकल्पांतर्गत टाटा कंपनीकडून या प्रकल्पास विशेष प्राविण्यता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

हा प्रकल्प रुपामाता परिवार यांच्या सौजन्याने प्रायोजित असून, आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजोपयोगी गरजांची पूर्तता करणारा असल्याने मान्यवरांकडून विशेष प्रशंसा करण्यात आली. या प्रकल्पामध्ये प्रशिक्षणार्थी आयान शेख, गणेश रोटे, सुरज सोनटक्के व रितेश ढगे यांनी सहभाग नोंदविला असून, त्यांना संस्थेचे शिल्प निदेशक (कोपा) डॉ. किरण प्रकाश झरकर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त संजय गुरव, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांच्यासह आयएमसी सदस्य व विविध औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. सदर प्रकल्पाच्या माध्यमातून कोणत्याही कार्यक्रमाशी संबंधित फोटो, व्हिडिओ, पीडीएफ, बातम्या व निमंत्रण पत्रिका एका लिंकद्वारे वेब पोर्टल स्वरुपात उपलब्ध होतात. यामुळे माहिती तात्काळ मिळते, मोबाईल मेमरी वाचते व जुन्या आठवणी जतन करणे सुलभ होते. या तंत्र प्रदर्शनातून प्रकल्पास तीन नव्या ऑर्डर प्राप्त झाल्या असून, हा प्रकल्प विभागस्तरीय तंत्र प्रदर्शनासाठी निवडण्यात आला आहे. भविष्यात हा प्रकल्प अधिक व्यापक स्वरुपात विकसित होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## संघाला जातीयवादी म्हणणे हा खोडसाळपणा

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदू समाजाचे संघटन करतो, त्याप्रमाणे होणारी संघाची उक्ती व कृती लक्षात घेऊनदेखील संघावर जातीयतेचा आरोप केला जातो. संघ एका विशिष्ट जातीसाठी काम करतो, संघाला या देशांमध्ये परत एकदा एका विशिष्ट जातीचे राज्य आणावयाचे आहे अशा प्रकारचा भ्रम समाजामध्ये निर्माण केला गेला आहे.**

---

हिंदू समाजाचे संघटन करण्यातून संघ या देशांमध्ये हिंदू धर्मियांचा नको असलेला परंपरावादी संस्कार रुजविण्याचा प्रयत्न करत आहे, यातून हा समाज देववादी व कट्टर धर्मनिष्ठ बनवून या समाजाच्या गरजा भागविण्यासाठी एका विशिष्ट जातीला त्याचा उपयोग व्हावा असे संघाला वाटते, संघ हा एका विशिष्ट जातीच्या भल्यासाठी व स्वार्थासाठी संपूर्ण हिंदू समाजाला संघटित करत आहे, हिंदू समाजाचे नेतृत्व केवळ एका जातीकडे यावे यासाठी संघ काम करीत आहे, संघाच्या सर्वोच्च पदांवर कायम एका जातीचेच लोक जबाबदारी घेऊन काम करीत आहेत, एका विशिष्ट जातीचाच अधिक भरणा संघ कामात आहे असे अनेक आरोप संघावर केले जातात व देश तोडण्याचे काम संघ करीत असल्याचा एक भयानक आरोपही केला जातो. संघ पुन्हा एकदा मनुस्मृति लागू करण्याचा प्रयत्न करेल व संघाला या देशाचे संविधान बदलायचे आहे अशी भीतीही समाजात पसरवली जाते. परंतु खरंतर या सर्व गोष्टी जाणून बुजून समाजामध्ये निर्माण केल्या गेल्या आहेत. यामागे संघाची बदनामी करणे एवढेच नसून देश विघातक शक्तींना बळ देण्याचा प्रयत्न आहे.

संघावर असे जातीयवादाचे आरोप करण्यामागे काही कारणे आहेत. संघ स्वयंसेवकांएवढी शिस्त, संस्कार व देशभक्ती अन्य कोणत्याही संस्था - संघटना अथवा पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये क्वचितच दिसून येईल. विशेषतः राजकीय पक्षांमध्ये तर उणीवानेच अशा प्रकारचे कार्यकर्ते दिसून येतील. या परिस्थितीमध्ये संघाकडे जर लोकांचा ओढा कायम राहिला तर शिस्त, संस्कार व देशभक्तीच्या बळावर तयार होणारी सुसंस्कारित पिढी अशा राजकीय पक्षांना व स्वार्थी संस्था - संघटनांना झिडकारून लावतील व यामुळे आपल्या पक्ष - संघटनेला कार्यकर्तेच मिळणार नाहीत, केवळ या भयानेच संघाकडे जाणारा ओढा कमी करण्यासाठी अथवा रोखण्यासाठी संघावर असे आरोप केले जातात. संघ कार्यकर्त्यांची व इतर पक्ष संघटनातील कार्यकर्त्यांची तुलना झाल्यास आपण निश्चितच दोषी ठरु याचीही भीती अन्य पक्ष - संघटनांना आहे, त्यामुळेच संघासारख्या जातीयवादी संघटनेशी जोडले जाऊ नका, त्यांची विचारधारा देश तोडणारी आहे अशा भ्रामक कल्पना समाज मनात निर्माण केल्या गेल्या आहेत. या भ्रामक समजूतीला बळी पडून अनेक लोक संघाबाहेर राहून संघाबाबतची आपली मते व्यक्त करतात व संघ कार्यापासून दूर राहतात. संघाला जातीयवादी ठरवून आपला स्वार्थ साधणाऱ्या पक्ष - संघटनांना देशहित महत्त्वाचे वाटत नाही. त्यामुळेच संघ दुर्दैवाने जातीयवादी ठरला आहे.

संघाच्या कामांमध्ये जे सातत्याने सक्रिय आहेत अशा लोकांना असे आरोप कधीही मान्य होत नाहीत, कारण हे असे होणारे आरोप संघ कामांमध्ये दिसून येत नाहीत. संघ खरोखर काय करतो हे संघाच्या कामात आल्यानेच समजू शकते. इतरांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवत दूर राहून संघाकडे पाहण्यापेक्षा संघ कामात आल्यास नक्कीच हा भ्रम दूर होऊ शकतो व संघाला जातीयवादी म्हणणे हा खोडसाळपणा आहे हे लक्षात येते.

**जातीयवादी हा प्रचार संघावर अन्यायकारक**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला जातीयवादी म्हणणे हा निव्वळ खोडसाळपणा आहे.

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग – १८**

**– डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

खरंतर संघ हा एका जाती अथवा पंथ - उपासना पद्धतीचं संघटन करत नाही तर वेगवेगळ्या जातींना हिंदू म्हणून एकत्र आणून त्यांचं संघटन करतो. जातीचा अभिमान दूर ठेवायला लावून आपण सारे बंधू आहोत ही भावना संघ आपल्या कार्यातून निर्माण करत आला आहे. गेल्या शंभर वर्षात संघाने जातीवाचक भूमिका कधीही घेतली नाही, संघाच्या कार्यपद्धतीतून अशा प्रकारची भावना निर्माण होणार नाही असा सातत्याने संघ प्रयत्न करत आला आहे. संघाच्या उक्ती व कृतीतून संघाने केवळ हिंदू समाजाचे संघटन केले आहे, करत आला आहे. तरीही संघावर जातीयतेचा आरोप करणे हा संघावरचा अन्यायच आहे.

संघ या देशातील प्रत्येक जात - पोटजात, पंथ - उपासना पद्धती या सर्वांना बरोबर घेऊन चालत आला आहे. जे पक्ष अथवा संघटना स्वतःला पुरोगामी, धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय मानतात, त्यांच्या उक्ती व कृतीमध्ये मात्र फरक दिसून येतो. एका विशिष्ट जातीसाठी काम करणारे पक्ष व संघटना या देशात अनेक आहेत, परंतु दुर्दैवाने ते स्वतःला पुरोगामी - धर्मनिरपेक्ष मानतात. परंतु जातीभावातून उठून संपूर्ण समाजाचे संघटन करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना मात्र जातीयवादी हा दुर्दैवी प्रचार खरोखरच मनाला वेदना देणारा आहे.

संघामध्ये कदाचित एखाद्या जातीच्या लोकांची सक्रियता अधिक असू शकेल याचा अर्थ ती संघटना केवळ त्या जातीसाठी काम करते असे होत नाही. या न्यायाने विचार केला तर आपण या देशातील कोणताही राजकीय पक्ष अथवा एखादी संघटना डोळ्यासमोर आणली तर त्या पक्ष व संघटनेत एखाद्या जातीचा प्रभाव हा दिसून येतो, याचा अर्थ तो पक्ष किंवा ती संघटना त्या जातीची असा मात्र आरोप केला जात नाही. परंतु संघ हा सर्वांसाठी काम करत असून देखील संघावर आरोप करणे हा संघावर अन्यायच आहे. जे संघ स्वयंसेवक नाहीत त्यांच्या मनामध्ये जातीबद्दल असणारी भावना - जातीयतेचा असणारा भाव व संघ स्वयंसेवकांच्या मनात असणारी जातीयतेची भावना यामध्ये खूप मोठे अंतर दिसून येते. एखाद्या अमुक जातीमध्ये जन्म घेतलेली व्यक्ती संघ संपर्कात नसते, त्यावेळेस ती त्या जातीचा अभिनिवेश बाळगून व्यवहार करताना दिसून येते. परंतु ती व्यक्ती संघ संपर्कात येऊन स्वयंसेवक बनली की त्या व्यक्तीमधील जातीयतेचा अभिनिवेश संपून जातो व ती व्यक्ती स्वतःला हिंदू मानायला लागते. या देशातील अस्पृश्यता संपली पाहिजे, ती संपण्यासाठी जातीयता नष्ट झाली पाहिजे, जातीयतेचा अभिनिवेश संपला पाहिजे असे सारेच पक्ष म्हणतात. परंतु हे काम होणारच नाही असाच व्यवहार हे सारे पक्ष करताना दिसून येतात. परंतु जाती-जातीमध्ये अभिनिवेश संपवून जातीयता दूर करून सर्व जाती प्रवर्गांना हिंदू म्हणून एकत्र आणणाऱ्या संघावर मात्र जातीयतेचा आरोप केला जातो हे मोठे दुर्दैव आहे. संघ कामांमध्ये आल्यानंतर स्वयंसेवकांना या आरोपामागील असणारा भ्रम दूर होताना दिसतो. केवळ स्वार्थातून संघावर केला जाणारा आरोप हास्यस्पद आहे, हे संघ कार्यात येणाऱ्यांना समजते.

संघात कधीही जात विचारली जात नाही, संघाच्या कार्यामध्ये सर्वांना समान वागणूक दिली जाते व संघ कार्यामध्ये या देशातील प्रत्येक जात - पोटजात, पंथ - उपासना या सर्वांमधील लोकांचे प्रतिनिधित्व आहे हे लक्षात यायला लागते म्हणूनच संघ हा जातीयवादी आहे हा प्रचार खोटा असल्याचे सिद्ध होते. संघाच्या कामांमध्ये जे येतील, त्यांना संघ नक्की काय आहे हे कळून येईल. परंतु संघ जातीयवादी म्हणून केवळ संघावर अन्याय होत नाही तर या देशाच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवकांना रोखण्याचा प्रयत्न होत आहे, हा राष्ट्रहिताला असणारा धोका लक्षात घेऊन संघाला जातीयवादी म्हणणे बंद केले पाहिजे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महापौर, उपमहापौर निवडणुकीसाठी 'हात'वर करुन मतदान

### नामनिर्देशनपत्रावर प्रत्येकी एका सदस्याची सूचक, अनुमोदक म्हणून स्वाक्षरी आवश्यक

### विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी भूषविणार विशेष सभेचे अध्यक्षस्थान

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी,**

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व नियम २००५ अंतर्गत सविस्तर आणि पारदर्शक प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार इच्छुक नगरसेवकांनी नमुना-एकमधील नाम निर्देशनपत्र निश्चित तारखेला नगर सचिवांकडे स्वतः सादर करणे बंधनकारक आहे. एकापेक्षा अधिक उमेदवार असल्यास हात वर करुन मतदान प्रक्रिया राबविण्यात येईल. सर्वाधिक मते मिळवणारा उमेदवार विजयी होणार आहे, असे सांगण्यात आले.

शनिवार दि.३१ जानेवारी २०२६ रोजी महापौर आणि उपमहापौर या पदाची निवडणूक घेण्यासाठी विशेष बैठक होणार आहे. या बैठकीच्या किमान पूर्ण तीन दिवस आधी इच्छुकांना या पदांसाठी आपले नाम




निर्देशन सादर करता येणार आहे. सोलापूर महापालिका नगरसचिव विभागीय आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्त यांच्याशी विचार विनिमय करून या विशेष बैठकीची तारीख निश्चित करण्यात आली आहे. या विशेष बैठकीचे अध्यक्षस्थान विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी भूषविणार आहेत.

महापौर आणि उपमहापौर या पदाची निवडणूक लढविण्याची इच्छा असलेले नगरसेवक आपले नामनिर्देशन नगरपालिका नगर सचिवाकडे नामनिर्देशासाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करणार आहेत. त्यावर एका सदस्याने सूचक म्हणून व दुसऱ्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी असेल. कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवारांची नाम निर्देशने सूचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही. कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने चारपेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात येणार नाहीत.

दरम्यान, पीठासीन अधिकारी हे उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे पालिका सदस्यांना वाचून दाखवतील. एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर महापौरपदासाठी त्याची निवड झाल्याचे जाहीर करण्यात येईल. एकापेक्षा अधिक नामनिर्देशने करण्यात आली असतील तर, पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वर्णानुक्रमाने लावील. पीठासीन अधिकारी हे निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमाने घोषित करतील आणि हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल.

पीठासीन अधिकारी हे ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावांचीही नोंद करील. पीठासीन अधिकारी हे ज्यांनी मतदान केले आहे किंवा मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांचा नावांची नोंद करील आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषित करतील. प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर निकाल घोषित करण्यात येईल. समसमान मते मिळाल्यास चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे निकाल घोषित करण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

#### नगरसचिव करतील साहाय्य

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी, बैठकीच्या कामकाजाची नोंद घेण्यासाठी नगरसचिव पीठासीन अधिकाऱ्यास साहाय्य करतील. महापौर पदाच्या निवडणुकीसाठीची प्रक्रिया, योग्य त्या फेरफारांसह उपमहौपार पदासाठीच्या निवडणुकीसाठी लागू राहणार आहे.

#### उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ

महानगरपालिका सचिवाला प्राप्त झालेली सर्व नामनिर्दशने, बैठकीच्या दिवशी बैठक सुरु झाल्यानंतर, पीठासीन प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येतील. त्यानंतर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत, त्याने सही केलेली लेखी नोटीस पीठासीन अधिकाऱ्याकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

#### या गोष्टींची करण्यात येणार खात्री

मत देण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक सदस्याला आपले मत देण्यासाठी रास्त वाजवी संधी देण्यात आली आहे. अशा रीतीने दिलेले मत, ते ज्याला दिले असेल त्या उमेदवाराच्या नावासमोर योग्य रितीने नोंदविण्यात आले आहे. ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.




सोलापूर : शहरातील पोलिस मुख्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्र्यांना देण्यात येणाऱ्या मानवंदना परेडची रंगीत तालीम करताना पोलिस कर्मचारी.

## ३० जानेवारीपासून 'क्रेडाई'चे वास्तू, बांधकामविषयक प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

क्रेडाई कोल्हापूरतर्फे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे वास्तू व बांधकाम विषयक प्रदर्शन 'दालन २०२६' ३० जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत महालक्ष्मी दरबार हॉल ग्राउंड, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले आहे,

अशी माहिती संदीप बोरचाटे यांनी पत्रकार परिषदेत देण्यात आली. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री व पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे.

प्रदर्शनाच्या काळात विविध तांत्रिक सेमिनार्स आयोजित करण्यात आले आहेत. रविवार दि. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता विद्यार्थ्यांसाठी प्रा. एम. जी. गाडगीळ (मुंबई) यांचे व्याख्यान होणार आहे. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता अभ्युदय गोडबोले (केमिकल इंजिनिअर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सोमवार दि. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता समारोप कार्यक्रम जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते आणि इतर अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या पत्रकार परिषदेस क्रेडाई कोल्हापूरचे पदाधिकारी सुनील चिले, मौक्तिक पाटील, अक्षय जव्हेरी उपस्थित होते.




सोलापूर : शहरातील जुळे सोलापूर परिसरातील जय संतोषी माता मंदिराच्या वतीने शनिवारी सायंकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली.

## सामाजिक नियमांना जीवनाचे अविभाज्य घटक बनवा : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

'माता पिता आणि गुरुजन' हे नेहमी आपले चांगले व्हावे यासाठी सल्ला देत असतात. म्हणून सदैव त्यांच्या आज्ञेत रहा. सध्याचे वास्तव्य हे भयानक आहे. समाजाने आपल्यासाठी जे सामाजिक नियम घालून दिलेले असतात त्या सामाजिक नियमांना आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवा. समाजात वावरताना सामाजिक नियमांचे पालन करा. सोशल मीडियापासून सावध राहा आणि उत्तम निर्णय क्षमता अंगी बाळगा, असे प्रतिपादन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता पाटील यांनी केले.

येथील दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेतर्फे आयोजित कलाविष्कार २०२६ च्या उद्घाटन समारंभाप्रसंगी त्या बोलत होत्या.



समारंभाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक तथा माजी प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे हे होते. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापिका मनीषा पाटील, पर्यवेक्षिका सुनिता गवळी, कलाविष्कारच्या कार्याध्यक्षा महानंदा चिक्कळी, संतोष हंपे, पुष्पा शहाणे, असलम चांदा, प्रकाश जाधव उपस्थित होते.

प्रारंभी अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. मुख्याध्यापिका मनीषा पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्मिता हुमनाबादकर, रवी सुरवसे, रिचा वड्डेपल्ली, गायत्री करदास, ज्ञानेश्वरी केत, श्रावणी खरात यांनी केले. महानंदा चिक्कळी यांनी आभार मानले.

या कलाविष्काराची सुरुवात स्वागत गीताने झाली. २५५ विद्यार्थ्यांच्या या कलाविष्कारात सहभाग होता. श्रावणी पवारच्या नेत्रदीपक लाठीकाठी प्रकाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

### काम करत असताना विजेचा धक्का; दोघे जखमी

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

रेल्वे रुळाचे काम करत असताना लगतच असलेल्या विजेचा पोल मधून विजेचा धक्का बसल्याने दोघेजण जखमी झाले. ही घटना माळुंब्रा गावात घडली. शुभम दत्तात्रय सोनवणे वय २० आणि तेजस सोमनाथ माने वय २१ हे दोघे राहणार वाघोली मोहोळ अशी जखमींची नावे आहेत. माळुंबरा गावात सध्या रेल्वे रुळाचे काम सुरू आहे.

याठिकाणी कामगार म्हणून काम करत असलेल्या या दोघांना कामाच्या लगत असलेल्या वीज मंडळाच्या लोखंडी पूलवरून गेलेल्या लाईनवरील तारेतून विजेचा झटका बसल्याने त्यांच्या हातात व छातीस भाजून ते जखमी झाले. भाऊ संतोष सोनवणे यांनी सोलापूर शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याची नोंद सिव्हिल चौकीत झाली.

## माळशिरस : राम सातपुते यांच्या अस्तित्वाची, मोहिते-पाटील व जानकर यांच्या प्रतिष्ठेची लढाई

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२४ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात चुरस निर्माण झाली आहे. दरम्यान, यंदाची निवडणूक ही माजी आमदार राम सातपुते यांच्या अस्तित्वाची तर मोहिते-पाटील, आ.उत्तमराव जानकर यांच्या प्रतिष्ठेची लढाई मानली जात आहे.




भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासह शिवसेना उबाठा, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र विकास सेना या पक्षांनी सुध्दा आपापले उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. जिल्हा परिषद अध्यक्षपद इतर मागास प्रवर्गातील महिलांसाठी तर पंचायत समिती सभापतिपद सर्वसाधारण आहे. दहिगाव जि.प.गटातून आ.उत्तमराव जानकर यांचे चिरंजीव जीवन जानकर, कन्या ज्योती जानकर यांनी तर माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आ.उत्तम राव जानकर यांच्या पत्नी विमल जानकर यांनी फोंडशिरस जि.प.गटातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. वेळापूर जिल्हा परिषद गटातून आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या पत्नी मिनाक्षी सरतापे यांचा अर्ज राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातून दाखल करण्यात आला. पिलीव जिल्हा परिषद गटातून भाजपकडून चंद्रकांत जाधव तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून रणजित जाधव व माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

निमगाव जि.प.गटातून शिवसेना शिंदे गटाकडून माजी सभापती मच्छिंद्र ठवरे यांच्या पत्नी नीलावती ठवरे, भाजपकडून ज्योती ठवरे, संग्रामनगर पं.स.गणातून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष फत्तेसिंह माने-पाटील यांच्या सूनबाई राजेश्वरी माने-पाटील भाजपकडून, निशा गिरमे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून, लवंग पं.स.गणातून शिवसेना उबाठा गटाकडून गणेश इंगळे यांच्या पत्नी जयश्री इंगळे, भाजपकडून ऋतुजा पराडे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोमल पाटील यांनी अर्ज दाखल केले.

वेळापूर पं.स.गणातून भाजपकडून अमृतराज माने-देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसकडून संदीप माने-देशमुख, यशवंतनगर पं.स.गणातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून वैष्णवी मोहिते-पाटील विरुध्द भाजपचे अशोक एकतपुरे, निमगाव पं.स.गणातून के.के.पाटील यांचे चुलत बंधू किरण पाटील विरुध्द शिवसेना शिंदे गटाकडून मल्लसम्राट रावसाहेब मगर यांचे चिरंजीव दत्तात्रय मगर हे रिंगणात उतरले आहेत.

पिलीव पं.स.गणातून जलनायक शिवराज पुकळे यांच्या पत्नी नम्रता पुकळे विरुध्द राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांच्या पत्नी यज्ञासेन जहागिरदार यांच्यात लढत होणार आहे. दरम्यान, माळशिरस तालुक्यात अनेक ठिकाणी दुरंगी, तिरंगी अश्या लढती होत असल्या तरीही २७ तारखेला उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतरच चित्र स्पष्ट होईल.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ जानेवारी :** जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने, शाळा, महाविद्यालयांत मतदार जनजागृती करण्यानिमित्त वेळापत्रक जाहीर केले आहे. १९ जानेवारीपासून वेळापत्रकानुसार अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती लातूर पं. स.चे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी दिली.

दि. १९ ते २३ जानेवारी दरम्यान, शाळांचे केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, विस्तार अधिकाऱ्यांची बैठक, शाळांमध्ये निबंध, चित्रकला स्पर्धा, जनजागृतीविषयक कार्यक्रम, बीएलओंची आढावा बैठक, असे कार्यक्रम पार पडले. दि. २४ जानेवारी रोजी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी शाळा परिसरातील मुख्य चौक व गर्दीच्या ठिकाणी मतदान जनजागृती विषयक पथनाट्य, सर्व शाळांत मतदार जनजागृतीसाठी पालक मेळा-वा घेण्यात आला. दि. २६ जानेवारीला प्रभातफेरीद्वारे जनजागृती करणे, घोषवाक्य देणे हे कार्यक्रम होणार आहेत. तर दि. २७, २८ जानेवारी रोजी सर्व शाळांत वक्तृत्व - घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि. २९ जानेवारीला सर्व शाळांत पत्रिका वाटप, दि. ३० जानेवारी रोजी मतदार संकल्प पत्र आई-वडिलांकडून घेणे, दि. ३१ जानेवारीला स्काऊट गाईड रॅली कार्यक्रम, मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूर येथे होईल. दि. २ फेब्रुवारी रोजी मतदार जनजागृती विषयक सायकल रॅली मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूरसह इतर ठिकाणी काढण्याच्या सूचना लातूरचे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षकांना दिल्या आहेत. ही जनजागृती मोहीम ३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.



# मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीकडे लातूरवासियांचे लक्ष लागले असून कोणत्या नगरसेवकाच्या खांद्यावर कोणती जबाबदारी सोपविली जाऊ शकते,याबद्दल सामान्य नागरिकांत प्रचंड उत्सुकता आहे. मनपा निवडणुकीत काँग्रेस - वंचित आघाडीला लातुरात स्पष्ट बहुमत मिळाल्याने नागरिकांच्या नजारा आता आ. अमित देशमुख यांच्या निर्णयाकडे लागल्या आहेत.




मनपाचे महापौर पद अनुसूचित जातीच्या महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने आता त्या पदाबद्दलची उत्सुकता संपली आहे. तरीही महापौर कोणाला विराजमान केले जाणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मनपात पहिल्यांदा प्रवेश करणाऱ्या नगरसेविकेवर आ. अमित देशमुख एवढी मोठी जबाबदारी सोपविणार नाहीत, असा अनेकांचा होरा आहे. त्यामुळे दुसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या अजनीकर यांच्या गळयात महापौर पदाची माळ पडण्याची शक्यता अधिक दिसून येत असल्याचे बोलले जात आहे. या एकाच पदाबद्दल नागरिकात चर्चा नसून त्यासोबतच उपमहापौर, विविध विषय समित्यांचे सभापतीपदांवर कोणाची वर्णी लागणार ? याकडेही सामान्य लातूरवासियांचे लक्ष लागले आहे. राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार असताना लातूरच्या मतदारांनी काँग्रेसला स्पष्ट बहुमत दिले आहे. लातूर शहराच्या विविध विकास कामांसाठी भविष्यात लागणाऱ्या शेकडो कोटींच्या निधीसाठी आ.अमित देशमुख यांना त्यांच्या राजकीय नातेसंबंधांचा अतिशय चौकसपणे वापर करावा लागणार आहे. आ. देशमुख आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संबंध जवळीकतेचे असल्यामुळे लातूरच्या विकास कामांना निधीची कमतरता भासणार नाही, असाही अंदाज लावला जात आहे. आता निवडणुका संपल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री सुद्धा विकास कामांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना उपलब्ध करून देतील,असा विश्वासही नागरिकांना वाटत आहे.

या महिना अखेरीस महापौर पदाच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर होईल. त्यानंतर उपमहापौर आणि विविध विषय समित्यांच्या सभापतींच्या निवडीचा कार्यक्रम लागेल. शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्यासाठी पदाला न्याय देण्यास सक्षम असणाऱ्या चेहऱ्याच्या निवडी करण्यास आ. देशमुख प्राथमिकता देणार असल्याची चर्चा काँग्रेसच्या वर्तुळात चालू आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून घेताना खऱ्या अर्थाने आ. अमित देशमुखांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. त्यांनीही राजकारणातील अनेक चढ उतार अनुभवले - पाहिले असल्याने यासंदर्भात ते उचित निर्णय घेतील असा अनेकांना विश्वास आहे.

मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीमध्येही आ. देशमुख अनुभवी चेहऱ्यांना प्राधान्य देतील, अशी चर्चा काँग्रेस आणि मनपा वर्तुळात चालू आहे. मावळत्या पालिका पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत अधिक चांगले काम करण्यासाठी आपल्या नगरसेवकांना आ. देशमुख योग्य ते निर्देश देणार आहेत, हे कोणालाही वेगळ्या शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. शहराच्या कोणत्या प्रभागातील कोणत्या नगरसेवकांवर विषय समितीची जबाबदारी सोपविली जाईल याकडेही लातूरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

# लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त आज बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधत यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु होणार असून या महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असेआवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे.



महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन होत असून याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून ७३ वा यात्रा महोत्सव सुरु होणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व कर्नाटक राज्यातील नागरिक व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. हा यात्रा महोत्सव शांततेत पार पडावा यासाठी प्रतिवर्षी विविध समित्या गठीत करण्यात येतात. सदर यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान येथे बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व शहर परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची समाज जागृतीसाठी गरज : अॅड. पगार गवांदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरीतींच्या विरोधात विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अँड. रंजना पगार गावंदे यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेच्या समारोप व तिसऱ्या पुष्पाच्या प्रसंगी समाज वास्तवाला भिडताना या विषयावर विचार मांडत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते. तर विचारमंचावर सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना अँड. पगार गवांदे म्हणाल्या की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आयोगातही समाजामध्ये कर्मकांड मोठ्या प्रमाणात पसरवले जात आहेत. चेटूक, डाकिन, अघोरी उपाय करणारे भोंदू बाबा, मांत्रिक, तांत्रिक यांनी समाज नासवला आहे. तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा आणि महाराष्ट्रातील संत सुधारकांनी या सर्व वाईट चालीरीती, रूढी परंपरा यांच्या विरुद्ध परखड शब्दांत ताशेरे ओढले आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजाचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत स्त्री भ्रूणहत्या मुलींची कौमार्य चाचणी, चारित्र्य परीक्षा, देवदासी आणि बालविवाह प्रथा देखील विज्ञाननिष्ठ समाजाने उखडून फेकल्या पाहिजेत. जातपंचायतीमध्ये अडकलेल्या कुटुंबांना या जोखडातून मुक्त केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवण्णा हे क्रांतिकारी समाज सुधारक होते त्यांच्या आंतरराष्ट्रीय कल्पना केवळ संघटित कार्याद्वारेच मूर्त होऊ शकते ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी शरण यांना एकत्र करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली. आजच्या लोकशाही शासन व्यवहारात देखील महात्मा बसवन्नाचे विचार तत्त्वज्ञान कार्य समाज उन्नती करिता मोलाचे आहेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, पाहुण्याचा परिचय डॉ. अश्र्विनी रोडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले आणि आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले.

# प्रशासक काळ संपूनही मनपाची अनागोंदी थांबेना

**माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची मनपा आयुक्तांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका नुकत्याच पार पडल्या असून महापौर, उपमहापौर निवडी बाबत राज्य शासनाने कार्यक्रम जाहीर केलेला आहे. अशा परिस्थितीत व्यक्ती विशेष यांचे हित जोपासत नियम धाब्यावर बसवीत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची घाई मनपा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. याबाबत माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी मनपा आयुक्तांकडे पारदर्शकता पाळण्याची विनंती केली आहे.



मागील ३ वर्षापेक्षा अधिक काळ लातूर महानगरपालिकेत प्रशासक राज्य होते. याकाळात झालेला अनागोंदी कारभार लातूरकरांनी अनुभवला आहे. आता निवडणूक संपन्न झाल्या तरी यात बदल होताना दिसून येत नाही. नूतन कार्यमंडळ अस्तित्वात आले असूनही सर्व साधारण सभा तथा स्थायी समिती यांच्या मंजुरी न घेता राबविण्यात येत असलेली प्रक्रिया कायदेशीर नसल्यानं यावर स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# विवेक सौताडेकर यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्या शाखा अंतर्गत लातूरचे साहित्यिक व इतिहास संशोधक विवेक सयाजीराव सौताडेकर यांनी हिंदी और मराठी उपन्यासों में छत्रपती शिवाजी : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर संशोधन पूर्ण करुन प्रबंध सादर केला.त्यामुळे विद्यापीठामार्फत अनेक तज्ज्ञांच्या उपस्थितीमध्ये त्यांची मौखिक परिक्षा घेऊन स्वा. रा.ती.म.विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक म्हणून किल्लारी येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. हणमंत पवार यांनी काम पाहिले.



मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मार्फत प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. अपर्णा पाटील,मौखिक परिक्षेच्या अध्यक्षस्थानी स्वा.रा.ती.म.नांदेड येथील भाषा विभागाचे संचालक डॉ.दिलीप चव्हाण, मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. हणमंत पवार तसेच माजी अधिष्ठता प्राचार्य डॉ .नागोराव कुंभार, डॉ .रणजीत जाधव,प्राचार्य डॉ.संग्राम मोरे, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ.गणपतराव माने, डॉ.देवकांत गुरव, डॉ.ज्ञानेश्र्वर देशमुख, डॉ. रामभाऊ मुटकुळे, डॉ.नयन राजेमाने ,प्रा.जयश्री भताने,आदी मान्यवर उपस्थित होते.

# केशवराजमध्ये बोस-ठाकरे जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंचावर प्रमुख वक्ते विद्यालयातील इतिहास विषयाचे तज्ञ शिक्षक प्रल्हाद माले, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रल्हाद माले यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपणारे, महाराष्ट्रातील लोकांची वैचारिक जडणघडण करणारे, शिवसेना या राजकीय पक्षाचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम प्रमुख प्रयागराज गरुड यांनी केले. याप्रसंगी आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २६ जानेवारी रोजी बंद राहणार


**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच मंगळवार, २७ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त : डॉ. आनंद रेड्डी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून तणाव, चिंता व नैराश्य यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत संतुलित जीवनशैली अंगीकारणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ तथा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षक डॉ. आनंद रेड्डी यांनी केले.



एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने कृत्रिम दंत रोपण दिनानिमित्त आयोजित 'मानसिक आरोग्य व ताण व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात डॉ. आनंद रेड्डी बोलत होते. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. सुषेन गांजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. आनंद रेड्डी म्हणाले की, नियमित व्यायाम, योग व ध्यान यामुळे मन शांत राहते. दररोज किमान सात ते आठ तासांची पुरेशी झोप, संतुलित आहार, पाण्याचे योग्य सेवन, छंद जोपासणे, संगीत ऐकणे तसेच आवडत्या व्यक्तींसोबत वेळ घालवणे हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. वेळेचे योग्य नियोजन, काम व वैयक्तिक आयुष्यात समतोल राखणे आणि सोशल मीडियापासून वेळोवेळी विश्रांती घेणे ही संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यास पोषक ठरते.सूत्रसंचालन डॉ. समर्थ रेवडकर, डॉ. वेदिका देशमुख, डॉ. श्रेयस मगर यांनी केले तर आभार डॉ. सुषेन गांजरे यांनी मानले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रविण मरुरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. अमोल बडगीरे, व डॉ. शितल वाघ, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. प्रणोती चिंचनसुरे, डॉ. शारदा झाडके, डॉ. प्रतिक्षा सोमवंशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.डी.एस. व एम.डी.एस. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपातर्फे पानगावातून सतीश आंबेकर यांची उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातून वाडीवस्तीतून ऋषिकेशदादा कराड यांच्या नावाला पसंती होती मात्र पक्षाच्या निर्णयानुसार त्यांना उमेदवारी देणे शक्य नसल्याने भाजपाच्या वतीने सतीश आंबेकर हे अधिकृत उमेदवार असतील तेंव्हा सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून बहूमताने विजयी करावे आणि पानगाव हा लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.




पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झाली याप्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आमदार आणि खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली जाणार नाही असा निर्णय भाजपाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत झाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या निर्णयामुळे पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी गावागावातून वाडी वस्तीतून अनेकांनी मोठ्या प्रमाणात केली होती. पक्षाच्या निर्णयानुसार आणि आदेशान्वये ऋषिकेश कराड यांची उमेदवारी मागे घेण्यात येत असून सतीश आंबेकर यांना भाजपाचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले.

आमदार खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी नाही हा पक्षाचा निर्णय रमेशआप्पा कराड यांच्या पर्यंत मर्यादित नसून राज्यातील जवळपास चाळीस जागेसाठी बंधनकारक आहे. याबाबतीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि निवडणूक प्रमुख चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्यासोबत माझी चर्चा झाली असल्याचे सांगून पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आत्तापासून जिद्दीने जोमाने कामाला लागावे आणि पुन्हा एकदा पानगाव हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करावे असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# निळकंठेश्वर साखर कारखान्याने दिड लाखांचा टप्पा ओलांडला

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २४ जानेवारी :** अनेक वर्षापासून बंद असलेल्या तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने चालू हंगामात दीड लाख मेट्रिक टनाचे गाळप करुन उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करून विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. काटेकोर नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर आणि शेतकरी व कारखाना प्रशासन यांच्यातील उत्तम समन्वय यामुळे हे उद्दिष्ट वेळेत साध्य झाले असून संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



कारखान्यात दररोज सरासरी २८०० ते २९०० मेट्रिक टन प्रति दिन इतक्या क्षमतेने अखंड गाळप सुरू आहे. विशेष म्हणजे यंदा साखर उताराही समाधानकारक आणि चांगला मिळत असल्याने कारखान्याच्या आर्थिक स्थितीला भक्कम आधार मिळाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली कामगार, अधिकारी आणि संचालक मंडळ यांनी एकसंघपणे केलेल्या प्रयत्नांचे यश असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.ज्या शेतकऱ्यांचा ऊस अद्याप शिल्लक आहे त्यांनी कोणतीही चिंता करू नये. शेवटच्या शेतकऱ्याचा ऊस गाळप होईपर्यंत कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यात येणार आहे. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

निळकंठेश्वर साखर कारखाना परिसरातील शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरत आहे. वेळेवर गाळप, चांगला उतारा आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या धोरणामुळे कारखान्याने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. आगामी काळातही शेतकरी, कामगार आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने आणखी मोठी उद्दिष्टे गाठली जातील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २४ जानेवारी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा राज्यशास्त्र,लोकप्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन निलंगा तहसीलचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के एन कदम, उप प्राचार्य डॉ.बी एस गायकवाड, प्रा. पी पी गायकवाड हे उपस्थित होते. महाविद्यालयामार्फत घेण्यात आलेल्या भितीपत्रक, घोषवाक्य, निबंध, रांगोळी, वकृत्व, वादविवाद स्पर्धेची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ व्ही पी सांडूर प्रा बदनाळे एस एस, प्रा माने पौर्णिमा, प्रा सातपुते पूनम आदींनी प्रयत्न केले.

## अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुकाध्यक्षपदी सचिन शेटे तर तालुका संघटकपदी ज्ञानेश्वर सांगवे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २४ जानेवारी :** अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडी ता.२२ जानेवारी रोजी शहरातील शिवकुमार सोनटक्के यांच्या माय मंदिर येथे ही निवड करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे,राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेटे,लातूर जिल्हा अध्यक्ष ड.विलास खिंडे, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत कोरे, संपर्कप्रमुख सचिन मंगनाळे,धार्मिक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ शिवणे सह विविध मान्यवर उपस्थित होते.सर्व उपस्थित मान्यवरांच्या वतीने अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.यामध्ये तालुका अध्यक्ष पदी सचिन शेटे,तालुका संघटक पदी ज्ञानेश्र्वर सांगवे,तालुका कमिटी सदस्यामध्ये शिवराज काळगे,संगम हवा, चंद्रकांत पाटील,श्रीराम धनशेट्टे,राजेश्र्वर पाटील, गणेश मोरगे आदींची निवड करण्यात आली.



यावेळी उपस्थित मान्यवरांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच सचिव शेटे व ज्ञानेश्र्वर सांगवे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## कॉपी आढळल्यास परीक्षा केंद्राचा परवाना होणार रद्द

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांदरम्यान, कॉपीमुक्तीसाठी प्रयत्न जारी ठेवले असून, लातूर विभागीय परीक्षा मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या बोर्ड परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यावर्षीही परीक्षा केंद्रावर कॉपी आढळल्यास केंद्र रद्दची कारवाई होणार आहे.

गतवर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांच्या कार्यक्रमात दहावी, बारावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी ज्या केंद्रावर कॉपी आढळेल, ती परीक्षा केंद्र रद्द करण्याचे जाहीर केले होते. हा निर्णय यावर्षीच्या परीक्षेवेळी कायम ठेवला जाणार आहे. लातूर विभागीय परीक्षा मंडळाअंतर्गत येणाऱ्या नांदेड, धाराशिव व लातूर जिल्ह्यांतून इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा एक लाख ११ हजार २८७ विद्यार्थी देणार आहेत. ही दहावीची परीक्षा तीन जिल्ह्यांच्या ४१८ केंद्रांवर होणार आहे. इयत्ता बारावीची बोर्ड परीक्षा तीन जिल्ह्यांतून ९६ हजार ४९६ विद्यार्थी देणार आहेत. कॉपी करून विद्यार्थी पार करणाऱ्या रॅकेटला यामुळे पायबंद बसणार आहे. दहावी, बारावी बोर्ड परीक्षेवेळी होणारा कॉपी प्रकार थांबायचे नाव घेत नसल्याने राज्य सरकारने आणखी एक फंडा आणला, तो म्हणजे लातूर विभागीय परीक्षा मंडळाने दहावी (केंद्र ४१८) व बारा

## उड्डाणपुलावरुन पडून एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपुलावरूनपडल्याने एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली आहे. शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास एका चाळीस वर्षीय व्यक्तीने उड्डाणपुलावरुन उडी घेत आत्महत्या केली.उंचावरुन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. डोक्याला, पायाला, छातीला मार लागला होता. चौकातील नागरिकांनी त्यास उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले होते. मात्र, गंभीररित्या जखमी झाल्याने सदरील व्यक्तीचा उपचारासाठी दाखल होताच मृत्यू झाला. मयताची ओळख रात्री उशिरापर्यंत पटलेली नव्हती. शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पो. हे. रामराव जाधव हे करीत आहेत.

## अरविंद सोनवणे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरविंद माणिकराव सोनवणे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. २३) सकाळी ८.५० च्या सुमारास शहरातील एका खाजगी रूग्णालयात निधन झाले. त्यांच्यापश्र्चातदोनमुले,एकमुलगी,असापरिवारआहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. अरविंद सोनवणे ते २००५ दरम्यान, लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, वाले इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष, व्यापारी धर्मशाळेचे अध्यक्ष, सिद्धेश्र्वर देवस्थानचे सदस्य, गोरक्षण संस्थेचे सदस्य, अडत व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष, राष्ट्रीय गुमास्ता मंडळाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सातत्याने वावर होता. वेगळे, नवीन काही तरी करण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात विद्यार्थिनी व्याख्यानमाला संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २४ जानेवारी :** सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ साहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील महाराष्ट्र महाविद्यालयात विशेष विद्यार्थिनी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचा विषय सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ: जीवनपट असा होता. यात २० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

प्रत्येक विद्यार्थिनीने विषयाचा अनुषंगाने अभ्यास करून आपली मते मांडली, व दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी आजच्या काळातील त्यांच्या कार्याची प्रस्तुतता विषद करून त्यांच्याकडून तरुणींनी कोणती प्रेरणा घ्यायला हवी हे सांगितले. व्याख्यान सादर करणाऱ्या सर्वोत्कृष्ट व्याख्यात्या विद्यार्थिनीला या प्रसंगी सन्मानित करण्यात आले. यात गुणानुक्रमे प्रथम कु. प्रणिता तांबाळे, द्वितीय कु. सोमवंशी मोनिका आणि तृतीय कु. आलिया सुमय्या तर उत्तेजनार्थ कु. मुळे अंकिता यांनी स्थान पटकावले.

यावेळी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. कदम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी.एस.चौधरी, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. मनीषा घोगरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.डी.एस.चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## गुरू तेगबहादूर यांच्या जीवन कार्याचा सर्वांनी बोध घ्यावा : अॅड. बेंडकुळे

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** शीख धर्माचे ९ वे गुरू श्री गुरू तेगबहादुर यांनी आपल्या आयुष्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी धर्मासाठी केलेले कार्य प्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचा सर्वांनी बोध घ्यावा, असे मत अँड किशनराव बेंडकुळे यांनी व्यक्त केले.




श्री तेगबहादुर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने शासनाच्या परिपत्रकानुसार हिंद-की-चादर श्री गुरू तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागम शताब्दी वर्षा निमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला धर्मप्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचे स्मरण होण्याकरिता त्यांच्या जीवन चरित्रावरील डॉक्युमेंट्री दाखविणे, वक्तृत्व स्पर्धा, गटचर्चा, जनजागृती, प्रभात फेरी, निबंध लेखण, चित्रकला, व्याख्यान अशा विविध स्पर्धा व कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रा डॉ प्रकाश देशमुख यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्री गुरु तेगबहादूर यांच्या कार्यावर यथोचित प्रकाश टाकला व त्यांच्या कार्याचा बोध सर्वांनी घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रकाश देशमुख यांनी गुरू तेगबहादूर यांच्या कार्याचा परिचय करून दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ बालाजी पाटील डॉ यादव सूर्यवंशी प्रा. प्रकाश डवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ बालाजी पाटील यांनी केले आभार नागेश पवार यांनी मानले.

## रेणापूरच्या आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २४ जानेवारी :** येथील रूपचंद नगर मधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे उद्घाटन रेणापूरचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व स्वर्गीय कै. मिठाराम रूपचंद राठोड यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई मिठाराम राठोड या होत्या. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक देडे यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण ,कलागुण विकसित पूर्ण शिक्षण मिळणे महत्वाचे असल्याचे सांगितले. या आश्रमशाळेच्या माध्यमातून रेणापूरच्या विद्यार्थ्यांना अत्यंत दर्जेदार शिक्षण आणि शिक्षण विषयक सुविधा पुरविल्या जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य प्रदीप राठोड यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधताना विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीगणेश वंदनाच्या नृत्याने करण्यात आली. कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी विविध हिंदी, मराठी,भारुड, देशभक्ती गाण्यावर नृत्य सादर केले व त्यानंतर नाटकाचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख राठोड बी. एन. सौ. सुरेखा मॅडम, सौ. चव्हाण मॅडम, तुरुप मॅडम, बोने, मालुसरे,चव्हाण, कासले, वडवले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक लव्हेकर यांनी केले तर आभार प्रा. खाडप यांनी मानले. यावेळी सर्व विद्यार्थी - पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदपुरात मन्मथ स्वामी जन्मोत्सव सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** वीरशैवांचे महान संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा वीरमठ संस्थांन अहमदपूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही मन्मथ स्वामी यांच्या जयंती उत्सवानिमित्त शिभप संतोषी मिटकरी अंधोरीकर यांचे कीर्तनाचा कार्यक्रम झाला. यावेळी आचार्य गुरुराज स्वामी महाराज आशिर्वचनात म्हणाले, मन्मथ माऊली यांनी वीरशैव लिंगायत धर्मात कीर्तन, प्रवचन, करत परंपरेचे पुनर्जीवन केले. १६ व्या शतकात त्यांनी केलेले महान कार्य पुढे विसाव्या शतकात राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी पुढे चालवले. या महान विभूतींचा जन्मोत्सव आपण सर्वांनी साजरा केलात, त्यांचे विचार आचार आत्मसात करणे गरजेचे आहे. तसेच परमरहस्य ग्रंथाचे पठण करुन त्याचे आचरण करणे तितकेच गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

## हरिकिशन लोया यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २४ जानेवारी :** चाकूर येथील प्रतिष्ठित व्यापारी हरिकिशन मोतीलाल लोया यांचे वयाच्या ८० व्या वर्षी लातूर येथील खाजगी रूग्णालयात गुरूवारी दिनाक २२ जानेवारी रोजी उपचारा दरम्यान दुखद निधन झाले.त्यांच्यावर चाकूर येथील मारवाडी स्मशानभुमी येथे शुक्रवारी दिनांक २३ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी शंकुतलाबाई,तीन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते पत्रकार ओम लोया यांचे वडील होते. अंत्यसंस्कारास चाकूर शहर आणि परिसरातील नागरिक,नातेवाईक,मित्रमंडळी उपस्थित होते.



# 'जागृती' च्या ७,२१,००१ साखर ५० किलोचे पोत्याचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २४ जानेवारी :** राज्यातील खाजगी साखर कारखान दारीत नावलौकिक असलेल्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिजच्या २०२५-२६ च्या चालू गळीत हंगामात ३ लाख ६३ हजार ४६० मे.टन ऊसाचे गाळप करुन ११.५७ उताऱ्यासह १ कोटी ६ लाख ८४ हजार ८०० युनिट विज निर्यात केली आहे. उत्पादीत केलेल्या ७ लाख २१ हजार १ साखर पोत्याचे पूजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा साखर काखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, राम भंडारे, धनाजी कोटे, जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेती अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, आसवणी प्रमुख विलास पाटील, फायनान्स अधिकारी ए.व्ही.सुर्यवंशी, उपमुख्य अभियंता अक्षय सुर्यवंशी, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार, चिफ अकौटंट सर्जेराव पाटील जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते.




## मांजरा महिला अर्बन को -ऑप. सोसायटीत हळदी -कुंकू समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** मकर संक्रांती निमित्त मांजरा महिला अर्बन कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कार्यालयात २४ जानेवारी रोजी महिलांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या सोसायटीच्या चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्त्यां, उद्योजक प्रियांका सुरवसे आणि त्यांच्या महिला कर्मचाऱ्यांनी सर्व महिलांचे कुंकू लावून आणि वाणाची स्नेहभेट देऊन स्वागत केले. त्यानंतर जमलेल्या प्रत्येक महिलांनी उखाणे घेतले. उखान्याचा कार्यक्रम चांगलाच रंगला. उपस्थित महिलांसाठी स्वादिष्ट अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. हळदी कुंकूवा निमित्त मांजरा महिला क्रेडिट सोसायटीतर्फे १३ महिन्याच्या ठेवीवर १२ टक्के व्याजदर देण्यात येणार आहे. या संधीचा महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन चेअरमन प्रियांका सुरवसे यांनी यावेळी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या चेअरमन प्रियांका सुरवसे, सचिव रोहिणी धायगुडे, व्यवस्थापक आदर्श कांबळे आणि कर्मचारी, अभिजीत कांबळे, सोहेल पठाण, सुरज उदारे, दुर्गेश डूमने, ऐश्र्वर्या पाटील, धनश्री अडसूळ, अनिता गोडपटले व इतर कर्मचारी महिलांनी परिश्रम घेतले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतकऱ्यांच्या नशिबी अठरा विश्व दारिद्र्यचं !

शेतकरी अन्नदाता म्हणून गौरवला जातो, पण त्याच्या नशिबी मात्र आजही अठरा विश्व दारिद्र्य आलेलेच आहे. पिकवणारा तो, पण दर ठरवणारा दुसराच.

कष्ट त्याचे, जोखीम त्याची, आणि नफा मात्र बाजार, व्यापारी व दलालांच्या हाती. हीच आजच्या शेतकऱ्याची शोकांतिका आहे. शेतकरी जेव्हा पिके घेतो, तेव्हा त्याला हमी असते ती फक्त निसर्गाच्या लहरींची. पाऊस पडेल की नाही, गारपीट होईल की



नाही, रोग येईल की नाही. याची कोणतीही खात्री नसते. तरीही शेतकरी उत्पादन घेतो. मात्र एवढ्या जोखमीवर उभा राहून उत्पादित केलेल्या मालाला हमीभावाची हमी मात्र आजही मिळत नाही, हे दुर्दैव आहे. सरकार किमान आधारभूत किंमत (MSP) जाहीर करते, पण ती कागदावरच राहते. प्रत्यक्ष बाजारात शेतकऱ्याला हमीभाव मिळतोच असे नाही.

अनेक वेळा हमीभावापेक्षा कमी दराने माल विकावा लागतो. भाजीपाला, तरकारी, फळभाजी यांसारख्या पिकांना तर हमीभावाची संकल्पनाच लागू होत नाही. मग प्रश्न असा उरतो.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# बळीराजा : कधी होईल का राजा ?

**धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेचा अभाव ! कृषी उत्पादित माल व भाजीपाला विक्रीसाठी इतर जिल्ह्यांवर अवलंबुन...**



धाराशिव जिल्ह्यात शेतीची रचना पाहता अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय प्रमाणात अधिक असल्याचे चित्र समोर येत आहे. जिल्ह्यात बागायती शेतीपेक्षा जिरायत व हंगामी पिकांवर अवलंबून असणारे शेतकरी मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे पावसाच्या लहरीपणावरच जिल्ह्यातील शेतीचे उत्पन्न अवलंबून राहते. बागायती शेतीसाठी आवश्यक असलेली पाणी उपलब्धता, भांडवली गुंतवणूक आणि वीजपुरवठा या अडचणींमुळे अनेक अल्पभूधारक शेतकरी बागायत शेतीकडे वळू शकलेले नाहीत. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होत असून उत्पन्नातील अनिश्चितता कायम आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समित्या अस्तित्वात आहेत. कागदोपत्री पाहता ही मोठी सोय वाटते. पण प्रत्यक्षात या बाजार समित्या बहुतांश वेळा धान्य व कडधान्यांपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत. कृषी उत्पादित माल असो किंवा भाजीपाला, तरकारी व पालेभाज्यांसाठी स्वतंत्र, सुसज्ज आणि कार्यक्षम बाजारपेठांचा अभाव आहे. परिणामी शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी सोलापूर, पुणे, लातूर किंवा आंध्रप्रदेश, कर्नाटकातील बाजारांवर अवलंबून राहावे लागत आहे.

जिल्ह्यात दळणवळणाची व्यवस्था आज उत्तम आहे. पक्के रस्ते, महामार्ग, तालुक्यांना जोडणारी वाहतूक व्यवस्था यामुळे गाव ते शहर अंतर कमी झाले आहे. मात्र या प्रगतीचा खरा फायदा शेतकऱ्यांना होतो आहे का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. कारण रस्ते चांगले असले तरी शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या बाजार सुविधा मात्र अद्यापही अपुऱ्या आहेत.



अनिल आगलावे
मो. ९७६७०९९७११

दळणवळण चांगले असल्यामुळे दूरच्या बाजारात जाणे शक्य झाले असले, तरी त्याचा फायदा होण्याऐवजी नुकसानच अधिक होत आहे. वाहतूक खर्च, वेळेची नासाडी, दलालांची मक्तेदारी आणि दरातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. विशेषतः नाशवंत भाजीपाला पिकांच्या बाबतीत वेळेत विक्री न झाल्यास माल खराब होतो आणि शेतकऱ्यांचे कष्ट अक्षरशः वाया जातात.

प्रश्न असा आहे की, रस्ते, पूल, महामार्ग यांसारख्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी निधी उपलब्ध होतो, तर शेतकऱ्यांसाठी स्थानिक बाजारपेठा उभारण्यासाठी तो का मिळत नाही ? प्रत्येक निवडणुकीत शेतकरी केंद्रस्थानी असतो. घोषणा होतात, आश्वासने दिली जातात. मात्र निवडणुका संपल्यानंतर शेतकऱ्यांचे प्रश्न पुन्हा दुर्लक्षित का होतात?

आज शेतकरी हा राजकीय अनास्थेचा परिणाम आहे की राजकीय व्यवस्थेचा बळी आहे, असा सवाल प्रकर्षाने उपस्थित होत आहे. योजनांची नावे आहेत, निधी मंजूर झाल्याचे कागद आहेत, उद्घाटनांचे फोटो आहेत; पण प्रत्यक्षात मूलभूत सुविधा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत.

धाराशिव जिल्ह्यात कृषी उत्पादित माल आणि भाजीपाला दोन्हीसाठी स्वतंत्र, सुसज्ज व स्थानिक बाजारपेठा उभाराव्यात, प्रत्येक तालुक्यात तरकारी मार्केट, थंडगृह, साठवणूक केंद्रे व पारदर्शक लिलाव पद्धत सुरू करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. शासनाने तातडीने याकडे लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

धाराशिवसारख्या जिरायतप्रधान जिल्ह्यांसाठी स्वतंत्र धोरण आखण्याची गरज आहे. सूक्ष्म सिंचन योजना, पावसावर आधारित शेतीसाठी अनुकूल पीक विमा, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिल्यासच अल्पभूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो. अन्यथा, जिरायत शेतीवर अवलंबून असलेला धाराशिव जिल्ह्यातील बळीराजा अजूनही निसर्ग आणि बाजारपेठेच्या दयेवरच राहणार, अशी भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

जर शासन आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर उत्तम रस्त्यांवरून शेतकऱ्यांचे नुकसानच वाहत राहील. विकास हा केवळ रस्त्यांपुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीपर्यंत पोहोचला पाहिजे. स्थानिक, सुसज्ज बाजारपेठा उभारणे ही केवळ गरज नाही, तर बळीराजाप्रती असलेली जबाबदारी आहे.

आजही वेळ आहे. धाराशिव जिल्ह्यात कृषी उत्पादित माल आणि भाजीपाल्यासाठी स्वतंत्र बाजारपेठा उभारल्या गेल्या, तरच शेतकरी खऱ्या अर्थाने सक्षम होईल. तोपर्यंत प्रश्न कायम राहील बळीराजा कधी होणार **राजा ?...**

## खते-बियाणे टॅक्स फ्री होणार कधी ?...

शेतकरी जेव्हा खत घेतो, तेव्हा तो कर भरतो. बियाणे घेताना कर भरतो. उत्पादन विकताना मात्र त्याला दर ठरवण्याचा अधिकार नसतो. हा अन्याय नाही का? जर अन्न ही राष्ट्रीय गरज आहे, तर ते उत्पादन करणाऱ्या घटकाला करमुक्त सुविधा देणे ही सरकारची जबाबदारी नाही का? शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण होते, घोषणा होतात, योजनांची यादी वाढते. पण शेतकऱ्याच्या खिशात प्रत्यक्षात काय पडते, याचा विचार क्वचितच होतो.




कर्जमाफी ही तात्पुरती मलमपट्टी आहे; पण हमीभाव, उत्पादन खर्चात कपात आणि करमुक्त इनपुट्स हे दीर्घकालीन उपाय आहेत जे आजही प्रलंबित आहेत. दुसरीकडे उत्पादन खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. खते, बियाणे, कीटकनाशके, औषधे, डिझेल, वीज सगळ्यावर कर आहे. उद्योगपतींसाठी करसवलती, पॅकेजेस आणि माफी योजना येतात, पण अन्न उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यासाठी खते आणि बियाणे तरी टॅक्स फ्री करण्याची तयारी सरकार कधी दाखवणार?

## तरकारी बाजारपेठे अभावी शेतकरी अडचणीत...

धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात बाजार समिती असूनही पालेभाज्या व फळभाजीसाठी स्वतंत्र मार्केट नाही. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समित्या अस्तित्वात असल्या तरी प्रत्यक्षात तरकारी, पालेभाज्या व फळभाज्यांसाठी स्वतंत्र आणि सक्षम बाजारपेठ उपलब्ध नाही. या गंभीर समस्येमुळे जिल्ह्यातील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या




आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पालेभाज्या, कांदा, टोमॅटो, वांगी, भेंडी, मिरची, कोथिंबीर, मेथी आदी तरकारी पिकांचे उत्पादन घेतले जाते. अनेक शेतकरी अल्पभूधारक असून त्यांचे उत्पन्न मुख्यत्वे भाजीपाल्यावर अवलंबून आहे. मात्र या नाशवंत मालासाठी स्थानिक पातळीवर बाजारपेठ नसल्याने शेतकऱ्यांना सोलापूर, पुणे किंवा इतर जिल्ह्यांतील बाजारांमध्ये जावे लागत आहे. दूरच्या बाजारपेठेत माल नेण्यासाठी वाहतूक खर्च वाढतो, वेळ जातो आणि अनेकदा दर घसरलेले असतात. पालेभाज्या व तरकारी हा अत्यंत नाशवंत माल असल्याने वेळेत विक्री न झाल्यास माल खराब होतो. अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल न होता माल कमी दरात विकावा लागतो किंवा फेकून देण्याची वेळ येते.

## शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याची प्रतीक्षा कायम

शेतकरी राजा अशी ओळख असलेला बळीराजा आजही संकटातच असल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात




अनेक शेतकरी अजूनही आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत. वाढते उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अपेक्षेप्रमाणे वाढलेले दिसत नाही.

केंद्र सरकारने २०१६ साली शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. काही अहवालांनुसार शेती क्षेत्रात उत्पन्न वाढले असले, तरी ही वाढ सर्व राज्यांत आणि सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही.

विशेषतः अल्पभूधारक आणि कोरडवाहू भागातील शेतकरी अजूनही मागेच आहेत.

महाराष्ट्रात बळीराजा मोफत वीज योजना, शेत-पाणंद रस्ते योजना, पीक विमा आणि विविध अनुदान योजना राबवण्यात येत आहेत.

मात्र, या योजनांचा लाभ वेळेवर आणि पूर्ण स्वरूपात मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकरी संघटनांकडून होत आहेत. योजना कागदावर चांगल्या दिसतात, पण शेतात त्याचा परिणाम कमी जाणवतो, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

तज्ज्ञांच्या मते, शेतकऱ्यांचे उत्पन्न खऱ्या अर्थाने वाढवायचे असेल तर हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे, प्रक्रिया उद्योगांना चालना आणि हवामान बदलाशी जुळवून घेणारी शेती यावर भर देणे आवश्यक आहे.

तोपर्यंत, बळीराजा कधी होईल राजा? हा प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहे. सरकारच्या उपाययोजना किती प्रभावी ठरतात, यावरच शेतकऱ्यांच्या भवितव्याचे उत्तर अवलंबून आहे.

## फळभाज्या-पालेभाज्या पिकवणारा शेतकरी का संकटात?

लहान मोठे शेतकरी कुटुंब जगण्यासाठी कमी कालावधीत आर्थिक उत्पन्न देणारी पिके म्हणजे फळभाज्या, पालेभाज्या. हे पिके शेतकऱ्यांना महिन्याभरातच नफा देऊ शकतात, त्यामुळे त्यांनी ही शेती स्वारस्याने आणि जोखमीने घेतली आहे.

पण जेव्हा या पिकांना विक्रीसाठी सक्षम स्थानिक बाजार उपलब्ध नाही, तेव्हा त्यांचे उत्पादन सतत संकटात सापडते.

विशेषतः पालेभाज्या नाशवंत असल्यामुळे वेळेवर विक्री न झाल्यास माल खराब होतो आणि आर्थिक नुकसान मोठे होते. अनेक शेतकऱ्यांना उत्पादनाचा खर्च वसूल होत नाही, तर काही वेळा कमी दरात माल विकणे भाग पडते. परिणामस्वरूप, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते आणि कुटुंबाचा रोजचा खर्च भागवणेही कठीण होते.




शेतकऱ्यांचे हे संकट केवळ आर्थिक नाही, तर मानसिकदृष्ट्या देखील त्यांना त्रास देते. सरकारी योजना, कर्जमाफी आणि विकासाच्या घोषणाही अनेकदा कागदावरच मर्यादित राहतात. प्रत्यक्षात शेतकऱ्यांना हव्या असलेल्या स्थानिक, सुसज्ज बाजारपेठा, थंड साठवणूक सुविधा आणि पारदर्शक लिलाव पद्धत अद्यापही उपलब्ध नाहीत.

जर सरकारने लवकरात लवकर प्रत्येक तालुक्यात फळभाजी, पालेभाजी व तरकारीसाठी बाजारपेठा उभारल्या, तर शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनात वाढ होईल आणि शहरी बाजारांवर अवलंबित्व कमी होईल.

अन्यथा, लहान मोठ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न सतत संकटात राहील, आणि अन्नदाता शेतकरी आर्थिक संकटाचा बळी ठरणार.

## स्वतंत्र, सुसज्ज व स्थानिक बाजारपेठांची गरज!

**धाराशिव तालुका** : जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असतानाही धाराशिव तालुक्यात भाजीपाला व तरकारीसाठी स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध नाही. पालेभाज्या व फळभाजीसाठी आवश्यक शेड, लिलाव व्यवस्था व साठवणूक सुविधा नसल्यामुळे शेतकऱ्यांना सोलापूर बाजारावर अवलंबून राहावे लागत आहे. **तुळजापूर तालुका** : तुळजापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात ज्वारी, तूर, हरभरा तसेच भाजीपाला उत्पादन होते. मात्र स्थानिक बाजार समितीत भाजीपाला विक्रीची व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना दूरच्या बाजारात जावे लागते. यामुळे वाहतूक खर्च वाढून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. **उमरगा तालुका** : उमरगा तालुक्यात सोयाबीन, ऊस व भाजीपाला पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. तरीही येथे कृषी उत्पादित मालासाठी सुसज्ज बाजारपेठ नाही. भाजीपाला उत्पादक शेतकरी आंध्रप्रदेश,कर्नाटक व सोलापूर बाजारावर अवलंबून असल्याने दलालांची मक्तेदारी वाढली आहे. **कळंब तालुका** : कळंब तालुक्यातील शेतकरी भाजीपाला व कडधान्य उत्पादनात सक्रिय आहेत. मात्र बाजार समितीमध्ये भाजीपाल्यासाठी




स्वतंत्र जागा व विक्री व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाशवंत माल वेळेत विकला न गेल्याने नुकसान सहन करावे लागत आहे. **वाशी तालुका** : वाशी तालुक्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या अधिक असून भाजीपाला हेच त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. मात्र स्थानिक बाजारपेठ नसल्यामुळे व्यापाऱ्यांकडून कमी दरात माल विकण्याची वेळ येते. **भूम तालुका** : भूम तालुक्यात ज्वारी, हरभरा, कांदा व भाजीपाला उत्पादनासह दुध संकलन ही मोठ्या प्रमाणात होते. तरीही येथे आधुनिक बाजार सुविधा उपलब्ध नाहीत. कृषी उत्पादित मालासाठी शेतकऱ्यांना परजिल्ह्यात जावे लागत असल्याने खर्च वाढतो. **परंडा तालुका** : परंडा तालुक्यातील शेतकरी धान्याबरोबरच भाजीपाला उत्पादन घेतात. मात्र स्थानिक बाजारपेठे अभावी शेतमाल विक्री करताना अडचणी येत आहेत. साठवणूक व थंडगृह सुविधांचा अभाव ही मोठी समस्या आहे. **लोहारा तालुका** : लोहारा तालुक्यातील शेतकरी कृषी उत्पादित माल व भाजीपाला विक्रीसाठी सोलापूर व लातूर जिल्ह्यावर अवलंबून आहेत. बाजार समिती असूनही सर्व पिकांसाठी व्यवस्था नसल्याने शेतकरी नाराज आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मोटरसायकल अपघातात एकाचा जागीच मृत्यु

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

कळंब ते सारोळा मांडवा रोडवर गंभीर अपघात घडला. फिर्यादी अशोक बब्रुवान जाधव (वय ३१, रा. सारोळा मांडवा, ता. वाशी, जि. धाराशिव) आणि मयत बब्रुवान तुकाराम जाधव (वय ५५) मोटरसायकलवरून जात असताना, गंभीरवाडीच्या




पुढे गव्हाणे वस्तीजवळ अज्ञात वाहन चालकाने ताब्यातील वाहन हायगयी व निष्काळजीपणे चालवून त्यांच्या मोटरसायकलला समोरून धडक दिली. ही घटना दि.११ जानेवारी रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता घडली. याप्रकारे झालेल्या अपघातात बब्रुवान जाधव गंभीर जखमी होऊन मयत झाले, तर अशोक जाधव किरकोळ जखमी झाले.

या प्रकरणी अशोक जाधव यांनी दि.२३ जानेवारी रोजी कळंब पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदवण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### नव्या एस.टी. बससेवेचे उंडरगाव ग्रामस्थांकडून जंगी स्वागत

**लोहारा, दि.२४ जानेवारी -**

तुळजापूर आगारातून तोरंबा-उंडरगाव-मार्डी-बेंडकाळ मार्गे लोहारा अशी नवीन एस.टी. बस सेवा सुरू झाल्याने उंडरगाव ग्रामस्थांनी पेढे वाटून उत्स्फूर्त स्वागत करत आनंद व्यक्त केला. अनेक वर्षांपासून नागरिकांची प्रलंबित मागणी अखेर दि.२३ जानेवारी रोजी शिंदे सेनेचे धाराशिव लोकसभा अध्यक्ष युवा नेते आनंद सतीशराव पाटील यांच्या माध्यमातून पूर्ण झाली. यावेळी बस चालक एल.एस. सोनवणे व वाहक एम.सी. कोलपुसे यांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. ही बस तुळजापूर आगारातून दररोज सकाळी ९ वाजता सुटणार असून, लोहारा येथून दुपारी ४ वाजता मार्डी-उंडरगाव मार्गे तुळजापूरकडे रवाना होणार आहे. या बससेवेचा लाभ प्रवासी, ज्येष्ठ नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांना होणार असून ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.




### तुळजापूरात नूतन नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२४ जानेवारी -**

येथील वीरशैव जंगम मठ ट्रस्टच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी नूतन नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सत्कार पंढरपूर समितीचे अध्यक्ष सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमास व्यासपीठावर नगराध्यक्ष विनोद गंगणे, बार्शीच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, भाजप गटनेते औदुंबर कदम, काँग्रेस गटनेते अमोल कुतवळ, अक्षय ढोबळे, पुजारी मंडळाचे अध्यक्ष सज्जनराव साळुंके व राजाभाऊ मुंडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शिक्षण महर्षी रा.गे. शिंदे गुरुजी यांच्या पत्नी कुसुमताई यांच्या निधनाबद्दल उपस्थितांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. यानंतर सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी, सर्व नगरसेवक व पत्रकारांचा शाल, मोत्याचा हार, फेटा व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



### हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमातून सावित्रीमाईच्या विचारांचा जागर

**उमरगा, दि.२४ जानेवारी -**

उमरगा-लोहारा परिसरातील शाळा, महाविद्यालये तसेच हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमांत सावित्रीमाई फुले, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित पुस्तिकांचे 'वाण' म्हणून वाटप करण्यात येते. या उपक्रमाची संकल्पना ॲड. शीतल चव्हाण यांनी मांडली असून, ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या महिला विंगमार्फत त्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. या उपक्रमांतर्गत पहिला हळदी-कुंकवाचा कार्यक्रम दि.२३ जानेवारी रोजी बलसूर येथील श्री. दत्त मंदिरात, तर दुसरा कार्यक्रम दि.२४ जानेवारी रोजी उमरगा शहरातील प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती वाचनालयाच्या शाखेत उत्साहात पार पडला. या दोन्ही कार्यक्रमांत बलसूर व उमरगा परिसरातील १०० हून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात मातोश्री शांताबाई चव्हाण, विजया गावकरे यांच्यासह ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या महिला विंगच्या ॲड. अर्चना जाधव, शबाना शेख-उडचणे, ज्योती माने, बबीता मदने, प्रिती चव्हाण, अनुराधा पाटील, फरीन मुजावर, परवीन मुजावर, संध्या घोडके, कविता साळी आदींनी सक्रिय सहभाग घेतला.

### कुसुमताई शिंदे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२४ जानेवारी -**



स्वर्गीय शिक्षण महर्षी रागे शिंदे गुरुजी यांच्या पत्नी कुसुमताई रामचंद्र शिंदे (वय ९५) यांचे शुक्रवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात सहा मुले तीन मुली, नातवंडे पणतू आहेत. सायंकाळी घाटशेळ येथील घाटशीळ येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरावरील लोक उपस्थित होते. माजी नगरसेवक राजेश शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

## देवळाली येथे गांजाची अवैध लागवड उघड; १६ किलो गांजा जप्त, एकास अटक






तभा वृत्तसेवा
**कळंब, दि.२४ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील मौजे देवळाली येथे शेतजमिनीत गांजाची अवैध लागवड केल्याचा गंभीर प्रकार अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने उघडकीस आणला आहे. या कारवाईत १६ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून एकाला अटक करण्यात आली आहे.

दि.२३ जानेवारी रोजी अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर कृती विभागास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मौजे देवळाली (ता. भूम, जि. धाराशिव) येथील एका शेतजमिनीत मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या गांजाच्या (कॅनाबीस प्लांट) झाडांची अवैध लागवड करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ छापा टाकत कारवाई केली.

छाप्यात गोकुळदास रावसाहेब हावळे (वय ५०, रा. देवळाली, ता. भूम, जि. धाराशिव) यांच्या शेतगट क्रमांक ४६२ मध्ये गांजाची बेकायदेशीर लागवड करून त्याची देखभाल व रखवाली करताना आरोपी आढळून आला. घटनास्थळी कायदेशीर पंचनामा करून लहान-मोठी अशी एकूण ५२ गांजाची झाडे उपटण्यात आली. सदर झाडांचे एकूण वजन १६ किलो असून त्यांची अंदाजे किंमत ७१ हजार रुपये इतकी आहे. हा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस ठाणे परंडात अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर कृती विभागाचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वाहेद मुल्ला यांच्या फिर्यादीवरून दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

कारवाईत सपोनि. दिपाली पाटील, के.डी. संपकाळ, स.पो. उपनि. वाहेद मुल्ला, हनुमान पुरके, हवालदार शैला टेळे, सुरेश राऊत, नागेश केंद्रे, निलेश सरफाळे, नितीन जाधव, रविंद्र साळवे, सुरज जोनवाल, ज्ञानेश्वर चव्हाण व अम्रपाली सूर्यवंशी यांनी सहभाग घेतला.

## मुरूमजवळ दुचाकीस्वार तीन मित्रांवर हल्ला; एक गंभीर जखमी

### तिघांविरुद्ध गुन्हा दाखल...

तभा वृत्तसेवा
**मुरूम, दि.२४ जानेवारी -**

दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या तीन मित्रांना अडवून तिघा अज्ञात इसमांनी शिवीगाळ करत पट्टा व काठीने बेदम मारहाण केल्याची घटना मुरूमजवळील नाईकनगर शिवारात घडली. या हल्ल्यात एक तरुण गंभीर जखमी झाला असून या प्रकरणी मुरूम पोलिस ठाण्यात तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आसिफ चांद शेख (वय २१, रा. हमीद नगर, उमरगा) हा जखमी फिर्यादी असून तो आपल्या मित्र किरण व शहानवाज यांच्यासह दि. २१ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास दुचाकीवरून उमरग्याकडे जात होता. तिघेही नाईकनगर




परिसरात आले असता अचानक तीन अज्ञात इसमांनी त्यांची दुचाकी अडवली.

आरोपींनी दुचाकीवर मागे बसलेल्या शहानवाज याला ओढून खाली पाडले. त्यानंतर आसिफ शेख याला काठी व पट्ट्याने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. ही घटना भररस्त्यावर घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेनंतर जखमी आसिफ शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुरूम पोलिस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास मुरूम पोलीस करीत आहेत.

## शेतावर कब्जा करून ३.५ लाख रुपयांचे नुकसान; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल




### तेर येथील घटना...

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

ढोकी तालुक्यातील तेर येथील सखुबाई माणिक पेठे (वय ७६, रा. तेर, ता. ढोकी, जि. धाराशिव) यांच्या शेत गट नं. ११२० मध्ये आरोपी शंकर यशवंत कदम, शितल उर्फ नागुबाई शंकर कदम व महादु शंकर कदम यांनी शेतावर अवैध कब्जा केला. ही घटना दि.११ जानेवारी रोजी सकाळी १० ते १०.३० वाजताच्या सुमारास घडली.

फिर्यादींच्या तक्रारीनुसार, आरोपींनी मागील काही गोष्टींचा हवाला देऊन ट्रॅक्टर चालकास संगणमत करुन फिर्यादींच्या शेतावर जबरदस्ती केली आणि शेतातील पिकांचे अंदाजे ३ ते ३.५ लाख रुपयांचे नुकसान केले.

तसेच आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी, ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस तपास सुरू आहेत.

## तुळजापूरात हास्यधारा आणि भावभावनेत न्हालेलं राज्यस्तरीय कवी संमेलन



तभा वृत्तसेवा
**तुळजापूर, दि.२४ जानेवारी -**

कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या नगरीत सलग तीन तास चाललेल्या राज्यस्तरीय कवी संमेलनाने रसिक श्रोत्यांच्या काळजावर ठसा उमठवला. ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांना दिवंगत आमदार साहेबराव हंगरगेकर स्मृती साहित्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा, तुळजापूर आणि साहेबराव हंगरगेकर फाउंडेशनच्या वतीने आयोजित या कवी संमेलनात विविध शैलीतील कवितांनी रसिकांची मनं जिंकली. प्रारंभी कल्याण येथील लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांनी आईच्या आठवणींवर आधारित गेय कवितांची सादरीकरण करून उपस्थितांची भावभावना जिंकली. त्यांच्या कविता रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत मान्यता दर्शवली.

बीड जिल्ह्यातील युवा कीर्तनकार कवी अविनाश भारती यांनी विविध किस्से आणि घटनांचे संदर्भ देत उपस्थितांना हसवत मनोरंजन केले. विशेषतः मातांसाठी आणि भगिन्यांसाठी त्यांनी सादर केलेल्या कवितेला रसिकांनी विशेष दाद दिली.

छत्रपती संभाजीनगर येथील कवी नारायण पुरी यांच्या जांगडगुत्ता कवितांनी उपस्थितांचे सर्वाधिक लक्ष वेधले. त्यांच्या ओळींनी प्रेम, सामाजिक वास्तव आणि विचारांची उर्मी जागृत केली. तसेच धाराशिव येथील कवी रवींद्र केसकर यांनी सादर केलेल्या सीतेची अग्निपरीक्षा या कवितेने कार्यक्रमाला भावगंभीर टप्पा दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दास पाटील यांनी केले, सूत्रसंचलन कवी रवींद्र केसकर यांनी तर आभार प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी मानले. अध्यक्ष अमर हंगरगेकर, कार्यवाह विजय देशमुख, अरुण कुलकर्णी, किरण हंगरगेकर, देवेंद्र पवार, देवेंद्र हंगरगेकर, ॲड. ओंकार मस्के, यश हंगरगेकर, तुषार सुत्रावे, अनिल हंगरगेकर, आदित्य हंगरगेकर, आण्णासाहेब क्षीरसागर, संदीप गंगणे, दिलीप भारती आदी सदस्यांच्या मेहनतीमुळे हा कार्यक्रम यशस्वी ठरला.

सर्व सहभागी कवितांनी रसिकांच्या मनावर गडद ठसा उमठवला आणि तुळजाभवानी नगरीत अविस्मरणीय कवी संमेलन अनुभवायला मिळाले.

## कळंब तालुक्यात पर्यावरणपूरक रक्षा विसर्जन; रणदिवे कुटुंबीयांचा आदर्श निर्णय



तभा वृत्तसेवा
**कळंब, दि.२४ जानेवारी -**

प्रचलित रूढी, परंपरा व अंधश्रद्धेला मुठमाती देत वडिलांच्या निधनानंतर नदीत रक्षा विसर्जन न करता शेतात आंब्याचे झाड लावून रक्षा विसर्जन करण्याचा ऐतिहासिक व पर्यावरणपूरक निर्णय रणदिवे परिवाराने घेतला आहे. या उपक्रमामुळे ईटकुर (ता. कळंब) परिसरात रणदिवे कुटुंबीयांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिरीषकुमार रणदिवे, ॲड. सतिशकुमार रणदिवे व विजयकुमार रणदिवे यांचे वडील, माजी सैनिक अण्णासाहेब गोविंदराव रणदिवे (वय ८५) यांचे शनिवारी (दि.१७) वृद्धापकाळाने निधन झाले. अण्णासाहेब रणदिवे यांनी भारत-पाकिस्तान युद्ध (१९६२) काळात देशसेवा बजावली होती.

परंपरेनुसार रक्षा विसर्जन नदी पात्रात करण्यात येते. मात्र नदीचे प्रदूषण टाळावे, पाणी दूषित होऊ नये, जलचर प्राण्यांचे संरक्षण व्हावे व पर्यावरणाचा समतोल राखला जावा, या उदात्त हेतूने रणदिवे परिवाराने रक्षा विसर्जन पाण्यात न करण्याचा निर्णय घेतला. वडिलांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात यासाठी शेतामध्ये आंब्याचे झाड लावून त्याठिकाणी रक्षा विसर्जन करण्यात आले.

या कृतीतून समाजाला पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला असून, जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने अशा पर्यावरणपूरक उपक्रमात सहभाग घ्यावा, अशी भावना या निर्णयामागे असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. या अनोख्या आणि समाजप्रबोधनात्मक उपक्रमामुळे रणदिवे कुटुंबीयांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## परंड्यात अवैध तलवार जप्त; आरोपीवर गुन्हा नोंद

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

परंडा तालुक्यातील सिना कोळेगाव कॉलनी समोर, आरोपी ज्ञानेश्वर सुरेश सोनमुखे (वय ३०, रा. एसार पेट्रोल पंपासमोर, गार भवानी मंदिराच्या बाजूला, परंडा, जि. धाराशिव) यांच्या जवळून तलवार जप्त करण्यात आली. ही घटना दि.२३ जानेवारी रोजी दुपारी साडेनोळा वाजताच्या सुमारास घडली.

फिर्यादी सागर दादासाहेब कंचे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने विनापरवाना व बेकायदेशीर रित्या ही तलवार स्वतःच्या जवळ ठेवली होती.

यावरून पोलीस पथकाने तलवार जप्त केली आणि आरोपीविरुद्ध शस्त्र कायदा कलम ४ व २५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## 'तेरणा'त नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

तेरणा महाविद्यालय, धाराशिव येथे दि.२३ जानेवारी रोजी थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी नेताजींचे देशासाठीचे बलिदान आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे सामाजिक व राजकीय कार्य स्मरण करून उपस्थितांना प्रेरणादायी संदेश देण्यात आले.



कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद डॉ. चंद्रजीत जाधव, डॉ. अनघा तोडकरी, प्रा. सुनील पाटील, प्रा. विजयकुमार साळुंके, प्रा. बालाजी काकडे, प्रा. जयंत कांचनबटवे, डॉ. तुळशीराम उकिरडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## हाफ तिकीटावरून शिवीगाळ व मारहाण; चार जणांविरुद्ध गुन्हा

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

पुणे एस.टी. बसवर प्रवासादरम्यान हाफ तिकीट काढण्यासंदर्भातील वादातून एक चालक जखमी झाला. फिर्यादी निखिल आडसुळ (वय ४५, कळंब आगार, रा. ईटकर, ता. कळंब) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी नामे- अभिजीत बाळासाहेब मडके, ज्ञानेश्वर उर्फ माउली मडके, सचिन देडे आणि आणखी एक इसम यांनी ओरिजनल आधारकार्ड दाखवण्याच्या कारणावरून हाफ तिकीट काढण्यास अडथळा आणला.

या वादातून आरोपींनी शिवीगाळ केली, लाथाबुक्यांनी मारहाण केली आणि फिर्यादीवर धमक्या दिल्या की, जर तुम्ही या रोडवर ड्युटीला आलात तर बघून घेऊ.

याप्रकरणी, कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून, पोलीस तपास करत आहेत.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या विषय समित्यांची निवड बिनविरोध

### ४ सभापती भाजप-शिवसेनेचे, २ काँग्रेसचे

तभा वृत्तसेवा
**नळदुर्ग, दि.२४ जानेवारी -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या स्थायी व विषय समित्यांच्या सभापती आणि सदस्यांची निवड बिनविरोध पार पडली असून सहा पैकी चार विषय समित्यांचे सभापती भाजप-शिवसेना युतीकडे, तर दोन समित्यांचे सभापती काँग्रेसकडे गेले आहेत.

दि.२४ जानेवारी रोजी नळदुर्ग नगरपालिकेत स्थायी समिती व विविध विषय समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन तसेच सभापतींची निवड करण्यासाठी सर्वसाधारण विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेसाठी वाशी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सुरेखा कांबळे या पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होत्या. नळदुर्ग नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर व अजय काकडे यांनी त्यांना सहकार्य केले.

नगरपालिकेच्या सर्व विषय समित्यांच्या सभापतींची निवड बिनविरोध पार पडली. निवड झालेल्या समित्या व सभापती पुढीलप्रमाणे. महिला व बालकल्याण समिती सभापती बेडगे अपर्णा, सदस्य राणी सुरवसे, राठोड छमाबाई, नळदुर्गकर साक्षी, इनामदार जुलेखाबेगम. पाणीपुरवठा व जलनिसारण समिती सभापती



जाधव तानाजी, सदस्य राठोड निरंजन, काझी रीजवान, शेख इमाम, कुरेशी मन्नाबी.

सार्वजनिक बांधकाम समिती सभापती पुदाले शशिकांत, सदस्य काळे मिनाक्षी, दासकर दत्तात्रय, शेख इमाम, कुरेशी अब्दुलगफूर. नियोजन व विकास समिती सभापती जागीरदार नय्यरपाशा, सदस्य राठोड निरंजन, गायकवाड प्रविण, बागवान मदिना, पोतदार सुधीर.

स्वच्छता, वैधक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती ठाकुर सुमन, सदस्य नळदुर्गकर साक्षी, सुरवसे राणी, शेख इमाम, गायकवाड कमल. शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती शेख इमाम, सदस्य गायकवाड प्रविण, दासकर दत्तात्रय, राठोड निरंजन, कुलकर्णी आकाश.

सर्व समित्यांच्या निवडी बिनविरोध पार पडल्याने नगरपालिकेतील प्रशासकीय कामकाजाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.